ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४४ अंक १० पाने ५६ मे २०१७ मूल्य २२ रु.

## भारताची आश्वासक वाटचाल

मोदी सरकारचा देशातील पायाभूत सुविधांवर भर
के. आर. सुधामन

डिजिटल इंडिया कार्यक्रम
डॉ. ओमकार राय

नवभारताची कहाणी
व्यंकय्या नायडू

उपजिविकेच्या साधनाद्वारे जीवनमानात सुधारणा
अमरजीत सिन्हा

(विशेष लेख)
स्वच्छ भारत मोहीम - जबाबदारी प्रत्येकाची
परमेश्वरन अय्यर

(फोकस)
स्वच्छ पारदर्शक अर्थव्यवस्थेच्या दिशेने
एम. व्ही भानुमूर्ती आणि रोहित देव झा

प्रधानमंत्री उज्ज्वला योजना
प्रधानमंत्री जन-धन योजना
मेरा खाता भाग्य विधाता
My Mobile.... My Bank... My Wallet...
BHIM
BHARAT INTERFACE FOR MONEY
स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
Skill India
कौशल भारत - कुशल भारत
GST
Digital India
Power To Empower
बेटी बचाओ बेटी पढ़ाओ
Smart City
MISSION TRANSFORM-NATION
Housing for all
प्रधानमंत्री आवास योजना
#startupindia

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

// # योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४४ ❖ ❖ अंक १० ❖ ❖ मे २०१७ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**

संपादक
**उमेश उजगरे**

उप संपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ मोदी सरकारचा देशातील पायाभूत सुविधांवर भर | के आर सुधामन | ५ |
| ■ स्वच्छ पारदर्शक अर्थव्यवस्थेच्या दिशेने (फोकस) | एम. व्ही भानुमूर्ती आणि रोहित देव झा | १० |
| ■ डिजिटल इंडिया कार्यक्रम | डॉ ओमकार राय | १७ |
| ■ सार्वजनिक वित्तक्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर | लेखा चक्रवर्ती, समीक्षा अग्रवाल | २२ |
| ■ नवभारताची कहाणी | व्यंकय्या नायडू | २७ |
| ■ उत्तम अर्थ नियोजनाचे सात उपाय | शिशिर सिन्हा | ३१ |
| ■ स्वच्छ भारत मोहीम - जबाबदारी प्रत्येकाची (विशेष लेख) | परमेश्वरन अय्यर | ३५ |
| ■ उपजिवीकेच्या साधनाद्वारे जीवनमानात सुधारणा | अमरजीत सिन्हा | ३८ |
| ■ कौशल्य विकास, नवसंशोधन आणि युवकांचे सबलीकरण | डॉ जतींदर सिंग | ४२ |
| ■ बिकट जागतिक अर्थस्थितीत भारताची आगेकूच | डी. एस मलिक | ४५ |
| ■ अनुसूचित जातींच्या शैक्षणिक विकासात शासनाची भूमिका | अमोल श्रीकांत कांबळे | ५० |


**'योजना' हे निति आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**जाहिरात दर पत्रक**

| | |
|---|---|
| ब्लॅक अॅड व्हाईट पूर्ण पान: | रु. १०,००० |
| ब्लॅक अॅड व्हाईट अर्धे पान: | रु. ६,००० |
| बॅक कव्हर पूर्ण पान: | रु. २०,००० |
| सेकंड कव्हर पूर्ण पान: | रु. १७,००० |
| थर्ड कव्हर पूर्ण पान: | रु. १५,००० |


योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

संपादकीय

# विकासगाथा भारताची..

सु प्रशासनाचे निकष आपल्या काही जुन्या ग्रंथामध्ये विशद करण्यात आलेले आहेत. मग ते वेद असोत की कौटिल्याचे अर्थशास्त्र असो. आपल्या प्राचीन ग्रंथामध्ये राष्ट्र कल्याणासाठी राज्यकर्त्यांनी करावयाच्या बाबींवर बराच उहापोह करण्यात आला आहे.

अलीकडील काळातील भारताच्या विविध क्षेत्रातील विकासाची यशोगाथा उल्लेखनीय म्हणावी लागेल.पायाभूत सुविधा, कृषी, आर्थिक समावेशकता आणि वित्तीय सशक्तीकरण आदी विविध क्षेत्रात सरकारने अतिशय प्रभावी कामगिरी करून दाखविली आहे. सर्वकंश विकासाच्या सरकारच्या दृढ निश्चयामुळे विकासाचे प्रत्येक क्षेत्र चर्चेत आले आहे. योग्य आर्थिक धोरणे आणि वित्तीय सशक्तीकरणाच्या जीएसटी सारख्या उपाययोजनामुळे आर्थिक भरभराटीची खात्री बाळगता येण्याची स्थिती निर्माण झाली आहे. 'एक देश एक कर' ही संकल्पना देशातील कररचना सुटसुटीत करण्यासाठी तसेच वस्तू आणि सेवांसाठी एक देशव्यापी बाजारपेठ तयार करून उत्पादन-निर्मिती क्षेत्र अधिक स्पर्धात्मक करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणार आहे.

काळा पैसा आणि भ्रष्टाचार दूर करण्यासाठी विमुद्रिकरणाचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. याचप्रमाणे स्वतःहुन उत्पन्न जाहीर करण्याची योजना आणि विशेष कृती गटाची स्थापना यासारखे काही कठोर निर्णयही सरकारने घेतले. देशात गुंतवणुकीसाठी आशादायक वातावरण तयार व्हावे आणि देशाचा अर्थगाडा रुळावर यावा यासाठी सरकारला हे कठोर निर्णय घ्यावे लागले. विमुद्रिकरणाच्या निर्णयामागे डिजिटल अर्थव्यवसस्थेस चालना देणे, कमी रोकड वापराची व्यवस्था निर्माण करणे आणि आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणणे हेही उद्देश होते. त्यासाठीच आर्थिक व्यवहार करण्याचे भीम ॲप, रूपे डेबिट कार्ड यासारखे डिजिटल मंच उपलब्ध करून देण्यात येउन लोकांना कमी रोकड व्यवहारांसाठी प्रोत्साहित करण्यात आले.

सर्व प्रकारच्या घरकुलांची सकुशलता सुनिश्चित करणे आणि प्रत्येक नागरिकाला त्याच्या किमान गरजा भागविण्याची व्यवस्था निर्माण करणे ही सरकारच्या प्रत्येक धोरणाची मार्गदर्शक तत्वे बनली आहेत. जन धन योजना,थेट लाभ हस्तांतरण, उजाला, पहल यासारख्या वित्तीय समावेशकतेच्या योजनांमुळे विकासाची फळे तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्यात सरकारला यश आले आहे.

प्रचंड भौगोलिक विस्ताराचा लाभ उठविण्यासाठी आणि देशातील मोठया प्रमाणावरील युवकांना रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी देशाला उत्पादन-केंद्र बनविणारा 'मेक इन इंडिया' हा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमाला बळ देण्यासाठी कुशल मनुष्यबळाचा पुरवठा सुनिश्चत करणारे 'कौशल भारत, कुशल भारत' हे घोषवाक्य देण्यात आले. 'स्टार्ट अप इंडिया', 'स्टॅन्ड अप इंडिया' यासारख्या कार्यक्रमाद्वारे युवकांना भारतातच राहून स्वत:ची आणि देशाची प्रगती करण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे.

सरकारचा आणखीही एक प्रमुख कार्यक्रम असलेल्या स्वच्छ भारत अभियानाचीं तर विरोधकांनी सुध्दा प्रशंसा केली आहे. लोकांना विशेषत::ग्रामीण भागातील जनतेला स्वच्छतेच्या चांगल्या सवयी लावण्यासाठी हे अभियान अनेकांना प्रोत्साहित करीत आहे. शेतकऱ्यांचे कल्याण, कृषी, आणि ग्रामीण विकास सरकारच्या प्राधान्यक्रमावर आहेत. प्रधानमंत्री पीक विमा योजना, कृषी सिंचन योजना आदींमुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात बदल घडण्यास मदत झाली आहे. मुलींच्या कल्याणासाठीही सरकारने विविध योजना सुरु केल्या आहेत. अटल पेन्शन योजनेसारख्या सामाजिक सुरक्षा योजना आणून सर्व स्तरातील लोकांना आश्वस्त केले आहे. भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनविण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आली. स्मार्ट सिटी योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना आदींचा याबाबतीत उल्लेख करता येईल.

सरकारच्या या सर्व ध्येय धोरणांमुळे संपूर्ण जग भारताकडे कौतुकाने पाहत आहे. पूर्वी आपले तत्वज्ञान, साहित्य आणि कला याला जगाकडून दाद मिळत असे. परंतु आता आपल्याकडील गुंतवणूक संधी,कुशल मनुष्यबळ, आपले महत्वाच्या देशांशी असलेले सौहार्दाचे संबंध, शांतता निर्मितीचे आपले प्रयत्न यांची जगाकडून वाखाणणी होत आहे. कधी काळी गारुड्यांचा देश समजला जाणारा भारत आज अमेरिका आणि चीननंतर तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. भारताची ही विकास यशोगाथा अशीच पुढे जाणार आहे.

■ ■ ■

# मोदी सरकारचा देशातील पायाभूत सुविधांवर भर

के आर सुधामन



**भारतातील पायाभूत क्षेत्राच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेचा विकासदर वाढवता येतो. म्हणूनच सरकारने आतापर्यंत मागणी आधारीत बाजारपेठेऐवजी पुरवठाआधारित बाजारपेठेवर भर दिला आहे. मागणीआधारित बाजारपेठेने आपल्या कृषीव्यवस्थेलाही धोका पोहचला आहे. रस्ते, शीतगृह, सिंचनसुविधा यांच्या अभावामुळे कृषी क्षेत्राला मोठा फटका बसला आहे.**

आपल्या देशात पायाभूत सुविधांमध्ये असलेली दरी मिटवण्यासाठी किमान दोन दशकांचा कालावधी लागेल, असे अर्थमंत्र्यांनी नुकतेच म्हटले आहे. तसेच विकासाच्या आड येणाऱ्या या क्षेत्रात कार्य करुन दाखवण्याची मोठी संधी यारुपाने समोर आहे. म्हणून सरकारने पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला आहे.

गेल्या तीन वर्षात रेल्वे, रस्ते, बंदरं, नौकानयन, हवाई वाहतूक, देशांतर्गत जलमार्ग, ऊर्जा, दळणवळणाची साधने, यांच्या वाढीवर भर दिला आहे. गेल्या ७० वर्षात या क्षेत्राकडे फारसे लक्ष देण्यात आले नव्हते.

पायाभूत सुविधांची उभारणी करण्यासाठी आपल्या देशाला कुशल मनुष्यबळ आणि डिजीटायजेशनची आवश्यकता आहे. म्हणूनच सरकारने स्कील इंडिया, डिजीटल इंडिया आणि स्वच्छ भारत या मोहीम हाती घेतल्या आहेत. तर, मेक इन इंडिया मोहिमेच्या माध्यमातून भारतात जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण होतील, असे प्रयत्न करण्यात येत आहेत.

२०१७ मध्ये संपणाऱ्या १२ व्या पंचवार्षिक योजनेत सरकारने पायाभूत सुविधांसाठी एक ट्रिलीयन अमेरिकन डॉलर्स एवढा खर्च करण्याचे निश्चित केले आहे. यातील बहुतांश गुंतवणूक खासगी क्षेत्राकडून केली जाणार आहे.

भारतातील पायाभूत क्षेत्राच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेचा विकासदर वाढवता येतो. म्हणूनच सरकारने आतापर्यंत मागणी आधारीत बाजारपेठेऐवजी पुरवठाआधारित बाजारपेठेवर भर दिला आहे. मागणीआधारित बाजारपेठेने आपल्या कृषीव्यवस्थेलाही धोका पोहचला आहे. रस्ते, शीतगृह, सिंचनसुविधा यांच्या अभावामुळे कृषी क्षेत्राला मोठा फटका बसला आहे.

गेल्या पंधरा वर्षात पायाभूत क्षेत्रासमोरची आव्हाने लक्षात घेता सरकारने आधुनिकीकरणावर भर दिला आहे. याचे परिणाम दिसून येत आहेत. सव्वाशे कोटी लोकसंख्येचा आपला देश. त्यापैकी एक तृतीयांश लोकसंख्या ३५ वर्षाखालील आहे. म्हणूनच पायाभूत सुविधांचा विकास करणे यापेक्षा दुसरे कोणतेही धोरण सरस ठरु शकत नाही. चालू आर्थिक

वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास दर साडेसात टक्के आहे, यातून भारत जागतिक अर्थव्यवस्थेतील महत्वाचे केंद्र (स्वीट स्पॉट) असल्याचे दिसून येते. जागतिक अर्थव्यवस्था विशेषतः चीनसारख्या देशाची अर्थव्यवस्था धिम्या गतीने विकासदर गाठताना आपली कामगिरी उठून दिसते. म्हणूनच जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये तेजीचा काळ येईल तेंव्हा आपल्या देशात पायाभूत सुविधांच्या उभारणीवर केलेली गुंतवणूक यामुळे जास्तीत जास्त लाभ भारतीय अर्थव्यवस्थेला होईल. तेल, स्टील, सिमेंट या पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असलेल्या वस्तूंच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमती सध्या कमी होत आहेत, त्याचा फायदा आपल्याला होत आहे. तसेच इतर विकसित अर्थव्यवस्थांमध्ये असलेले पेन्शनफंड गुंतवणूकीसाठी प्रतीक्षा करत आहेत. म्हणून या सुवर्णसंधीचा गुंतवणूकदार फायदा घेण्यासाठी उत्सुक आहेत.

चीनची अर्थव्यवस्था डळमळीत असताना स्थूल-आर्थिक निकषांच्या माध्यमातून आपल्याला पायाभूत सुविधांची वाढ करता येईल. चलनवाढीचा दर पाच टक्क्यांपेक्षा कमी आहे, चलनतुटवडा आटोपशीर पातळीवर आहे, व्याजदर कमी होत आहेत, कृषी क्षेत्राने जोरदार पुनरागमन केले आहे. म्हणूनच पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आर्थिक परिस्थिती एकदम अनुकूल आहे. सरकारने आगामी तीन-चार वर्षात एक ट्रिलीयन अमेरिकन डॉलर एवढा खर्च पायाभूत सुविधांच्या विकासावर खर्च करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला आहे.

चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहीत, भांडवली खर्चामध्ये १८ टक्क्यांनी वाढ होऊन खोळंबलेले प्रकल्प मार्गी लावण्यात येत आहेत. ऊर्जा मंत्रालयाच्या दीर्घकालीन प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यास परकीय गुंतवणूकदारांनी रस दाखवला आहे.

जुलै २०१४ मध्ये सरकारने अधिकृतरीत्या भारतीय रेल्वेत परकीय गुंतवणूकीची घोषणा केली आहे. त्यासाठी सद्यस्थितील रेल्वे सुविधांचा विकास करण्यासाठी १२८ अब्ज अमेरिकी डॉलर्स, यात नवीन

**चीनची अर्थव्यवस्था डळमळीत असताना स्थूल-आर्थिक निकषांच्या माध्यमातून आपल्याला पायाभूत सुविधांची वाढ करता येईल. चलनवाढीचा दर पाच टक्क्यांपेक्षा कमी आहे, चलनतुटवडा आटोपशीर पातळीवर आहे, व्याजदर कमी होत आहेत, कृषी क्षेत्राने जोरदार पुनरागमन केले आहे. म्हणूनच पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आर्थिक परिस्थिती एकदम अनुकूल आहे.**

रेल्वेमार्ग आणि ४०० रेल्वेस्थानकांचा समावेश आहे. तर बुलेट ट्रेनसाठी १५ अब्ज अमेरिकी डॉलर्स, समर्पित मालवाहतूक रेल्वेमार्ग (डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर) साठी १२.५ अब्ज अमेरिकी डॉलर्स गुंतवणूक निर्धारीत करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या रेल्वे अर्थसंकल्पात रेल्वे आणि बंदर जोडणीची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई-दिल्ली आणि लुधीयाना-कोलकाता मालवाहतूक मार्गाचे काम प्रचंड वेगाने सुरु आहे. तसेच कोलकाता-विजयवाडा, दिल्ली-चेन्नई, कोलकाता-मुंबई मालवाहतूक मार्गाचे कामही हाती घेण्यात आले आहे.

सरकारने ६ अब्ज रुपयांचा राष्ट्रीय पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक निधी (एनआयआयएफ) उभा केला आहे, यामुळे गुंतवणूकदारांचा या क्षेत्राप्रती विश्वास निर्माण झाला आहे. एनआयआयएफमध्ये सरकारचा वाटा ४९ टक्के आहे.

पायाभूत क्षेत्राच्या निधीमध्ये एक महत्त्वाची अडचण म्हणजे १९९० च्या आर्थिक उदारीकरणानंतर सरकारने आर्थिक संस्थांना केलेली मदत. पण, त्यामुळे बाँड मार्केट आणि पायाभूत सुविधा निधी उभारणी होऊ शकली नाही. म्हणून व्यापारी बँकांनी पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी प्रचंड प्रमाणात कर्जवाटप केले. पण हे कर्ज कमी आणि मध्यम कालावधीसाठी होते. पायाभूत सुविधांसाठी दीर्घकालीन योजना हव्या असतात. म्हणून त्यात कमी व्याजदराने दीर्घ कालावधीसाठी कर्जपुरवठा हवा असतो. पेन्शन आणि विमा निधी, कॉर्पोरेट बाँडस आणि इन्फ्रा फंडस या माध्यमातून हा निधी उभारला जाऊ शकतो. पण, देशात याची सुविधा नसल्यामुळे व्यापारी बँकांनी पैसा उभारला आणि त्यामुळे प्रचंड प्रमाणात अनुत्पादक मालमत्ता (नॉन परफॉर्मिग ऍसेट)ची निर्मिती झाली.

२०१४ पासून पायाभूत सुविधा क्षेत्र विकासात भारत दुसऱ्या स्थानी आहे. क्रिसील या मानांकन संस्थेच्या अंदाजानूसार आगामी पाच वर्षात भारताला या क्षेत्रासाठी ४३ लाख कोटी रुपयांची आश्यकता आहे.

यापैकी ऊर्जा, वाहतूक आणि नागरी पायाभूत सुविधांसाठी यापैकी सत्तर टक्के रक्कम खर्च होईल. खाजगी भांडवल जे दहा ते पंधरा वर्षांसाठी गुंतवण्यात आले होते, ते काढून घेण्यात येत आहे, म्हणून परकीय गुंतवणूकदारांना यात मोठी संधी आहे.

नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूकदारांना मोठ्या प्रमाणात रस असल्याचे दिसून येत आहे. २०२२ पर्यंत हरित ऊर्जा क्षमता ३० गिगावॅट ते १०० गावॅट पर्यंत वाढवण्याचे उद्‌दिष्ट आहे.

नवीकरणीय ऊर्जा, महामार्ग आणि रेल्वे केंद्र सरकारच्या अखत्यारित आहेत. केंद्र सरकारने पारदर्शक कारभारावर भर दिला आहे. तसेच या क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सरकारने काही नियमही शिथील केले आहेत. जपान, कोरिया, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये सरकारच्या पातळीवर यासंबंधी निर्णय घेतले जात आहेत.

समर्पित मालवाहतूक रेल्वेमार्गात (डेडिकेटेड फ्राईट कॉरिडॉर) जपानी कंपन्या ५ अब्ज अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक करण्यासंबंधी विचार करत आहेत, तर कॅनडाच्या २६८ अब्ज अमेरिकी डॉलर्सच्या पेन्शन ग्रूपने दोन अब्ज अमेरिकी डॉलर्स एवढी गुंतवणूक केली आहे. संयुक्त अरब अमिरातीच्या अबुधाबी गुंतवणूक प्राधीकरणानेही गुंतवणूकीत रस दाखवला आहे.

केंद्र-राज्य संबंधांमध्ये असलेले स्वरुप नीती आयोगाच्या स्थापनेनंतर बदलले आहे. गेल्या तीन वर्षात सरकारने 'सहकार्याच्या माध्यमातून स्पर्धा' अशा रुपाने विकासावर भर दिला आहे. प्रत्येक राज्याच्या स्थानिक गरजा लक्षात घेऊन राज्यांच्या सबलीकरणाचा प्रयत्न होताना दिसत आहे.

सरकारने गेम चेंजर अशा जाम (जन धन, आधार आणि मोबाईल) वर भर दिला आहे. यामुळे लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट सबसिडी जमा होत आहे. यामुळे गळती थांबली आहे. जुलैमध्ये लागू होणारा वस्तू आणि सेवा कर कायदा हा सरकारच्या

**बांधकाम उपकरण निर्मिती क्षेत्राचा चार वर्षानंतर आढावा घेण्यात आला आहे आणि हे क्षेत्र सध्याच्या २.८ अब्ज अमेरिकी डॉलर्स एवढ्या क्षमतेवरुन २०१९-२० मध्ये ५ अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत विस्तारीत होणे अपेक्षित आहे. याचा अर्थ असा की, भारत पायाभूत क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणूकीची मोठी संधी उपलब्ध करुन देत आहे. अनेक स्पॅनिश कंपन्यांनी या क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी रस दाखवला आहे. यात अतिवेगवान रेल्वे, नवीकरणीय ऊर्जा आणि स्मार्ट सिटीचा विकास करणे यांचा समावेश आहे.**

विकासाच्या धोरणाला पूरक असा आहे. अनेक अभ्यासातून दिसून आले आहे की, जीएसटीच्या अंमलबजाणीनंतर जीडीपीमध्ये वार्षिक १.५-२ टक्क्यांनी वाढ होणार आहे. यात पायाभूत सुविधांमधील गुंतवणूकीचा मोठा वाटा असणार आहे. अर्थव्यवस्थेचा विकासदर ८-९ टक्के वार्षिक राहिल्यास रेल्वेसह पूरक क्षेत्रांमध्ये वार्षिक एक लाख कोटी रुपयांनी वाढ होईल. रेल्वेचा भांडवली खर्च गेल्या तीन वर्षात ४०,००० कोटींहून हळूहळू वाढला आहे.

रस्ते वाहतूक, महामार्ग आणि नौकानयन मंत्रालयाने जाहीर केले आहे की, सरकारने आगामी तीन वर्षात पायाभूत सुविधांवर २५ ट्रिलीयन अमेरिकी डॉलर्स (३७६.५३ अब्ज अमेरिकी डॉलर्स) एवढा खर्च करण्याचे निश्चित केले आहे. यात २७ औद्योगिक क्लस्टर्सचा विकास आणि अतिरिक्त पाच ट्रिलीयन अमेरिकी डॉलर्स रस्ते, रेल्वे आणि बंदर जोडणी प्रकल्पांसाठी खर्च करण्याचे नियोजन आहे. २०१६ मध्ये जागतिक बँकेच्या लॉजिस्टीक्स परफॉर्मन्स इंडेक्समध्ये भारत १६० देशांच्या यादीत १९ स्थानांची प्रगती करुन ३५ व्या स्थानावर पोहचला आहे.

भारतीय ऊर्जा क्षेत्रात आगामी चार ते पाच वर्षात २५० अब्ज अमेरिकी डॉलर्स एवढी गुंतवणूक क्षमता आहे. त्यामुळे ऊर्जा निर्मिती, वितरण आणि पारेषण यात मोठी संधी आहे.

बांधकाम उपकरण निर्मिती क्षेत्राचा चार वर्षानंतर आढावा घेण्यात आला आहे आणि हे क्षेत्र सध्याच्या २.८ अब्ज अमेरिकी डॉलर्स एवढ्या क्षमतेवरुन २०१९-२० मध्ये ५ अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत विस्तारीत होणे अपेक्षित आहे. याचा अर्थ असा की, भारत पायाभूत क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणूकीची मोठी संधी उपलब्ध करुन देत आहे. अनेक स्पॅनिश

कंपन्यांनी या क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी रस दाखवला आहे. यात अतिवेगवान रेल्वे, नवीकरणीय ऊर्जा आणि स्मार्ट सिटीचा विकास करणे यांचा समावेश आहे. स्कायट्रान इन्क, नासा या संस्थेची तांत्रिक भागीदार असलेली कंपनी जी नागरी वाहतुकीसाठी पोड कार प्रणालीसाठी ओळखली जाते, ती कंपनी भारतात एक किलोमीटरच्या पथदर्शी प्रकल्पाच्या माध्यमातून सरकारची गरजपूर्ती करणार आहे. तसेच अनेक कंपन्या भारतात लाखो कोटी डॉलर्सची गुंतवणूक करण्यास इच्छूक आहेत. औद्योगिक कॉरिडॉर्स दिल्ली-मुंबई, लुधियाना-कोलकाता, कोलकाता-विशाखापट्टणम-विजयवाडा-चेन्नई-तुतीकोरीन, चेन्नई-बेंगळुरू, बेंगळुरु-मुंबई हे जपान, जागतिक बँक, एडीबी आणि ब्रिटीश सहकार्याने विकसित करण्यात येत आहेत. याशिवाय दूरसंचार क्षेत्रासह शंभर स्मार्ट शहरांच्या निर्मितीसाठी प्रचंड गुंतवणूक करण्यात येत आहे.

पंतप्रधानांनी जाहीर केलेली स्वच्छ भारत मोहीम ही, २०१९ पर्यंत भारताला हागणदारीमुक्त करण्यासाठी आहे. महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीचे उद्दिष्ट यासाठी ठेवण्यात आले आहे. या मोहिमेमुळे सांडपाणी तसेच कचरा प्रक्रिया प्रकल्पांवर मोठी गुंतवणूक होत आहे. लाखोंनी वैयक्तिक आणि सामुदायिक शौचालये बांधली जात आहेत. विशेषतः ग्रामीण भागात बायोगॅस प्रकल्पांवर भर दिला जात आहे तसेच पिण्याच्या स्वच्छ पाण्याकडे लक्ष दिले जात आहे.

जपान, ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका, चीन यांनी सरकारच्या स्मार्ट सिटी प्रकल्पांमध्ये गुंतवणुकीसाठी रस दाखवला आहे. त्यामुळे या क्षेत्रात अब्जावधींची गुंतवणूक होण्याची शक्यता आहे.

मलेशियाच्या कन्स्ट्रक्शन इंडस्ट्री डेव्हलपमेंट बोर्डाने नागरी विकास आणि घर बांधणीसाठी ३० अब्ज अमेरिकी डॉलर्स एवढ्या गुंतवणूकीचा प्रस्ताव ठेवला आहे. नवी दिल्ली रेल्वे स्थानकाजवळ मिनी स्मार्ट सिटी विकसित करणे, उत्तर प्रदेशात गढमुक्तेश्वर आणि गंगा स्वच्छता या कामांचा यात समावेश आहे.

---

**पंतप्रधानांनी जाहीर केलेली स्वच्छ भारत मोहीम ही, २०१९ पर्यंत भारताला हागणदारीमुक्त करण्यासाठी आहे. महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीचे उद्दिष्ट यासाठी ठेवण्यात आले आहे. या मोहिमेमुळे सांडपाणी तसेच कचरा प्रक्रिया प्रकल्पांवर मोठी गुंतवणूक होत आहे. लाखोंनी वैयक्तिक आणि सामुदायिक शौचालये बांधली जात आहेत. विशेषतः ग्रामीण भागात बायोगॅस प्रकल्पांवर भर दिला जात आहे तसेच पिण्याच्या स्वच्छ पाण्याकडे लक्ष दिले जात आहे.**

---

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने गेल्या अडीच वर्षात ३.१७ ट्रिलीयन अमेरिकी डॉलर्स एवढी गुंतवणूक केली आहे, तर नौकानयन मंत्रालयाने पायाभूत सुविधांसाठी ८०,००० कोटी म्हणजेच बारा अब्ज अमेरिकी डॉलर्स एवढी गुंतवणूक केली आहे. २०१६-१७ या वर्षात १५,००० किलोमीटर लांबीचे महामार्ग निर्मितीचे ध्येय होते, त्यापैकी फेब्रुवारी २०१७ पर्यंत ६,६०४ किलोमीटर रस्तेबांधणीचे काम झाले आहे.

२०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात, सरकारने पायाभूत सुविधांच्या विकासासाठी नवनवीन उपक्रम हाती घेतले आहेत. संरक्षण क्षेत्रासाठीची तरतूद दहा टक्क्यांनी वाढवली आहे. रेल्वे क्षेत्रासाठीची तरतूद आठ टक्क्यांनी वाढवण्यात आली आहे. २०१७-१८ वर्षात साडेतीन हजार किलोमीटर रेल्वेमार्गांच्या उभारणीसाठी १, ३१,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परवडणाऱ्या किंमतीतील घरांना पायाभूत सुविधांचा दर्जा देण्यात आला आहे. जमीन आणि इमारतींसाठी लॉक-इन-पिरियड तीन वर्षांहून दोन वर्षे करण्यात आला आहे.

भारतीय रेल्वेनेही रेल्वेज ऑफ इंडिया डेव्हलपमेंट फंड (आरआयडीएफ) च्या माध्यमातून पाच अब्ज अमेरिकी डॉलर्स निधी उभा करण्याचा निर्णय घेतला आहे. यातून विविध पायाभूत प्रकल्पांची उभारणी करण्यात येणार आहे.

केंद्र सरकारने ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी अतिरिक्त ५९,९७८.२९ कोटी रुपयांचा खर्च घोषीत करण्यात आला आहे. यात ग्रामीण भागात रोजगार निर्मिती, ग्रामीण पायाभूत सुविधांचा विकास करणे, नगर विकास आणि कृषी विमा यांचा समावेश आहे.

नौवहन मंत्रालयाने ३७ राष्ट्रीय जलमार्गांच्या विकासाचे काम हाती घेतले आहे. नॅशनल वॉटरवेज ऍक्ट, २०१६ अंतर्गत एकूण १११ राष्ट्रीय जलमार्ग घोषीत करण्यात आले आहेत.

पंतप्रधान कृषी सिंचन योजना आणि जलद सिंचन लाभ कार्यक्रम (एआयबीपी) अंतर्गत डिसेंबर २०१९ पर्यंत तीन वर्गवारीत प्रकल्पांचे काम पूर्ण करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे.

सरकारने आगामी पाच वर्षात १०६ शहरांमध्ये आठ हजार किलोमीटर लांबीचे पदपथ बांधणीचे नियोजन केले आहे. यासाठी आठ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे नागरी भागातील प्रदूषण कमी होईल.

केंद्रीय विद्युत प्राधीकरण (सीईए) चा अंदाज आहे की, ऊर्जा पारेषण क्षेत्रात तेराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीदरम्यान (२०१७-२२) २.६ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होईल. त्यामुळे आंतर-प्रादेशिक जोडणी मजबूत होऊन त्याची क्षमता ४५,७०० मेगावॅट होईल.

३५,६०० कोटी रुपयांच्या माध्यमातून ७५ महामार्ग सार्वजनिक निधीतून उभे करण्यात येतील. अशाप्रकारे टोल-ऑपरेट-ट्रान्सफर पद्धतीने एकूण २,७०० किलोमीटरच्या महामार्गांची बांधणी करण्यात येणार आहे.

नगर विकास मंत्रालयाने अमृत (Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation) योजनेअंतर्गत २,८६३ कोटी रुपयांच्या गुंतवणूकीला मंजूरी दिली आहे. यातून नागरी भागातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येणार आहे.

भारतीय विमानतळ प्राधीकरणाचे (AAI)) २०१७-१८ मध्ये भांडवली खर्चात २५ टक्क्यांनी वाढ करून २,५०० कोटी रुपयांपर्यंत वाढीचे नियोजन आहे. तसेच बारा विमानतळांची क्षमता वाढवण्यात येणार आहे. तसेच देशभर १३ नविन विमानतळांची निर्मिती करण्यात येणार आहे. खासगी विकासकांच्या मदतीने हॉटेल्स, कार पार्किंग आणि इतर सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत.

देशभरात शंभर स्मार्ट शहरांसाठी केंद्र सरकारने ५०,००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सरकारने ९३ अब्ज अमेरिकी डॉलर्स एवढ्या खर्चाच्या राष्ट्रीय महामार्ग निर्मितीची घोषणा केली आहे. सरकारने गेल्या तीन वर्षात पारदर्शकता, निर्णय क्षमता, वैधता आणि प्रकल्पांना तातडीने मंजूरी देणे यावर भर दिला आहे.

भारतीय बंदर क्षेत्र आगामी काळात विस्तारत जाणार आहे. २०१७ अखेरपर्यंत भारतातील प्रमुख बंदरांमध्ये ९४३.०६ मेट्रीक टन आणि इतर बंदरांमध्ये ८१५.२० मेट्रीक टन एवढी मालवाहतूक असेल, असा अंदाज आहे. याबरोबरच हवाई वाहतूक क्षेत्रही २०२० पर्यंत जागतिक पातळीवर तिसऱ्या क्रमाकांपर्यंत उंचावेल असा अंदाज आहे. यात १२० अब्ज अमेरिकी डॉलर्स एवढी गुंतवणूक होईल असा अंदाज आहे. तर, देशांतर्गत ३३६ दशलक्ष आणि ८५ दशलक्ष प्रवासी वाहतूक हाताळली जाईल. आतापर्यंत प्रतिदिन दोन-तीन किलोमीटर रस्तेनिर्मिती केली जात होती. ती आता प्रतिदिन चाळीस किलोमीटर एवढी होत आहे, आगामी काळात यात आणखी वाढ होणार आहे. रस्ते, रेल्वे, बंदरं, मेट्रो रेल्वे या पायाभूत क्षेत्रातील विकास आता ठळकपणे दिसून येत आहे.

■ ■ ■

*लेखक गेली ४० वर्षे पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियामध्ये आर्थिक संपादक तसेच टिकर न्यूज आणि फायनान्शियल क्रॉनिकल मध्ये कार्य केला आहे.*

email: sudhaman23@gmail.com

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठवितांना लेखकांनी UNICODE (Mangal) or KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत,

हे नम्र आवाहन.

# स्वच्छ पारदर्शक अर्थव्यवस्थेच्या दिशेने

एम. व्ही भानुमूर्ती आणि
रोहित देव झा



**अर्थव्यवस्थेच्या परिघापासून अंमळ चार हात लांबच असणाऱ्या लोकांना लक्ष्य बनवून सुधारणांची पातळी वाढवण्याच्या अनुषंगाने गंभीर प्रयत्न केले गेले. या धोरणाचे मुख्य खांब म्हणजे समावेशकता, पारदर्शकता आणि विकेंद्रीकरण. या तिन्ही खांबांची पुरेशी अंमलबजावणी केल्याने पहिल्यांदाच अर्थव्यवस्थेतील वाढीचा जनतेला थेट फायदा झाला.**

विचारशील प्रशासक राज्याचे सुप्रशासन पाहतो, जनहितार्थ कल्याणकारी कामे राबवतो, व्यावसायिक उपक्रमांना प्रोत्साहन देतो, परिणामतः अल्पावधीतच जनता समृध्द होते. - आचार्य चाणक्य.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मानवी विकास निर्देशांका प्रमाणे भारत सलग बरीच वर्षे नीचांक पातळीवर आहे. त्यामुळेच दारिद्रय आणि गरजू येथे मोठ्या प्रमाणात दिसतात. मागल्या वर्षी (मानवी विकास सूचकांक २०१६) एकूण १८८ राष्ट्रांच्या यादीत भारत १३१ वा गरीब देश म्हणून जाहिर झाला.

अर्थव्यवस्थेच्या परिघापासून अंमळ चार हात लांबच असणाऱ्या लोकांना लक्ष्य बनवून सुधारणांची पातळी वाढवण्याच्या अनुषंगाने गंभीर प्रयत्न केले गेले. या धोरणाचे मुख्य खांब म्हणजे समावेशकता, पारदर्शकता आणि विकेंद्रीकरण. या तिन्ही खांबांची पुरेशी अंमलबजावणी केल्याने पहिल्यांदाच अर्थव्यवस्थेतील वाढीचा जनतेला थेट फायदा झाला.

कदाचित, या तीन खांबापैकी, पारदर्शकता हा निधर्मी अर्थव्यवस्थेतील वाढीला सर्वांत महत्वाचा पूर्वापेक्षित घटक आहे. उदासीन परिक्षण कायमच भ्रष्टाचाराला आमंत्रण देते, भ्रष्टाचार हा कोणत्याही चांगल्या हेतूकरिता आखलेल्या कार्यक्रमाच्या अपयशासाठी मुख्य दोषी असता.

भ्रष्टाचारामुळे काळापैशाला खतपाणी मिळते. आणि या दोहोंमुळे कल्याणकारीकामांचा विध्वंस होतो. शासनाप्रति जाणारा वित्तप्रवाह खंडित होतो, कार्यक्रम वा धोरणांचे नियोजन आणि अंमलबजावणीचा वेग मंदावतो, विदेशी गुंतवणूकीपासून आपण परावृत्त होतो. विदेशी गुंतवणूकीमुळे देशास वित्तप्राप्ती आणि अर्थविकासासाठी पोषक तंत्रज्ञान मिळते, रोजगारनिर्मिती होते. देशाच्या भावी पिढीला रोजगार मिळवण्यासाठी देश झगडत असताना ह्या फायद्यांना आपण मुकतो.

जागतिक बँकेनुसार, विकसनशील जगात भ्रष्टाचार हा लोकांचा एक नंबरचा शत्रू आहे. आणि गरीब त्याच्या उत्पन्नाचा सगळ्यात जास्त टक्का लाच देण्यासाठी खर्च करतो. भारतही याला काही अपवाद नाही.

गंमत म्हणजे, शासन जेव्हा काळा पैसा जमा करणाऱ्या लोकांवर समोरुन हल्ला करत असतानाच त्याच जोडीला नवनवीन प्रयत्नांनी गरीब जनतेला भ्रष्टाचार आणि लाचखोरीपासून परावृत्त करण्यासाठी

पुढाकार घेत आहे. त्यातील काही प्रयत्नांची या लेखात चर्चा करु.

**स्वच्छ अर्थव्यवस्थेच्या दिशेने**

भारतातील कराचा पाया लक्षात घेता करदात्यांची संख्या ५.५ कोटी इतकी आहे. त्यामध्ये व्यक्ती, कंपन्या,इतर व्यावसायिक अनुष्ठाने यांचा समावेश आहे. यांचे एकूण कराच्या जीडीपीशी (राष्ट्रीय उत्पन्नशी) १६.६% इतके गुणोत्तर आहे. आर्थिक सर्वेक्षण २०१६-१७ च्या माहितीनुसार भारतामध्ये प्रति १०० मतदारांच्या मध्ये करदात्यांची संख्या ७ इतकी आहे. यातून करचुकवेगिरीवर चांगलाच प्रकाश पडला आहे. यातील काही सत्यता अशी की, गेल्या ५ वर्षांत सव्वा कोटी कार भारतात विकल्या गेल्या.सन २०१५ या वर्षांत २ कोटी लोकांनी परदेश प्रवास केला, १.७२ लाख व्यक्तींनी आपले उत्पन्न ५० लाखांहून अधिक असल्याचे नमूद केले आहे.

करचुकवेगिरीच्या माध्यमातून होणारी काळ्या पैशाची निर्मिती हे अर्थव्यवस्थेसमोरील आव्हान तर आहेच त्याच बरोबर तो सामाजिक धोका सुध्दा आहे. काळा पैसा लाचलुचपतीला आश्रय देतो, निवडणुकांमधील भ्रष्टाचाराला थारा देतो, संघटित गुन्हेगारीला स्थान देतो, दिमाखदार खरेदी डोळे दिपवून टाकते. परंतु यामुळे देशाचे आर्थिक नियोजन आणि वित्तीय क्षमतेचे मात्र विकृतचित्र उभे राहते. या साऱ्यांचा परिणाम देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विषमतेवर होतो. आता मात्र शासनाने कठोर उपाय योजना करण्यास गेल्या तीन वर्षांपासून सुरुवात केली आहे. अक्षरशः काळ्या पैशाविरुध्द युध्दच छेडले आहे.

या 'आर की पार'च्या लढाईत शासनाने धोरणात्मक पातळीवरील उपाययोजना सुरु केल्या आहेत. यासाठी प्रशासकीय तसेच नव्या कायदानुरुप योजना राबविण्यात येत आहेत. त्याच्या जोडीला परिणामकारक अंमलबजावणी करणे, क्षमतेत वाढ करणे, माहितीचा आधार घेत सुक्ष्म नियंत्रणाद्वारे अधिकाधिक लक्ष देऊन उद्दीष्ट्ये गाठणे यांचा समावेश आहे.

---

**आर्थिक सर्वेक्षण २०१६-१७ च्या माहितीनुसार भारतामध्ये प्रति १०० मतदारांच्या मध्ये करदात्यांची संख्या ७ इतकी आहे. करचुकवेगिरीवर चांगलाच प्रकाश पडला आहे. यातील काही सत्यता अशी की, गेल्या ५ वर्षांत सव्वा कोटी कार भारतात विकल्या गेल्या.सन २०१५ या वर्षांत २ कोटी लोकांनी परदेश प्रवास केला, १.७२ लाख व्यक्तींनी आपले उत्पन्न ५० लाखांहून अधिक असल्याचे नमूद केले आहे.**

---

**स्वच्छ अर्थव्यवस्थेकरिता 'प्रशासकीय कर सुधारणा'**

काळ्या पैशाविरुद्धच्या लढाईसाठी शासनाने खालील धाडसी उपाय योजना सुरु केल्या आहेत.

- मा. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. एम्.बी. शहा यांच्या नेतृत्वाखाली विशेष संशोधन गटाची (एस् आय टी ) काळया पैशाचा शोध घेण्याकरिता स्थापना केली आहे.
- काळा पैसा (अघोषित विदेशी उत्पन्न आणि मालमत्ता) आणि कर अधिरोपण कायदा २०१५ या कठोर दंडात्मक तरतूद असलेल्या कायद्यामध्ये ३ ते १० वर्षे सक्त मजुरीची तरतूद आहे. परदेशी लपवलेल्या काळ्या पैशासंदर्भात हा कायदा परिणाकारक काम करेल. कर चुकवेगिरी हा गुन्हा समजण्यात येईल. मनी लाँडरींग कायद्या अंतर्गत यावर कार्यवाही होईल.
- अनेक अडचणी असूनसुध्दा कराच्या कक्षा विस्तारल्यामुळे विदेशात अवैधरित्या ठेवलेले ८,१८६ कोटी रुपये, कराच्या जाळ्यात आले.
- पनामा पेपर्स संदर्भात जलदगतीने कार्यवाही व्हावी, सहकार्य असावे या उद्देशाने बहुविध गटांची (मल्टी एजन्सी ग्रुप) स्थापना करण्यात आली आहे.
- दुहेरी कर आकारणी प्रणाली टाळण्यासाठी - 'कर माहिती विनीमय करार' करण्यात आला असून बहुविध परिषदा घेऊन इतर देशांशी संबंध प्रस्थापिले जात आहेत.
- बहुविध सक्षम प्राधिकरण करारामध्ये सामील होऊन स्वयंचलित माहिती विनिमयाच्या माध्यमातून काळ्या पैशाविरोधात आंतरराष्ट्रीय समुदायाला पाठिंबा दिला.
- अमेरिकेच्या विदेशी खाते कर पालन कायद्याअंतर्गत करार करून माहितीची देवाण घेवाण सुरु केली.
- दुहेरी कर आकारणी, करासंबंधी दुरुपयोग, कर चुकवणे, तसेच आर्थिक दुरुपयोग थांबवणे या करिता, सिंगापूर, मॉरिशस, सायप्रस या देशांबरोबर करार झाले.
- पार्टिसिपेटरी नोटद्वारा विदेशी गुंतवणुकीला चालना मिळते खरी परंतु काळ्या पैशाच्या

निर्मिती साठी एक प्रवाही साधन देखील मिळते. एसआयटीने यावर शिक्कामोर्तब केले आहे.

• मनीलाँडरींगच्या माध्यमातून होणाऱ्या काळ्या पैशावर अंकुश ठेवण्यासाठी पार्टिसिपेटरी नोटस्च्या हस्तांतरणावर बंधने आणली असून सेबीने पार्टिसिपेटरी नोट्सच्या प्रकटीकरणासाठी मागण्या वाढवल्या आहेत.

• 'बेनामी व्यवहार (प्रतिबंध) दुरुस्ती कायदा २०१६' हा कायदा लागू झाल्याने शासनाला विशेष अधिकार प्राप्त झाले आहेत. अशा बेनामी मालमत्ता - मिळकती शासन कोणत्याही मोबदल्याविना जप्त करु शकते. बेनामी मालमत्ता खोट्या नावाने किंवा दुसऱ्याच्या नावाने खरेदी केलेल्या असतात. या कायद्याअंतर्गत ७ वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो. महसूल खात्याने २४५ बेनामी व्यवहार शोधले असून त्यातील १२४ बेनामी व्यवहाराची किंमत आहे तब्बल ५५ कोटी रुपये.

• २३०४५ शोध वा सर्वेक्षण कार्यक्रम राबवले गेले. (आयकर -१७५२५, सीमाशुल्क २५०९ केंद्रीय उत्पादन शुल्क १९१३, सेवाकर ११२०). यातून करचुकवेगिरीची उघड झालेली रक्कम आहे १.३७ लाख कोटी. (आयकर ६५४३४, सीमाशुल्क ११४०५, केंद्रीय उत्पादन शुल्क १३९५२ सेवाकर ४२७२७)

• या अंतर्गत २८१४ कायदेशीर कारवायांमध्ये ३८९३ व्यक्तींना अटक करण्यात आली.

• अंमलबजावणी संचालनालयाने ५१९ कारवायांची नोंद केली आहे. ३९६ शोध मोहिमा हाती घेतल्या आहेत. ७९ खटल्यांमध्ये अटक करण्यात आली आहे. १४९३३ कोटींच्या मालमत्तेला सील ठोकले आहे.

• ६४२७५ व्यक्तींनी आयकर घोषणा योजनेअंतर्गत (आय डील एस-२०१६) एकूण ६५२५० कोटींची मालमत्ता उघड केली. काळा पैसा लपवण्याऱ्यांना ही एक संधी दिली होती.

अर्थसंकल्प २०१७-१८ बदल - उत्स्फूर्त आणि स्वच्छ भारत.

काळ्या पैशावर आसूड ओढताना मा. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पादरम्यान खालील उपाययोजना सुचवल्या आहेत.

---

**'बेनामी व्यवहार (प्रतिबंध) दुरुस्ती कायदा २०१६' हा कायदा लागू झाल्याने शासनाला विशेष अधिकार प्राप्त झाले आहेत. अशा बेनामी मालमत्ता - मिळकती शासन कोणत्याही मोबदल्याविना जप्त करु शकते. बेनामी मालमत्ता खोट्या नावाने किंवा दुसऱ्याच्या नावाने खरेदी केलेल्या असतात. या कायद्याअंतर्गत ७ वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो. महसूल खात्याने २४५ बेनामी व्यवहार शोधले असून त्यातील १२४ बेनामी व्यवहाराची किंमत आहे तब्बल ५५ कोटी रुपये.**

---

• रु.१०००० पर्यंतच्या रोखीचा खर्च धंद्याच्या उत्पन्नातून वजावट करण्यास मुभा देण्यात आली आहे.

• विश्वस्त संस्था - देणगी दाखल रु. २००० इतकीच रक्कम एका स्त्रोताकडून स्विकारु शकतील.

• कोणत्याही एका व्यवहाराकरिता रु. २लाख इतकीच रक्कम रोखीने देता येईल. उल्लंघन झाल्यास तितकीच रक्कम दंड म्हणून आकारण्यात येईल.

• कृषी क्षेत्राला वित्तपुरवठा करणा-या सहकारी संस्थांचा उपयोग काळा पैसा लपवण्याकरता केला जातो या करिता या संस्थाना जिल्हा बँकेच्या पायाभूत बँकींग प्रणालीशी जोडून घ्यावे लागेल.

• आर्थिक गुन्हेगारीचा संबंध असणारी मालमत्ता आणि गुन्हे करुन परदेशी पळून गेलेल्या गुन्हेगारांची मालमत्ता, ते देशातील कायद्याला समर्पण करीत नसल्यास जप्त करुन सरकारजमा करण्याचे विधेयक विचाराधीन आहे.

• आयकर विवरण पत्र सादर करताना, पॅनकार्ड काढताना आधारकार्डाची सक्ती केली आहे. याचा उद्देश असा की खोटी पॅनकार्ड काढणाऱ्यांना आपोआपच चाप बसेल. केवायसी व्हेरीफिकेशनला अधिक बळकटी येईल. नवीन बँक खाती काढणाऱ्यांनाही हा नियम लागू असेल.

**प्रामाणिक करदात्यांना बक्षिसी**

शासन कराचा पाया विस्तृत करु इच्छिते. शाश्वत व स्थिर करप्रणाली असावी असे शासनाला वाटते. या करिता शासनाने प्रशंसात्मक पावले उचललेली आहेत. सुयोग्य प्रकारच्या कर प्रशासनासाठी धोरणात्मक बदल घडवण्याचे देखील ठरवले आहे.

• जनतेशी असलेली बांधिलकी लक्षात घेऊन शासन पूर्वलक्षी प्रभावाने कायदे राबविण्याचे धोरण अवलंबवत आहे. शासनाने स्पष्ट शब्दात सावधानता बाळगण्याचे

तसेच न्यायपूर्ण वर्तनाचे आश्वासन दिले आहे.

- करदात्यांचा त्या-त्या विभागाशी प्रत्यक्ष संबंध येऊ नये. वेळ, पैसा यांची बचत व्हावी या दृष्टीकोनातून शासनाने ७ शहरांमध्ये 'इ' करनिर्धारण पध्दती लागू केली आहे.

- सन २०१५ मध्ये इ-सहयोग पध्दती सुरु केली आहे. आयकर खात्याची ही ऑनलाईन तंत्र पध्दती असून खासकरुन छोट्या करदात्यांनी भरलेल्या रिटर्नसमध्ये असलेल्या त्रुटी याद्वारे दूर करता येतील. यातून वेळ व पैसा यांची बचत होईल.

- उद्योग आणि व्यापार यांच्या सहयोगाने स्थापलेल्या उच्चस्तरीय समितीने शिफारस केलेल्या सूचनांद्वारा सीबीटीडी तसेच सीबीईसी वेळोवेळी करकायद्यांविषयी स्पष्टीकरण देईल.

- देशी करदाते आयकर संबंधात आपले दायित्व आगावू प्राप्त करुन घेऊ शकतात.

- आयकर आयुक्तांच्या आयकर संबंधातील पूर्ततेची व्याप्ती वाढविण्यात आली असून अधिकाधिक करदाते संधीचा फायदा घेऊ शकतात.

- पंतप्रधान कार्यालयाच्या देखरेखीखाली 'मध्यवर्ती जनता तक्रार निवारण मंच ' तसेच देखरेखप्रणाली (सीपीजी आर ए एम एस ) व ई- निवारण पोर्टलची प्रणाली सुरु करण्यात आली असून कालमर्यादेत तक्रारनिवारण करावे लागणार आहे.

- ठराविक करदात्यांसाठी 'सहज' नावाचा एकपानी आय टी आर फॉर्म तयार करण्यात आला आहे.

- आयकरविभाग प्रकल्पावर काम करत असून करप्रणालीची पूर्तता आणि प्रभावी संशोधन करण्याच्या कामी हा प्रकल्प सहाय्यभूत ठरणार आहे.

नोटाबंदीः- उच्चमूल्याच्या रुपये ५०० तसेच रु १००० च्या नोटांवर बंदी आणून त्याची सद्दी संपविण्यात आली आणि करचुकवेगिरीच्या त्याचप्रमाणे भ्रष्टाचाराचे मूळ असलेल्या बाबींवर आघात करण्यात आला आहे. याचा उद्देश बनावट चलनी नोटांचा प्रतिकार करणे हा सुध्दा होता. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेतील डिजिटलायझेशन वाढविणे, बचतीचा ओघ वाढविणे, अर्थव्यवस्थेत आमुलाग्र बदल घडविणे या सर्वांपेक्षाही अधिकाधिक महत्वाचे म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे, करप्रणालीमध्ये सुधारणा करुन करमहसूल वाढविणे हे उद्देश होते.

**उपलब्ध माहितीनुसार असे दिसून आले की नोटाबंदीच्या काळात १ कोटी नऊ लाख खात्यांमध्ये ५.४८ लाख कोटी रु. जमा झालेले आहेत. सदर रक्कम ही २ लाख ते ८० लाख रु. च्या दरम्यान विविध खात्यांमध्ये भरली गेली होती. सुमारे ४.८९ लाख कोटी अशी रक्कम जी ८० लाखापेक्षा अधिक अशा १.४८ लाख खात्यांमध्ये भरली गेली होती.**

नोटाबंदीनंतरच्या काळात असे दिसून आले की बँकींग प्रणालीमध्ये संपूर्ण रोखरक्कम आली असून विविध प्राधिकरणांना त्याचा मागोवा घेणे शक्य होणार आहे. संशोधनाअंती असे दिसून आले की ज्या काही रोख रकमा खात्यामध्ये जमा झाल्या आहेत त्या चुकीच्या पध्दतीने जमा केलेल्या ठेवी होत्या. ज्यामध्ये पूर्वीच्या तारखांना विक्री दाखविणे, बेनामी जमा रकमा, दागदागिन्यांची तसेच सोन्याची विक्री दाखविणे, आलिशान मालाची खरेदी तसेच विदेशी चलन, असे व्यवहार जे आयकर खात्याच्या पॅनच्याआधारे केलेले नाहीत अशा व्यक्तींची ओळख पटलेली नाही. तसेच बिले विभागून दाखविण्याचा प्रकार देखील घडलेला आहे. केवायसीची पूर्तता न करता उघडण्यात आलेल्या सहकारी बँकांमधील खात्यात रकमा जमा केलेल्या आहेत. एकाच पॅनकार्डच्या आधारे अनेक खात्यांमध्ये रकमा जमा करण्यात आलेल्या आहेत.

उपलब्ध माहितीनुसार असे दिसून आले की नोटाबंदीच्या काळात १ कोटी नऊ लाख खात्यांमध्ये ५.४८ लाख कोटी रु. जमा झालेले आहेत. सदर रक्कम ही २ लाख ते ८० लाख रु. च्या दरम्यान विविध खात्यांमध्ये भरली गेली होती. सुमारे ४.८९ लाख कोटी अशी रक्कम जी ८० लाखापेक्षा अधिक अशा १.४८ लाख खात्यांमध्ये भरली गेली होती. ऑपरेशन क्लीन मनी थोडक्यात पैशाची स्वच्छता या मोहिमेतंर्गत आयकर खात्यांत ई-मेल तसेच इतर विविध माध्यमातून १८ लाख करदात्यांना पहिल्या सत्रामध्ये सुचित केले आहे. याला १२ लाख लोकांनी ई-फायलिंगद्वारे प्रतिसाद दिलेला आहे. अशा कृत्यामुळे आयकरखात्याला वास्तववादी केसेस च्या नजरेतून पहाता येणार आहे. राज्यसभेतील लेखी उत्तरात अर्थमंत्र्यानी नमूद केले आहे की आयकर खात्याने ६०० कोटी

रुपयांची रोख तसेच मौल्यवान वस्तू जप्त केलेले आहेत. याकरिता ११०० करदात्यांचे सर्वेक्षण आणि शोध घेण्यात आला आहे. नोटाबंदीनंतरची ही महत्त्वपूर्ण कामगिरी आहे.

एक संधी द्यावी या उद्देशाने शासनाने 'प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना'ची घोषणा केली. या घोषणेअंतर्गत (३१ मार्च २०१७ पर्यंत) जी व्यक्ती स्वतहून आपल्या जमा रकमेसंबंधी विवरण देईल त्याच्याकडून त्या रकमेच्या ५०% कर वसूल केला जाईल आणि २५% रक्कम बिनव्याजी चार वर्षांकरिता प्रधानमंत्री गरीब कल्याणकारी योजनेमध्ये जमा करण्यात येईल. या संदर्भात अधिकृत कोणतीही माहिती अद्याप मिळालेली नाही. आकडेवारी कोणतीही असो यातील हे महत्वाचे आहे की सामान्य जनतेच्या हाती अशा तऱ्हेची रोख रक्कम होती, आणि आज तिला अर्थव्यवस्थेत स्थान मिळाले आहे.

डिजिटल अर्थव्यवस्थाः अर्थव्यवस्थेमध्ये असलेल्या मोठ्या प्रमाणातील रोखते मुळे करचुकवेगिरी होते. सन २०१५च्या पीडब्ल्यूसीच्या अहवालानुसार ९८% व्यवहार (आकारमानानुसार) आणि एकूण व्यवहारानुसार ६८% हे भारतातमध्ये रोखीने करतात. नोटाबंदीनंतर मात्र अशा मोठ्या व्यवहारांना डिजिटल व्यवहाराचे स्वरुप मिळत असून त्याला चांगलीच चालना मिळत आहे. डिजिटल अर्थव्यवस्थेचे अनेकविध फायदे आहेत. त्यामुळे अधिकाधिक पारदर्शकता येत आहे. मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार असलेल्या देशांमध्ये ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलच्या अहवालानुसार एकूण व्यवहाराच्या १०% पेक्षा कमी व्यवहार रोखीमध्ये केले जातात. अशा देशांमध्ये भारताचा नंबर 79 वा आहे.

राष्ट्रीय देयक महामंडळाने युनिफाईड पेमेंट्स इंटरपेजच्या माध्यमातून यशस्वीरित्या अंमलबजावणी केलेली आहे. ज्याद्वारे इंटरऑपरेटॅबिलिटीची सुविधा मिळू शकते. 'भीम' (१ कोटी ९६ लाख लोकांनी) डाऊनलोड केलेले आहे. आणि 'आधार' च्या माध्यमातून 'पीअर टू पीअर व्यवहार ' आणि डिजिटल पेमेंट्सचा वापर केला जात आहे.

**संपूर्ण भारतात वस्तू व सेवाकरासंदर्भात एकच बाजारपेठ असेल. करप्रशासन सुरळीतपणे करता येईल. केंद्र तसेच राज्यशासनाने लावलेले कस्टमड्युटी वगळता सारे अप्रत्यक्ष कर दूर होतील. संसदेमध्ये सादर केलेल्या जीएसटी संदर्भातील चार विधेयके पारित झाल्यानंतर जीएसटी लागू होण्याची तारिख १ जुलै आपण गाठू शकू. माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करुन जीएसटीचा कौशल्यपूर्ण वापर करत करचुकवणाऱ्यांना दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाईला तोंड द्यावे लागेल.**

भविष्यकालिन आशादायक चित्र यामुळे निर्माण झाले आहे. युपीआय - युनिफाईड पेमेंट इंटरफेसच्या माध्यमातून व्यवहारांमध्ये २०% वाढ होऊन हा व्यवहार २००० कोटी झालेला आहे, अस रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या माहितीनुसार दिसते.

डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने आयकर खात्याने विनारोखीच्या व्यवहारावर लहान आणि मध्यम करदात्यांसाठी उलाढालीच्या मर्यादा २ कोटी इतपत ठेपली असून त्याचे प्रमाण ८% वरुन ६% इतपत खाली आलेले आहे. त्याचप्रमाणे शासनाने बीसीडी, एक्साईज सीव्ही ड्युटी आणि पीओएस आणि मायक्रो एटीएम्स वरील कर काढून टाकले आहेत.

शासनाने पॅनकार्डला आधार जोडणी सक्तीची केलेली आहे. यापुढील पायरी म्हणजे पन्नास हजारावरील रोख व्यवहारांसाठी आधार कार्डाचे प्रमाणीकरण सक्तीचे होणार आहे.

**जीएसटी अर्थात वस्तू व सेवा कर**

करसुधाणांच्या संदर्भात किचकट अशा अप्रत्यक्ष करासंबंधात स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्वपूर्ण सुधारणा म्हणजे जीएसटी होय. याचा मुख्य उद्देश्य ही करप्रक्रिया अधिकाधिक सोपी व सुटसुटीत होईल असा आहे. यामुळे संपूर्ण भारतात वस्तू व सेवाकरासंदर्भात एकच बाजारपेठ असेल. करप्रशासन सुरळीतपणे करता येईल. केंद्र तसेच राज्यशासनाने लावलेले कस्टमड्युटी वगळता सारे अप्रत्यक्ष कर दूर होतील. संसदेमध्ये सादर केलेल्या जीएसटी संदर्भातील चार विधेयके पारित झाल्यानंतर जीएसटी लागू होण्याची तारिख १ जुलै आपण गाठू शकू. माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करून जीएसटीचा कौशल्यपूर्ण वापर करत करचुकवणा-यांना दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाईला तोंड द्यावे लागेल. भारतामध्ये नजीकच्या

भविष्यात राष्ट्रीय उत्पन्नात कराचे गुणोत्तर निश्चितपणे वाढलेले दिसेल. योग व्यापाराविषयी माहितीचा वापर करुन प्रत्यक्ष कराचे सुसुत्रीकरण होऊ शकेल.

**निवडणूक फंड सुधारणाः** राजकीय पक्षांनी अज्ञात स्त्रोतांकडून २००४-०५ ते २०१४-१५ याकाळात ७८३३ कोटी रुपये मिळविले. ही रक्कम त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या ६९% एवढी होती. असोसिएशन ऑफ डेमॉक्रेटिक रिफॉर्मच्या अहवालामध्ये ही माहिती नमूद केली असून अज्ञात स्तोत्राविषयी आपल्याला विचार करावा लावणार आहे. उद्योगजगत तसेच व्यापारी आस्थापने राजकीय पक्षांना गुप्तपणे वित्तपुरवठा करुन स्वार्थासाठी स्वतःचे व्यासपीठच निर्माण करतात. राजकीय पक्ष आणि उद्योगसमूह यांच्यामध्ये परस्परसंबंध प्रस्थापित होतात. त्याची परतफेड म्हणून राजकीय पक्षांना त्यांच्या इच्छेनुसार फायदे पोचवावे लागतात. त्यामुळे लोकशाही आणि लोकांचा विश्वासघात होतो आणि म्हणून स्वच्छ अर्थव्यवस्था हवी असेल तर राजकीय देणग्यांमध्ये पारदर्शकता आणावीच लागेल.

याची एक सुरुवात म्हणून २०१७ च्या अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही एका स्त्रोतांकडून मिळणाऱ्या रोख रक्कमेच्या देणग्यांची रक्कम २०००रु. पर्यंत मर्यादित ठेवलेली आहे. निवडणूकीच्या फंडाकरिता बाँड काढण्याची कल्पना मांडण्यात आली आहे. जेणेकरुन देणा-याचा उद्‌देश्य तर कळेलच परंतु अशा रकमेचा मागोवाही घेता येईल.

भ्रष्टाचाराला आळा - स्वातंत्र्योत्तर काळात अनेकविध कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या. त्यांचा उद्देश एवढाच होता की या योजनांची फळे गरीब आणि गरजू जनतेला मिळावीत. परंतु वाढलेल्या भ्रष्टाचारामुळे या योजनांना तडे तर गेलेच आणि संबंध नसलेल्यांचे खिसे मात्र भरले. २०१५-१६ च्या आर्थिक सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की सार्वजनिक वितरण सेवेतील ४० ते ५०% धान्य हे गैरलाभार्थीच्या पदरात पडते.याकरिता शासनाने अभिनव योजना राबविली असून डीबीटी म्हणजे डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर चे तंत्र विकसित करुन लाभार्थीच्या खात्यामध्ये हे अनुदान जमा करण्यात येते. यामुळे भ्रष्टाचाराला आपोआपच आळा बसतो. २०१४ मध्ये गरीब व वंचिताकरिता बँकांची दरवाजे खुले करण्यात आले. डीबीटी सारख्या योजनेचा पाया अशाप्रकारे घालण्यात आला. जनधन योजना (सुमारे २५.७ कोटी खाती), आधार (११२ कोटी नोंदणी), मोबाईल या तिन्हीच्या माध्यमातून पारदर्शकता आणि सर्वसमावेशकता याचा पाया घालण्यात आला आहे.

**राजकीय पक्षांनी अज्ञात स्त्रोतांकडून २००४-०५ ते २०१४-१५ याकाळात ७८३३ कोटी रुपये मिळविले. ही रक्कम त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या ६९% एवढी होती. असोसिएशन ऑफ डेमॉक्रेटिक रिफॉर्मच्या अहवालामध्ये ही माहिती नमूद केली असून अज्ञात स्तोत्राविषयी आपल्याला विचार करावा लावणार आहे. उद्योगजगत तसेच व्यापारी आस्थापने राजकीय पक्षांना गुप्तपणे वित्तपुरवठा करुन स्वार्थासाठी स्वतःचे व्यासपीठच निर्माण करतात.**

अहवालानुसार सद्यस्थितीत १७ मंत्रालयातील ८४ योजना डीबीटी अंतर्गत जोडल्याआहेत. शासनाचे सुमारे ५० हजार कोटी रुपयांची बचत यामुळे झाली आहे. लाभार्थींची यादी सादर करण्यात येणार असून कोणीही व्यक्ती त्याची पडताळणी करु शकेल. शासनाचे हे पाउढल अधिकाधिक पारदर्शकतेकडे नेणारे आहे.

शासनाने व्यवस्थेत बदल करताना आणखी एक प्रक्रिया सोपी - सुटसुटीत केली आहे ज्यामुळे मोठ्या प्रमाणात होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा बसेल. ती म्हणजे, लिलाव पध्दतीची सक्ती. नैसर्गिक स्त्रोतांचे वाटप करताना ही पध्दत आता अवलंबली जाते.

शासनाने या करिता, खाण आणि खनिज (विकास आणि नियमावली) कायदा याचा विस्तार केला आहे. त्याचप्रमाणे शासनाने इ-मार्केट स्पेस ही पध्दती वस्तू व सेवा यासाठी सुरु केली आहे. विविध मंत्रालये खाती सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या, स्वायत्त संस्था आदी वस्तू व सेवा खरेदी करु शकतात. अशा उपाय योजनांमुळे भ्रष्टाचाराच्या मुळावरच आघात करता येतो. त्याचप्रमाणे राष्ट्रउभारणीच्या कार्यात मोलाची भर घालता येते.

न संपणाऱ्या बाबीः स्वच्छ भारत संकल्पनेबद्दल शासनाच्या धाडसी निर्णाची प्रशंसा करताना तसेच काही बाबतीत शासनाला दोषी मानताना पुढील काही उपाय योजणे गरजेचे आहे. त्यामुळे शाश्वत व सुयोग्य उपाययोजना करता येतील. अर्थात या प्रातिनिधीक उपाययोजना असून ही उपायांची संपूर्ण यादी नव्हे.

• करकायदे साधे व सुटसुटीत करणे. तसेच ही प्रक्रिया विनाअट भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाच्या माध्यमातून राबवावी.कोणत्याही प्रकारच्या वादविवादाला कमीतकमी स्थान असावे. २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये करासंबंधीची ३ लाख दावे प्राधिकरणाकडे वर्ग असल्याचे नमूद केलेले आहे. या दाव्यांची एकत्रित रक्कम साडेपाच लाख कोटी इतकी आहे.

• कायद्यातील पळवाटा हा गंभीर विषय असून त्या दृष्टीने कायदे अधिक सक्षम करायला हवेत. गेल्या अनेक वर्षाच्या काळात बनावट कंपन्या भूछत्राप्रमाणे वाढल्या आहेत. कॉर्पोरेट प्रक्रियेचा गैरवापर सुरु आहे. एकाच पत्त्यावर शेकडो कंपन्यांची नोंदणी केली आहे. अपेक्षेप्रमाणे त्यांचे भाग भांडवल कमी असते. एखादी व्यक्ती कामावर असते किंवा नसतेही, संचालक पदाला तर काही अर्थच नसतो.या कंपन्यांनी अनेक वर्षापासून आपली एक बेमालूम कार्यपध्दती विकसित केली आहे. खोटी बिले तयार करणे, खोटे भाग भांडवल देणे, खोटी कर्ज प्रकरणे, सरतेशेवटी खोटे आर्थिक व्यवहार दाखवणे इ. आकडेवारीच्या पध्दतीत यांना शोधणे कठीण आणि शोधले तरी त्यांच्या वरील गुन्हे सिध्द होणे कठीण. प्रस्थापित व्यवस्थाही अपूरी आहे. सन २०१३-१४ ते २०१५-१६ या कालावधीत ११५५ खोट्या कंपन्यांची प्रकरणे शोधून काढली. २२००० गैरलाभार्थीची साखळी शोधून काढली. यामध्ये १३३०० कोटींचा अवास्तव व्यवहार झाल्याचे दिसून आले. या कंपन्यावर दाखल केलेल्या खटल्यांमध्ये संमिश्र असे यश मिळाले. अशा तऱ्हेच्या गुह्यांसाठी आपल्याला सुयोग्य प्रकारे विचार करावा लागेल. अशा कंपन्यांची वेगळी व्याख्या करावी लागेल. त्यांचे खोटे आर्थिक व्यवहार हे संघटित गुन्हे मानूण. योग्य त्या कायद्याअंतर्गत त्यांच्यावर कारवाई करावी लागेल.

• करखात्यातील कर्मचारी आणि करदाते यांचा संबंध कमी यावा. जो काही संबंध येईल तो पूर्व परवानगीने आणि शासकीय प्रक्रिया पार पाडूनच व्हावा. वरिष्ठ अधिकाऱ्यांना चुका दुरुस्त करण्याची संधी द्यायला हवी. आयकर खात्याने ई-असेसमेंटबद्दल घेतलेला पुढाकार हे या मधील योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे.

**शासनाने भ्रष्टाचाराविरुध्द लढायचे धाडसी पाऊल उचलले आहे. त्याचा अर्थव्यवस्थेवर चांगला परिणाम दिसून आला आहे. ही मोहिम अशा तऱ्हेने जोमदारपणे व नवनवीन कल्पना राबवून चालू राहिली तर आर्थिक फायदे गरिबांपासून ते श्रीमंतांपर्यंत पोहोचतील.दारिद्रय निर्मूलन होईल. रोजगार निर्मिती होईल. त्याचप्रमाणे कौशल्याच्या अधिकाधिक संधी साधता येतील. या स्थित्यंतरातून जाताना आपल्याला कष्ट घ्यावे लागतील.**

• द फायनान्शिअल ॲक्शन टाक्स फोर्स (एफ ए टी एफ) याचा भारत सदस्य आहे. या संस्थेने अशी शिफारस केली आहे की त्या-त्या राष्ट्रांनी आपल्या आर्थिक संस्थाचे राजकीय नेत्यांशी असलेले संबंध तपासून पहावेत आणि या संदर्भातील योग्य ती धोका व्यवस्थापन प्रणाली लागू करुन घ्यावी. ही एक प्रतिबंधात्मक उपाय योजना ठरु शकेल.

• केंद्रशासन आणि राज्यशासन यांच्यामध्ये करविषयक समन्वय हवा.

**शाश्वत प्रयत्नांची आवश्यकता**

शासनाने भ्रष्टाचाराविरुध्द लढायचे धाडसी पाऊल उचलले आहे. त्याचा अर्थव्यवस्थेवर चांगला परिणाम दिसून आला आहे. ही मोहिम अशा तऱ्हेने जोमदारपणे व नवनवीन कल्पना राबवून चालू राहिली तर आर्थिक फायदे गरिबांपासून ते श्रीमंतांपर्यंत पोहोचतील.दारिद्रय निर्मूलन होईल. रोजगार निर्मिती होईल. त्याचप्रमाणे कौशल्याच्या अधिकाधिक संधी साधता येतील. या स्थित्यंतरातून जाताना आपल्याला कष्ट घ्यावे लागतील. त्यासाठी त्याग करावा लागेल. त्यागाशिवाय काहीही मिळू शकत नाही. अर्थकारणात पारदर्शकता आणि स्वच्छता आणण्याकरिता आपल्याला ही छोटीशी किंमत द्यावी लागेल.

■ ■ ■

*श्रीमती एम व्ही भानुमती ह्या भारतीय महसूल सेवेच्या ज्येष्ठ अधिकारी आहेत. सध्या त्यांच्याकडे आयकर संचालक (संशोधन) हे पद आहे. त्या नवी दिल्ली येथे कार्यरत आहेत. तर श्री. रोहित देव झा हे देखील भारतीय महसूल सेवा, नवी दिल्ली येथे सहाय्यक संचालकपदी कार्यरत आहेत.*

*email: bhanumathi@incometax.gov.in*

*rohit.d.jha@incometax.gov.in*

# डिजिटल इंडिया कार्यक्रम

डॉ ओमकार राय




**जागतिक संदर्भानुसार समाजात बदल घडत आहेत, अशा वेळी तंत्रज्ञान विशेषतः माहिती-तंत्रज्ञानात झपाट्याने क्रांती होणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच प्रत्येक नागरिकाला प्रशासनात सहभागी होता यावे यासाठी त्यांना डिजिटली जोडून, माहिती तंत्रज्ञान हा विकासाचा प्रमुख घटक व्हावा यासाठी सरकार तत्पर आहे. नागरिकांना डिजिटली सक्षम करून प्रशासनात,पारदर्शकता आणण्यासाठी, त्यांना माहितीपर्यंत पोहोचता यावे यासाठी सध्याचे सरकार प्रयत्नशील आहे.**

सर्वसमावेशी, उत्तरदायी, पारदर्शी सरकारसाठी, या सर्वात मोठ्या लोकशाहीच्या नागरिकांना डिजिटल साक्षर करण्याची साद,डिजिटल इंडिया घालत आहे.

प्रत्येक नव्या गोष्टीची सुरवात होण्यामागे एक कारण असते. असे कारण, ज्यामुळे समाजाच्या मूलभूत तत्वांच्या विशेषाधिकाराचे अतिशय कल्पक अशा आधुनिक जाणिवेसह परिवर्तनशील कल्पनेचे बीज रोवले जाते. जागतिक अर्थव्यवस्थेतला महत्वाचा घटक म्हणून भारत झपाट्याने पुढे येत आहे, अशा काळात, समावेशी लोकशाहीकडे आगेकूच करणे भारतासाठी अनिवार्य ठरते; अशी लोकशाही जिथे, जनतेला माहिती घेण्यासाठी, सरकारच्या धोरणावर चर्चा करण्यासाठी, वेगवेगळ्या सामाजिक आणि आर्थिक स्तरातल्या लोकांना धोरण तयार करण्यात आपले योगदान देण्यासाठी, आवश्यक यंत्रणा उपलब्ध आहे, प्रशासन ही एकतर्फी प्रक्रिया नव्हे, तर ती सर्वसमावेशी,चर्चात्मक आणि सह निर्मितीची प्रक्रिया आहे. भारतासारख्या प्रगतीशील आणि युवावर्ग मोठ्या प्रमाणात असलेल्या देशात, सामाजिक- आर्थिक निर्देशांक उंचावण्यासाठी मोठ्या परिवर्तनाचा विचार करणे उचित ठरेल.

जागतिक संदर्भानुसार समाजात बदल घडत आहेत, अशा वेळी तंत्रज्ञान विशेषतः माहिती-तंत्रज्ञानात झपाट्याने क्रांती होणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच प्रत्येक नागरिकाला प्रशासनात सहभागी होता यावे यासाठी त्यांना डिजिटली जोडून, माहिती तंत्रज्ञान हा विकासाचा प्रमुख घटक व्हावा यासाठी सरकार तत्पर आहे. नागरिकांना डिजिटली सक्षम करून प्रशासनात,पारदर्शकता आणण्यासाठी, त्यांना माहितीपर्यंत पोहोचता यावे यासाठी सध्याचे सरकार प्रयत्नशील आहे. म्हणूनच गरीब, श्रीमंत अशा सर्वच नागरिकांसाठी, सुप्रशासनाच्या केंद्रस्थानी डिजिटल इंडिया आणण्याला सरकारचे प्राधान्य आहे.

**डिजिटल इंडिया कार्यक्रमामागचा दृष्टिकोन**

प्रत्येक कार्यक्रमामागे एक दृष्टिकोन असतो. सध्याची प्रशासन व्यवस्था आणि सार्वजनिक सेवा

यांची माहिती तंत्रज्ञानाशी सांगड घालून कायापालट घडवून आणण्याचा सरकारचा डिजिटल इंडिया अभियानामागचा उद्देश आहे. इंडियन टॅलेंट (IT) भारतीय प्रतिभा, इंडियन टेक्नॉलॉजी (IT) भारतीय तंत्रज्ञान, इंडिया टुमारो (IT) उद्याचा भारत या शीर्षकाखाली भारताला डिजिटल बनवण्यावर भर दिला जात आहे. डिजिटल इंडिया तीन मुख्य विभागांवर आधारलेला आहे. प्रत्येक नागरिकासाठी मूलभूत सेवा म्हणून डिजिटल पायाभूत सोयी सुविधा, मागणीनुसार सेवा आणि प्रशासन, नागरीकांचे डिजिटल सक्षमीकरण.

पायाभूत सोयी सुविधा ही प्रत्येक नागरिकासाठी मूलभूत सेवा आहे. हा दृष्टिकोन डिजिटल इंडियाचे व्यापक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपयुक्त ठरतो. उत्तम सेवेसाठी, उत्तम जोडले गेलेले असणे ही पूर्व अट आहे. दुर्गम भागातल्या भारतीयालाही ब्रॉडबँड आणि जलदगती इंटरनेट उपलब्ध करून त्याद्वारे जोडण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. यामुळे प्रत्येक नागरिकाला ई-प्रशासन सेवा देण्याबरोबरच सामाजिक लाभ आणि आर्थिक समावेशकता साध्य होईल. दुसरा विभाग आहे, मागणीनुसार सेवा आणि प्रशासन. या मधे प्रशासकीय प्रक्रियांतली पारदर्शकता आणि गती यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. अनेक राज्य सरकारांनी दशकांपासून ई प्रशासनासाठी सुरवात केली असली तरी सरकारी योजना आणि कार्यक्रम यात नागरिकांच्या समावेशाबाबत अद्यापही प्रगती सुरु आहे. राज्य आणि केंद्र सरकारने कागदपत्रविषयक कामकाजाचे संगणकीकरण सुरु केले आणि धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेचे आधुनिकीकरण केले तेव्हा भारतात ई प्रशासनाला सुरवात झाली.

तिसरा विभाग नागरिकांच्या डिजिटल सक्षमीकरणावर भर देतो. डिजिटली जोडले गेल्यामुळे सर्व नागरिक एकसमान स्तरावर राहण्यासाठी मदत होते. लोकसंख्याविषयक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात वेगवेगळ्या स्तरावरचे भारतीय आज डिजिटलदृष्ट्या सक्षम आहेत यासाठी इंटरनेट आणि मोबाईल क्रांतीचे आभार. डिजिटल साक्षरता, डिजिटल संसाधने, सहयोगपूर्ण डिजिटल मंच यावर लक्ष केंद्रीत करून डिजिटल दृष्ट्या सक्षम समाज असलेल्या भारतात परिवर्तन करण्याचे डिजिटल इंडिया कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

**दुर्गम भागातल्या भारतीयालाही ब्रॉडबँड आणि जलदगती इंटरनेट उपलब्ध करून त्याद्वारे जोडण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. यामुळे प्रत्येक नागरिकाला ई-प्रशासन सेवा देण्याबरोबरच सामाजिक लाभ आणि आर्थिक समावेशकता साध्य होईल. दुसरा विभाग आहे, मागणीनुसार सेवा आणि प्रशासन. या मधे प्रशासकीय प्रक्रियांतली पारदर्शकता आणि गती यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.**

### डिजिटल इंडिया कार्यक्रमाची उभारणी

कोणत्याही कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी,त्याच्या ठोस बांधणीची गरज असते. डिजिटल इंडिया उपक्रम सर्वाधिक प्रभावशाली ठरावा यासाठी डिजिटल इंडियाचे नऊ स्तंभ असल्याचे सरकारने म्हटले आहे. यातला प्रत्येक स्तंभ या उपक्रमाला आधार देण्याबरोबरच हा उपक्रम यशस्वी ठरण्यासाठी योगदानही देतो.

'ब्रॉड बँड हायवे' हा डिजिटल इंडियाचा पहिला स्तंभ आहे. यामध्ये नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क द्वारे २.५ लाख ग्राम पंचायती जोडण्याची योजना आहे. यामुळे ग्रामीण जनता, सरकारच्या योजनांविषयी प्रभावी आणि सुलभपणे जाणून घेण्यासाठी सक्षम होईल. नॅशनल ऑप्टिकल फायबरसाठी सरकारने,१००० कोटी रुपये भागभांडवल असलेल्या, भारत ब्रॉडबँड नेटवर्क लिमिटेडची निर्मिती केली आहे. ६४१ जिल्ह्यातल्या ६,६०० विभागातल्या २,५०,००० ग्रामपंचायती जोडण्यासाठी नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्क उभारण्याचे काम भारत ब्रॉडबँड नेटवर्ककडे सोपवण्यात आले आहे.

दुसरा स्तंभ आहे सार्वत्रिक मोबाईल कॅनेक्टिव्हिटी. देशातल्या ज्या भागांना मोबाईल कनेक्टिव्हिटी नाही अशा सर्व भागांना कनेक्टिव्हिटी पुरवण्याचा उद्देश आहे. सध्या सुमारे ४२,००० खेड्यात मोबाईल कव्हरेज नाही.२०१४-१८ या काळासाठी १६,००० कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पासाठी दळणवळण खाते नोडल एजन्सी म्हणून काम पाहणार आहे. यांवरून २०१८ पर्यंत संपूर्ण भारतात मोबाईल कव्हरेज प्राप्त होईल असे सूचित होते.

जनतेसाठी इंटरनेट वापर शक्य होण्यासाठी कार्यक्रम, हा तिसरा स्तंभ आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक याप्रमाणे २.५ लाख सामायिक सेवा केंद्रे निर्माण करण्याचा सरकारचा मानस आहे.सद्यस्थितीला भारतात, १.६२ लाख पंचायतीमध्ये २.४२ लाख सामायिक सेवा केंद्रे आहेत.सरकारी आणि व्यापारी सेवा देण्यासाठी बहू-कार्यात्मक म्हणून ही केंद्रे काम करतील.

चौथा स्तंभ आहे, ई प्रशासन - तंत्रज्ञानाद्वारे प्रशासनात सुधारणा. यामुळे विविध सरकारी विभागातल्या सेवा अधिक प्रभावी रित्या देण्यासाठी,याबाबतची प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा सरकारकडून वापर करण्यासाठी मदत होते.

डिजिटल इंडिया कार्यक्रमाचा पाचवा स्तंभ आहे, ई-क्रांती - इलेक्ट्रॉनिक सेवा देणे. भारतातल्या सर्व नागरिकांना उत्तम प्रशासन देण्यासाठी, ई प्रशासन आणि एम प्रशासन उपयुक्ततेचा विचार करणे. प्रशासनातल्या परिवर्तनासाठी ई प्रशासनात रूपांतर हा दृष्टिकोन ई क्रांतीद्वारे बाळगला जातो. ई क्रांती अंतर्गत आधीच ४४ प्रकल्प अभियान म्हणून राबवले जात आहेत. सद्यस्थितीला ई क्रांती द्वारे ३३२५ ई सेवा यशस्वीपणे पुरवल्या जातात.

सर्वांसाठी माहिती हा आहे डिजिटल इंडिया कार्यक्रमाचा सहावा स्तंभ. प्रशासनात पारदर्शकता आणणे हा याचा हेतू आहे.खुल्या माहिती मंचांतर्गत, मंत्रालये, विविध विभाग,जनतेसाठी तत्परतेने माहिती देत असतात.ऑनलाईन माहिती आणि कागदपत्रे यामुळे माहितीसाठी खुला आणि सुलभ मार्ग उपलब्ध होतो.

डिजिटल इंडिया कार्यक्रमाचा सातवा आणि सर्वात महत्वाचा स्तंभ आहे तो म्हणजे, इलेक्ट्रॉनिक्स निर्मिती. एका सरकारी अभ्यास अहवालानुसार, इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या मागणीत मोठ्या प्रमाणावर २२% वार्षिक चक्रवाढ दराने वाढ होत असल्याचे दिसत आहे. देशातल्या इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाला प्रोत्साहन मिळावे यासाठी इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राच्या विकासासाठी, सरकारने अनेक पाऊले उचलली आहेत. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्रात,गेल्या दोन वर्षात, १.२८ लाख कोटी रुपयांचे, २५० हुन अधिक गुंतवणूक प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

**येत्या पाच वर्षात छोटी शहरे आणि खेड्यातल्या १० दशलक्ष तरुणांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या रोजगारासाठी प्रशिक्षण देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात, सेवा देण्याचा व्यवसाय करण्यासाठी, सेवा देणाऱ्या तीन लाख एजन्टना, कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत, प्रशिक्षण देण्याचे सरकारचे लक्ष्य आहे.**

रोजगारासाठी माहिती तंत्रज्ञान हा आठवा स्तंभ, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात, छोटी शहरे आणि खेड्यातल्या युवकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण पुरवण्यावर लक्ष केंद्रीत करतो. येत्या पाच वर्षात छोटी शहरे आणि खेड्यातल्या १० दशलक्ष तरुणांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या रोजगारासाठी प्रशिक्षण देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात, सेवा देण्याचा व्यवसाय करण्यासाठी, सेवा देणाऱ्या तीन लाख एजन्टना, कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत, प्रशिक्षण देण्याचे सरकारचे लक्ष्य आहे. या कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेली इंडिया बी पी ओ प्रोत्साहन योजना, देशभरात, बी पी ओ/आय टी ई एस अंतर्गत,४८,३०० जागा निर्माण करण्यासाठी, उद्योगजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आहे.ग्रामीण आणि छोट्या शहरातल्या युवा वर्गासाठी १,५०,००० रोजगार निर्मितीची क्षमता यात आहे. ४९३ कोटींचा आराखडा असलेल्या या प्रकल्पाअंतर्गत, असलेल्या या योजनेमुळे, लहान शहरात पायाभूत सोयी आणि मनुष्य बळाच्या दृष्टीने, क्षमता वृद्धी व्हायला मदत होईल, देशातल्या माहिती तंत्रज्ञान आणि आय टी ई एस अर्थात माहिती तंत्रज्ञान निगडित सेवा प्रणित विकासाच्या नव्या लाटेसाठी हा पाया ठरेल. त्याचप्रमाणे, ईशान्येकडच्या बी पी ओ प्रोत्साहन योजनांमुळे, बी पी ओ/आय टी ई एस विषयक घडामोडींना चालना मिळून ईशान्येकडच्या भागात माहिती तंत्रज्ञान आणि या क्षेत्राशी निगडित सेवा उद्योगाचा विकास आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होण्याला मदत होईल. ईशान्येकडच्या बी पी ओ प्रोत्साहन योजनेअंतर्गत, ५००० जागा निर्माण करून त्याद्वारे

ईशान्येकडच्या १५,००० युवकांना रोजगार पुरवण्याचे उद्दिष्ट आहे. याशिवाय, टेलिकॉम आणि त्याच्याशी संबंधित सेवांमध्ये ग्रामीण मनुष्यबळाला प्रशिक्षित करण्याचा सरकारचा विचार असून त्यासाठी, पाच लाख ग्रामीण मनुष्य बळाला प्रशिक्षित करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

शेवटचा स्तंभ म्हणजे अल्प काळात अंमलबजावणी करता येण्याजोगा कार्यक्रम ,' अर्ली हार्वेस्ट प्रोग्रॅम'. संदेश देण्यासाठी माहिती तंत्रज्ञान मंच, सर्व विद्यापीठात वाय-फाय, सार्वजनिक वाय-फाय हॉटस्पॉट, एसएमएस वर आधारित हवामान माहिती याचा या कार्यक्रमात समावेश आहे.

**सुप्रशासनासाठी डिजिटल इंडिया उपक्रम**

पारदर्शकता आणि नागरिक सक्षमता यामधूनच उत्तम प्रशासनाचा उगम होतो. डिजिटल इंडिया कार्यक्रम हा संपूर्ण देशाचा कायापालट करणारा आणि उत्तम प्रशासनाची खातरजमा करणारा ठरावा यासाठी सरकारने काही उपक्रम आणले असून त्यासाठी बहू स्तरीय धोरण आखले आहे. डिजि धन योजना अभियान, आधार पे, भीम, डीजी लॉकर, दिशा, थेट लाभ हस्तांतरण, ई पंचायत यांचा यात समावेश आहे. विमुद्रिकरणाच्या निर्णयाने सरकारने काळ्या पैशाविरोधात लढा पुकारला आणि जनतेला रोकड व्यवहार कमी करण्यासाठी प्रोत्साहन दिले. नागरिक आणि व्यापाऱ्यांना डिजिटल व्यवहारासाठी प्रोत्साहन देण्यात डिजि धन अभियान हे कल्पक अभियान ठरले. संपूर्ण देशभरात डिजि धन मेळे आयोजित करून त्यातून नागरिकांनी, डिजिटल व्यवहारासाठी, डाउनलोड, इन्स्टॉल, डिजिटल पेमेंटच्या विविध पद्धती हाताळाव्यात असा सरकारचा उद्देश आहे. त्याचबरोबर सरकारने, भारत इंटरफेस फॉर मनीअर्थात भीम हा डिजिटल पेमेंटसाठीचा मंच आणला. यूनिफाईड पेमेंट इंटरफेस युपीआय चा वापर करत सोप्या, सरळ आणि जलद गतीने व्यवहार करणे भीम अ‍ॅप मुळे शक्य झाले. ३० डिसेंबर २०१६ ला या अ‍ॅप ची सुरवात झाल्यापासून, त्याची अनेक पटीने वृद्धी झाली आहे.फेब्रुवारी २०१७ पर्यंत, या अ‍ॅपला १७ दशलक्ष डाउनलोड मिळाले असून अ‍ॅपद्वारा, १९.३७ लाख व्यवहार झाले आहेतअसे नुकत्याच एका अहवालात म्हटले आहे. २०१७ च्या जानेवारी आणि फेब्रुवारी या दोन महिन्यात भीम अ‍ॅप द्वारे ९५० कोटी रुपयांचे व्यवहार झाले.

**डिजिटल इंडिया कार्यक्रम हा संपूर्ण देशाचा कायापालट करणारा आणि उत्तम प्रशासनाची खातरजमा करणारा ठरावा यासाठी सरकारने काही उपक्रम आणले असून त्यासाठी बहू स्तरीय धोरण आखले आहे. डिजि धन योजना अभियान, आधार पे, भीम, डीजी लॉकर, दिशा, थेट लाभ हस्तांतरण, ई पंचायत यांचा यात समावेश आहे. विमुद्रिकरणाच्या निर्णयाने सरकारने काळ्या पैशाविरोधात लढा पुकारला आणि जनतेला रोकड व्यवहार कमी करण्यासाठी प्रोत्साहन दिले.**

आर्थिक समावेशकता, वित्तीय नियोजन व्यवस्थापन, जन केंद्री, विना अडथळा, प्रशासनाला प्रोत्साहन, सार्वजनिक क्षेत्रातल्या सेवा सुधारणा यासाठी, सरकारने जगातली सर्वात मोठी बायो मॅट्रिकवर आधारित ओळख यंत्रणा आधार सुरु केली. सध्या १.१३ अब्ज भारतीयांकडे आधार कार्ड आहे. बँक खाते उघडण्यासाठी आणि या खात्यात थेट लाभ जमा होण्यासाठी आधार महत्व पूर्ण आहे. बायो मॅट्रिकवर आधारित सत्यता पडताळणी प्रक्रियेवर आधारित आधार पे द्वारे आधारशी संलग्न बँक खाते धारक सर्व बँक व्यवहार केवळ अंगठ्याचा ठसा उमटवून करू शकतात. १४ एप्रिल २०१७ ला सुरवात झालेले आधार पे, करोडो भारतीयांसाठी सर्वसमावेशक पेमेंट प्लॅटफॉर्म ठरणार आहे.

डिजिटल समाजासाठी सरकार जोमाने कार्य करत असल्याने तळागाळापर्यंत जन केंद्री सेवा अत्यावश्यक ठरते. हे लक्षात घेऊन हे अभियान ग्राम पंचायत स्तरावरच्या २.५ लाख सामायिक सेवा केंद्राद्वारे, विविध जन केंद्री सेवा पुरवण्यासाठी सामायिक सेवा केंद्रांना बळकटी देत आहे. व्यवहारावर आणि सेवा देण्यावर आधारित ही सामायिक सेवा केंद्रे, एकाच मंचावरून अनेक ई सेवा प्रदान करत आहेत.

डिजिटल समाज आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था असलेला भारत घडवण्यासाठी सरकार कसून

प्रयत्न करत आहे. डिजिटल इंडिया कार्यक्रमांतर्गत, सरकारने डिजि लॉकर आणले असून या पब्लिक क्लाउडवर सर्व सार्वजनिक कागदपत्रे आणि प्रमाणपत्रे उपलब्ध करण्याबरोबरच शेअरेबल प्रायव्हेट स्पेसही पुरवण्यात आली आहे. कागदपत्रे आणि प्रमाणपत्रे थेट हातात देण्याऐवजी ती डिजिटली देण्याची आणि पडताळणीची संकल्पना डिजि लॉकरमागे असून प्रगल्भ ई प्रशासनाच्या दिशेने हे पाऊल आहे. आतापर्यंत ४० लाखांहून अधिक लोकांनी डिजिटल लॉकर निर्माण केले आहेत. सरकारने २० लाखांहून अधिक ई साइन नागरिकांना दिली आहेत. डिजि लॉकर आधारशी संलग्न करता येतात. थोडक्यात सांगायचे तर,डिजिटल समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी, डिजिटल इंडिया कार्यक्रमातुन सरकार कसे मंच तयार करत आहे हे यावरून दिसत आहे.

**अर्थसंकल्पात डिजिटल इंडिया कार्यक्रमावर सरकारचा भर**

डिजिटल इंडिया कार्यक्रमाला गती देण्यासाठी सरकारने २०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात अनेक उपाययोजना जाहीर केल्या आहेत. देशात डिजिटल पेमेंट वाढवण्यासाठी आणि ग्रामीण भागात इंटरनेट जोडणीसाठी ऑप्टिकल फायबर नेटवर्कला चालना मिळण्यासाठी सरकारने अनेक ठोस उपाययोजना जाहीर केल्या आहेत. युपीआय, युएस एसडी, आधार पे, आयएमपीएस , डेबिट आणि क्रेडिट कार्ड द्वारे २०१७-१८ या वर्षात २५०० कोटी डिजिटल व्यवहारांचे सरकारचे उद्दिष्ट आहे. मार्च २०१७ पर्यंत १० लाख नवी पीओएस टर्मिनल आणण्याचे लक्ष्य बँकांसाठी ठेवण्यात आले आहे. सप्टेंबर २०१७ पर्यंत आधार वर आधारित पीओएस आणण्यासाठी बँकांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. १.५ लाख ग्राम पंचायतींना, हॉटस्पॉट सह, ऑप्टिकल फायबरवर हाय स्पीड ब्रॉडबँड तसेच २०१८ पर्यंत अल्प दरात डिजिटल सेवा प्राप्त करण्याबाबत अर्थसंकल्पात सूतोवाच करण्यात आले आहे. भारत नेट अंतर्गत १.७५ लाख किलोमीटरची ऑप्टिकल फायबर टाकण्यात आली आहे. भारत नेटसाठी अर्थसंकल्पात १०,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**देशात डिजिटल पेमेंट वाढवण्यासाठी आणि ग्रामीण भागात इंटरनेट जोडणीसाठी ऑप्टिकल फायबर नेटवर्कला चालना मिळण्यासाठी सरकारने अनेक ठोस उपाययोजना जाहीर केल्या आहेत. युपीआय, युएस एसडी, आधार पे, आयएमपीएस, डेबिट आणि क्रेडिट कार्ड द्वारे २०१७-१८ या वर्षात २५०० कोटी डिजिटल व्यवहारांचे सरकारचे उद्दिष्ट आहे. मार्च २०१७ पर्यंत १० लाख नवी पीओएस टर्मिनल आणण्याचे लक्ष्य बँकांसाठी ठेवण्यात आले आहे.**

**निष्कर्ष**

सरकारने घेतलेल्या पुढाकारामूळे आणि उचललेल्या पाऊलामुळे, डिजिटल इंडिया कार्यक्रम यशस्वीरित्या उद्दिष्ट साध्य करेल. या कार्यक्रमाला सहकार्य करण्याचा कल नागरिकांनी दर्शवला असल्याने जगभरात, डिजिटलदृष्टया सर्वात जास्त सक्षम समाज म्हणून भारताने पुढे येण्यात कोणतीच अडचण नाही. येत्या काळात डिजिटल इंडिया कार्यक्रम, भारताचे डिजिटली विकसित राष्ट्रात परिवर्तन घडवेल यासाठी सरकार आणि नागरिक अनेक नवी उद्दिष्टे साध्य करू शकतील.

■ ■ ■

*लेखक सॉफ्टवेअर टेक्नोलॉजी पार्क्स ऑफ इंडियाचे महासंचालक असून या क्षेत्रातील २४ वर्षांचा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे.*

*email: rai@stpi.in*

## आगामी अंक

जून २०१७

**युवाशक्ती**

# सार्वजनिक वित्तक्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर

लेखा चक्रवर्ती,
समीक्षा अग्रवाल



**सार्वजनिक वित्तीय व्यवहारात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे, सरकारला विविध योजनांचे लाभार्थी अचूक शोधून त्यांच्यापर्यंत थेट मदत पोचवणे शक्य झाले. यामुळेच बनावट लाभार्थी शोधणे आणि निधीवाटपातल्या भ्रष्टाचार व गळतीला रोखणे शक्य झाले आहे, तसेच लाभार्थ्यांच्या नावातले घोळ आणि चुकाही टाळता येऊ शकतात. एका ताज्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, सार्वजनिक अर्थकारणात डिजीटायझेशन झाल्यामुळे कल्याणकारी योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचत आहे.**

स्थूल धोरण आखणाऱ्या अर्थतज्ञासाठी, वित्तीय धोरणात डिजिटल संशोधनाचा वापर करणे ही आज, विशेषतः विमुद्रीकरणानंतर काळाची गरज झाली आहे. सार्वजनिक वित्त व्यवहारात डिजिटलीकरणाची भारताने तीन उदाहरणे जगासमोर ठेवली आहेत. -विशेषतः डिजिटल वित्तीय सेवांच्या माध्यमातून वित्तीय समावेशन- हे अलीकडेच केलेल्या आर्थिक सर्वेक्षणात दिसून आले आहे.

या सर्वेक्षणानुसार, सार्वजनिक वित्तीय व्यवहारात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे, सरकारला विविध योजनांचे लाभार्थी अचूक शोधून त्यांच्यापर्यंत थेट मदत पोचवणे शक्य झाले. यामुळेच बनावट लाभार्थी शोधणे आणि निधीवाटपातल्या भ्रष्टाचार व गळतीला रोखणे शक्य झाले आहे तसेच लाभार्थ्यांच्या नावातले घोळ आणि चुकाही टाळता येऊ शकतात. एका ताज्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, सार्वजनिक अर्थकारणात डिजीटायझेशन झाल्यामुळे कल्याणकारी योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचत असून, मनरेगा योजनेअंतर्गत ४१ टक्के लाभार्थ्यांपर्यंत तर पहल या स्वयंपाकाच्या गॅसचे अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याच्या योजनेअंतर्गत ३७ टक्के, राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम अंतर्गत १४ टक्के लोकांपर्यंत आणि राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ७ टक्के लाभार्थ्यांपर्यंत पोचण्यात यश मिळाले आहे .(आर्थिक सर्वेक्षण -२०१५-१६) वित्तीय धोरणातील डिजीटलीकरणाचे आणखी एक यशस्वी उदाहरण म्हणजे प्रधानमंत्री जन धन योजना. या योजनेमुळे, वित्तीय व्यवस्थेत वित्तीय समावेशनाचा उत्तम मार्ग निर्माण झाला आहे. या योजनेंतर्गत अनेक गरीब लोकांनी खाती उघडल्यामुळे आता खऱ्या लाभार्थ्यांच्या खात्यात थेट अनुदानाची रक्कम जमा करता येऊ शकते. याच्याशी संबंधित आणखी एक प्रयोग म्हणजे आधार कार्ड, ज्यामुळे व्यक्तीला एकल ऑनलाईन ओळख क्रमांक मिळतो, हा नंबर बँक खाते आणि मोबाईल क्रमांकाशी संलग्न केल्यावर थेट व्यवहार करणे सोपे होते. मोबाईल बँकिंगच्या वापराला प्रोत्साहन दिल्यामुळे निधी हस्तांतरण आणि इतर सुविधा जलद वापरता येतात आणि बँकेच्या कारभारातील दिरंगाई टाळता येऊ शकते. जन धन, आधार आणि मोबाईल बँकिंग याच्या वापरामुळे भारताने डिजिटल क्रांतीच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल टाकले आहे.

जागतिक स्तरावर अशा डिजिटलीकरणाची काही उदाहरणे आपल्याला बघायला मिळतील. केनियात डिजिटलीकरण झाल्यावर किती वित्तीय संस्थानी या वाढत्या डिजिटल वातावरणाला प्रतिसाद दिला, हे तपासण्यासाठी एक भौगोलिक सर्वेक्षण करण्यात आले. केनियामध्ये लोकसंख्येचा मोठा हिस्सा हा वित्तीय सेवांच्या परिक्षेत्राच्या पाच किलोमीटर परिघात राहतो आणि केनियाचे लोक मोबाईल आधारित आर्थिक व्यवहार करण्यात आघाडीवर आहेत. दहा वर्षात प्रौढ लोकांमध्ये डिजिटल वापराचे प्रमाण शून्यावरून ७५ टक्क्यांवर पोहोचले आहे.

या जागतिक अनुभवांपासून धडा घेत, भारताने स्त्रोतांच्या प्रभावी वापरासाठी जाम म्हणजेच जन धन, आधार आणि मोबाईल ही त्रिसूत्री अमलात आणली. मुख्यतः भारतातील अनुदान योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आणि गळती होती, त्यामुळे या योजनांच्या यशस्वीतेवर मर्यादा येत असत. खऱ्या वंचिताना लाभ मिळण्याऐवजी बनावट नावांवर पैसे जमा होत. उदाहरणार्थ, भारतातील शिधापत्रिकेवर स्वस्त धान्य वाटपाच्या म्हणजेच रेशनच्या यादीत अनेक खोटी किंवा बनावट नावेच जास्त होती, त्यामुळे ही योजनाच निकामी ठरली. तसेच, मनरेगा, म्हणजेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अमलबजावणीतही अनेक त्रुटी आणि गळती आहे, ज्यातून केवळ भ्रष्टाचाराला वाव मिळाला आहे. स्वयंपाकाच्या गॅसचे अनुदान देण्यात तर इतक्या मोठ्या प्रमाणात गळती होती की एकूण लोकसंख्येच्या २० टक्के वरच्या स्तरातल्या लोकांना थेट अनुदानातील केवळ ६० टक्केच रक्कम मिळत होती आणि खालच्या स्तरातल्या लोकांना या सबसिडीपैकी केवळ ८ टक्केच रक्कम मिळत होती. या सर्व समस्या बघता, भ्रष्टाचार आणि गळती थांबवण्यासाठी डिजिटलीकरण हाच एक निश्चित उपाय दिसतो आहे.

आधार म्हणजेच, स्वीकृत एकीकृत भुगतान प्रणाली-तयार करण्यासाठी २०११ साली नंदन निलेकणी यांच्या नेतृत्वाखाली एक कृतीगट स्थापन करण्यात आला होता. गरीबांपर्यंत अनुदानाची रक्कम थेट पोचवण्यासाठीची स्वस्त आणि प्रभावी सेवा विकसित करण्याचा उद्देश त्यामागे होता. अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावी,अशी शिफारस या कृती गटाने केली आणि ह्या हस्तांतरणासाठी इतर काही साधने विकसित करण्याची जबाबदारी या कृती गटाला देण्यात आली.

**जागतिक अनुभवांपासून धडा घेत, भारताने स्त्रोतांच्या प्रभावी वापरासाठी जाम म्हणजेच जन धन, आधार आणि मोबाईल ही त्रिसूत्री अमलात आणली. मुख्यतः भारतातील अनुदान योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आणि गळती होती, त्यामुळे या योजनांच्या यशस्वीतेवर मर्यादा येत असत. खऱ्या वंचिताना लाभ मिळण्याऐवजी बनावट नावांवर पैसे जमा होत.**

सार्वजनिक वित्तीय व्यवहार आणि धोरणविषयक राष्ट्रीय समितीने केलेल्या अध्ययनानुसार, शिधापत्रिकेवर एकदा लाभार्थ्यांचे नाव आधार संलग्न केल्यास, त्यांची ओळख पटवणे सोपे जाईल आणि स्वस्त धान्य थेट त्यांच्यापर्यंत पोहोचेल. मनरेगा योजनेसाठीही आधार क्रमांकाच्या माध्यमातून मजुरी दिली गेली, तर या योजनेतील गळती ५ टक्क्यांपर्यंत कमी करता येईल.मात्र ,सराफ यांनी याबाबतीत सावधानतेचा इशारा देतांना म्हंटल आहे की जर ओळखींबाबतची कागदपत्रं योग्य आराखड्यानुसार दिली गेली नाहीत तर संघटित गुन्हेगारी आणि ओळखीबाबतचे घोटाळे होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो .

नुकत्याच झालेल्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, २०१५ मध्ये २१ कोटी आधार कार्डे तयार केली गेलीत. आठवड्याला ४ दशलक्ष कार्डे या वेगाने ही कार्डे तयार करण्यात आलीत.तसेच, सध्या सुमारे ९७५ दशलक्ष लोकांकडे आधार कार्ड आहेत, ही संख्या एकूण लोकसंख्येच्या ७५ टक्के तर प्रौढ लोकसंख्येच्या ९५ टक्के इतकी आहे.

विविध राज्यांमध्ये आधार नोंदणीचे प्रमाण अतिशय उत्तम असून सर्व राज्यात सरासरी एक तृतीयांश राज्यांमध्ये आधार कार्ड देण्याचे प्रमाण ९० टक्क्यांच्या वर आहे (आर्थिक सर्वेक्षण, भारत सरकार, २०१५-१६)

पुढे दिलेल्या तक्त्यातून जन धन योजनेची व्याप्ती समजून घेता येईल.

प्रधानमंत्री जन धन योजनेअंतर्गत सर्वसामान्य नागरिकांना बचत खाते उघडता येते, त्यामुळे अनुदानाची रक्कम थेट त्यांच्या खात्यात जमा केली जाऊ शकते. यामुळे खऱ्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळू शकतो .

तक्ता क्रमांक एक :

सार्वजनिक व्यवहारात डिजीटलीकरण : वित्तीय सेवांच्या माध्यमातून वित्तीय समावेशन ( आकडे -कोटींमध्ये)

| बँकेचे नाव | ग्रामीण | शहरी | एकूण | रूपे कार्डची संख्या | आधार संलग्न | खात्यात जमा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| सार्वजनिक क्षेत्रातील बँका | १२.३२ | १०.२२ | २२.५४ | १७.५८ | १४.९३ | ४९२६६.०४ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | ३.९७ | ०.६६ | ४.६३ | ३.५३ | २.७६ | ११७०८.०५ |
| खाजगी बँका | ०.५५ | ०.३७ | ०.९१ | ०.८४ | ०.४४ | २१२७.४ |
| एकूण | १६.८४ | ११.२४ | २८.०८ | २१.९५ | १८.१३ | ६३१०१.४९ |

*टीप : प्रधानमंत्री जन धन योजनेअंतर्गत २२ मार्च २०१७ पर्यंत उघडण्यात आलेल्या खात्यांची ही संख्या आहे. सर्व आकडे कोटींमध्ये आहेत. (स्रोत : भारत सरकार (२०१७), PMJDY.)*

स्वयंपाकाच्या गॅसचे अनुदान थेट लाभार्थ्याच्या खात्यात जमा करण्याच्या पहल योजनेचा २०१४ मध्ये पुन्हा शुभारंभ करण्यात आला. या योजनेचा लाभ थेट ग्राहकांना व्हावा असा उद्‌देश होता. या योजने अंतर्गत दारिद्र्यरेषेखालील महिलांना स्वयंपाकासाठी स्वच्छ उर्जा साधने पुरवून उर्जा पायाभूत क्षेत्रात स्त्री-पुरुषांसाठी समान सोयी सुविधा देण्याचाही विचार केला गेला. आणि हा विचार अतिशय महत्वाचा आहे कारण आकडेवारीनुसार, स्त्रिया आणि मुलांचे जास्त मृत्यू मलेरियापेक्षाही घरातील वाय प्रदूषणामुळे होतात आणि हे प्रदूषण खराब दर्जाच्या इंधनामुळे होते. ह्या योजनेत महिलांच्या अर्थव्यवस्थेचा, त्यासाठी त्यांना लागणारा वेळ आणि श्रम या सगळ्याचा अतिशय सखोल विचार केला गेला. जळावू इंधन गोळा करण्यासाठी महिलांना लागणारा वेळ, याची आकडेवारी गोळा करण्यासाठी भारतीय सांख्यिकी संस्था (चक्रवर्ती २०१६ आणि २०१४) यांनी अध्ययन केले. यासंदर्भात लाहोटी यांनी निरीक्षण नोंदवले आहे की पहल योजना सुरु होण्यापूर्वी स्वयंपाकाच्या गॅस चा वापर केवळ नागरी भागापुरताच,त्यातही ज्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती बऱ्यापैकी आहे, अशा कुटुंबापुरताच मर्यादित होता.एलपीजी हे स्वच्छ आणि आरोग्यास उत्तम इंधन असले तरी आजही भारतातील बहुतांश कुटुंबे जळावू लाकडासारख्या इंधनावर अवलंबून आहेत, आणि त्याचे त्यांच्या आरोग्यावर घातक परिणाम होत असतात . स्वयंपाकाच्या गॅस साठी दिले जाणारे अनुदान, हा गरीब कुटुंबांची प्रदूषित इंधनापासून सुटका करून त्यांना स्वच्छ उर्जेची साधने उपलब्ध करून देणे ह्याच मुख्य उद्‌देशाने राबवला जाणारा कार्यक्रम आहे, मात्र केवळ अनुदानातून हे लक्ष्य पूर्णपणे गाठता आलेले नाही.

पहल योजना यशस्वी होण्यासाठी आधार क्रमाकाच्या माध्यमातून अनुदान देणे अतिशय महत्वाचे पाऊल ठरले आहे. या योजनेअंतर्गत ग्राहकांना बाजारातल्या दरानुसारच सिलेंडर मिळतो आणि दारिद्र्यरेषेखालच्या कुटुंबातील ग्राहकांच्या खात्यात थेट अनुदानाची रक्कम जमा होते. हे अनुदान मिळवण्यासाठी ग्राहकांना एकतर त्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडून घ्यावे लागते किंवा जर आधार क्रमांक नसेल तर त्यांचा एलपीजी ग्राहक असल्याचा १७ अंकी क्रमांक बँक खात्याशी जोडून घ्यावा लागतो. सुरुवातीला या योजनेअंतर्गत ६७६ जिल्ह्यांमधल्या १५.३ कोटी ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे उद्‌दिष्ट होते, नंतर ही योजना हळूहळू देशभरात राबवली गेली (भारत सरकार, २०१४) ही योजना अतिशय यशस्वी झाल्याचे केंद्र सरकारने घोषित केले आहे. भारताच्या वर्ष २०१५-१६ च्या आर्थिक पाहणी अहवालातही

असे नमूद करण्यात आले आहे, की थेट लाभ हस्तांतरणामुळे अनुदानित एलपीजी सिलेंडर्सच्या वापरकर्त्यांची संख्या घटली आहे म्हणजेच, त्यात होणारी गळती २४ टक्क्यानी कमी झाली असून आता ही योजना केवळ लाभार्त्यापर्यंतच पोहोचते. त्याशिवाय स्वयंपाकाच्या गॅसचा होणारा काळाबाजार करणे कठीण झाले आहे. आतापर्यंत, पहल योजने अंतर्गत एकूण ४५,४१२ कोटी रुपये अनुदान लोकांच्या खात्यात जमा करण्यात आले असून १,०५,४६,३८८ जणांनी स्वेच्छा एलपीजी अनुदानाचा त्याग केला आहे, असे केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाची आकडेवारी सांगते.

अशा काही योजना जिथे केंद्र सरकारचे नियंत्रण आहे आणि जिथे जास्त गळती आहे, तिथेही जाम त्रयी वापरता येऊ शकते. या त्रिसूत्रीमुळे वित्तीय बचत वाढेल आणि सरकारचा पैसा थेट लाभार्थ्यांनाच मिळेल. जसे खतांच्या अनुदानाच्या बाबतीत केंद्र सरकारचे नियंत्रण मोठे आहे त्यामुळेच ते अनुदान देतांना जाम प्रणाली वापरली तर मोठ्या निधीची बचत होऊ शकेल. खतांच्या अनुदानात सध्या ४० टक्के गळती होते असा अंदाज आहे. जामची आवश्यकता सांगण्यासाठी ही आकडेवारीच पुरेशी आहे. त्याशिवाय, राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्था ,तसेच केंद्र सरकारशी संबंधित काही उद्योग व्यवसायही निधीसाठी केंद्र सरकारवर अवलंबून असतात. त्यांनाही त्याच मार्गाने निधी दिला जातो ज्या मार्गाने अनुदानाचा पैसा पाठवला जातो. त्यामुळे तिथेही गळतीची शक्यता असतेच, तिथेही जाम त्रिसूत्री उपयुक्त ठरेल.

जाम त्रिसूत्रीमुळे निधी पाठवण्याची प्रक्रिया अधिक सुरळीत आणि सक्षम झाली आहे, यातली गळती थांबली, विलंब कमी झाला आणि प्रशासनावरचा भारही कमी झाला आहे. त्यामुळेच , जाम त्रिसूत्री सरकारांमध्ये निधी वितरणासाठीही वापरली जाऊ शकते. त्याचा खर्च कमी आणि ती प्रभावीही आहे. मात्र, या कल्याणकारी योजनांची उपयुक्तता आणि प्रभाव कमी असण्यासाठी इतर अनेक बाबीही कारणीभूत आहेत. अगदी मूलभूत सुधारणा केल्या तरी योजनांचा प्रभाव तुलनेने कमी आहे. या योजनेसाठी निधी वितरणाच्या पद्धतीतल्या त्रुटी आणि गळतीची समस्या मोठ्या प्रमाणात दूर झाली असली ,आणि निधी वाटपात होणारा पैशांचा अपव्यय , भ्रष्टाचार याला बऱ्याच अंशी आळा बसला असला तरी, या योजनांच्या अंमलबजावणीसाठी आजही मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ आणि स्रोत खर्च होतात.

**२०१५-१६ च्या आर्थिक पाहणी अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की भारतातील सधन वर्गाने सरकारी अनुदान घेणे कमी केले आहे, विशेषतः विजेचे अनुदान. त्याचप्रमाणे केवळ ३६% गॅस (LPG) जोडणी धारक अनुदानित सिलेंडर घेतात. (हे अनुदान सिलेंडरच्या बाजार भावाच्या विशिष्ट प्रमाणात दिले जाते.) तसेच, गरीब ग्राहकांपैकी केवळ ९% ग्राहक LPG अनुदान घेतात. ह्यातून असे लक्षात येते की जवळ जवळ ९१% अनुदान हे सधन वर्ग घेतो.**

२०१५-१६ च्या आर्थिक पाहणी अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की भारतातील सधन वर्गाने सरकारी अनुदान घेणे कमी केले आहे, विशेषतः विजेचे अनुदान. त्याचप्रमाणे केवळ ३६% गस (LPG) जोडणी धारक अनुदानित सिलेंडर घेतात. (हे अनुदान सिलेंडरच्या बाजार भावाच्या विशिष्ट प्रमाणात दिले जाते.) तसेच, गरीब ग्राहकांपैकी केवळ ९% ग्राहक LPG अनुदान घेतात. ह्यातून असे लक्षात येते की जवळ जवळ ९१% अनुदान हे सधन वर्ग घेतो. शेवटी, ह्यात एक समस्या अशी आहे, की वस्तू रुपात परतावा देत असतांना, आपल्या विशिष्ट गरजा काय आहेत हे ठरविण्याचा अधिकार उपभोक्त्यांना नसतो. (घटक २०१६).[१] म्हणून सध्या अस्तित्वात असलेल्या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी युनिवर्सल बेसिक इन्कम प्रणालीच्या अंमलबजावणी बद्दल अर्थतज्ञ चर्चा करत आहेत. युनिवर्सल बेसिक इन्कम प्रणाली मुळे सरकारी अनुदानाच्या रकमेचे, गरीब असो वा श्रीमंत, उपभोक्त्यांना समान वाटप होईल. २०१६-१७ च्या आर्थिक पाहणी अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की युनिवर्सल बेसिक इन्कम प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे अनुदान वाटपातील गळती आणि चुकीचे निधी वितरण बंद होईल कारण देय

अनुदान थेट उपभोक्त्यांच्या खात्यात जमा होईल आणि ह्या प्रक्रियेतील सरकारी अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप कमी होईल. बर्धन (२०१६) ह्यांच्या म्हणण्या नुसार, मूळ वेतन जर गरिबी रेषेच्या ७५% इतकं ठेवलं तर, सगळे जरी नाही तरी, काही कल्याण कार्यक्रम बंद करता येऊ शकतील. त्यांच्या म्हणण्या नुसार सार्वजनिक शिक्षण, आरोग्य सेवा, बाल पोषण कार्यक्रम आणि रोजगार हमी योजना सुरु ठेवणे महत्वाचे आहे.

आर्थिक व्यवहार्यतेबद्दल बोलायचे झाल्यास, जर युनिवर्सल बेसिक इन्कम प्रणालीची रक्कम महागाई निर्देशांक २०१४-१५ चे दरडोई उत्पादन, १०,००० रुपये इतके ठरविले तर ते सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या १०% असेल. देशातील अकार्यक्षम कल्याणकारी योजना आणि कमी होणारी अनुदाने यांचा विचार करता, ही रक्कम सहज हाताळता येऊ शकते.

बॅनर्जी (२०१६) आणि घटक (२०१६) यांनी असे नमूद केले आहे की महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि शिधा वाटप योजना अजूनही अनेक लोकांपर्यंत पोचल्या नाहीत आणि अनुदानात कपात करून, अनावश्यक खर्च कमी करून आणि कर प्रणालीची पुनर्रचना करून भारतीय एक मूळ वेतन कमवू शकतात. रे (२१०६) यांनी नमूद केले आहे की नागरिकांना देण्यात येणार असलेल्या जागतिक मूळ वेतनप्रणालीचे प्रमाण सकल देशांतर्गत उत्पादनाच्या टक्केवारीशी जोडले जाऊ शकते. त्यासाठी अत्याधुनिक ई पेमेंटची मदत घेता येईल. भारतात आधार या बायोमेट्रिक ओळखक्रमांक योजनेच्या माध्यमातून ई पेमेंट करता येणे शक्य आहे. लोकांपर्यंत अनुदानाची रक्कम पोहचवताना जागतिक मूळ वेतनप्रणाली आधार संलग्न केल्यास, प्रशासनातली गळती रोखून थेट गरीबांपर्यंत पोहोचवता येईल. ह्या प्रणालीच्या माध्यमातून लाभ हस्तांतरणाचे समान वाटप होत असल्यामुळे, यात येणारे अडथळे दूर केले जातात, हा या प्रणालीचा मुख्य फायदा आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासप्रक्रितेल्या विषमतेला दूर करणेही शक्य होईल, हे ही यातून सिद्ध झाले आहे.

**लोकांपर्यंत अनुदानाची रक्कम पोहचवताना जागतिक मूळ वेतनप्रणाली आधार संलग्न केल्यास, प्रशासनातली गळती रोखून थेट गरीबांपर्यंत पोहोचवता येईल. ह्या प्रणालीच्या माध्यमातून लाभ हस्तांतरणाचे समान वाटप होत असल्यामुळे, यात येणारे अडथळे दूर केले जातात, हा या प्रणालीचा मुख्य फायदा आहे.**

वित्तीय शिस्त आणि वित्तीय नियमाच्या पार्श्वभूमीवर, भारताला सुदृढ अर्थव्यवस्थेसाठी वित्तीय तूट सकल देशान्तर्गत उत्पादनाच्या ३ टक्के राखणे आवश्यक आहे. (चक्रवर्ती २०१६ ब). अर्थव्यवस्थेत अनुदान प्रक्रिया सुलभ करणे आणि वित्तीय समावेशनाला प्रोत्साहन देणे यात डिजिटलीकरणाची भूमिका महत्वाची ठरते. यामुळे स्त्रोतांचा प्रभावी आणि शिस्तबद्ध वापर होण्यास मदतच होत आहे.

■ ■ ■

*लेखा चक्रवर्ती नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक फायनान्स अॅन्ड पॉलिसी येथे सहप्राध्यापक असून समिक्षा अग्रवाल याही याच संस्थेत कार्यरत आहेत.*

*email: lekhachakraborty@gmail.com*

*samiksha.agarwal194@gmail.com*



विकास समर्पित
मासिक
**योजना**
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

# नवभारताची कहाणी

व्यंकय्या नायडू



**भारताचा बदलता चेहरा हा स्थायी न बदलणाऱ्या पूर्वापार चालत आलेल्या रूपास आव्हान देत आहे. देशाचे पंतप्रधान प्रत्यक्ष आघाडीवर येऊन नेतृत्व करीत आहेत, गेली तीन वर्षे धडाडीने ते काम करीत आहेत. सरकारने ज्या नवीन कल्पना मांडल्या त्यात लोकांचा मनोपट बदलला, व्यवहारिक वर्तणूक बदलली. आता भारताचे पारंपरिक जुनेच चित्र जगासमोर ठेवण्याचे दिवस सरले आहेत.नव भारताची एक प्रफुल्लित प्रतिमा आकारास येते आहे.**

जागतिक भूराजकीय व आर्थिक परिप्रेक्ष्यात भारत आपली प्रगतीची कहाणी पुन्हा लिहित आहे, सरकारी चौकटीत काही नवीन पद्धती सुरू केल्या जात आहेत व जुन्या प्रतिमा पुसून विविध देशांच्या सहकार्यातून हा नवा भारत घडणार आहे. जगाला आता हे कळून चुकले आहे की, अमेरिका व चीन यांच्यानंतर भारत हा सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला देश आहे. भारताचा बदलता चेहरा हा स्थायी न बदलणाऱ्या पूर्वापार चालत आलेल्या रूपास आव्हान देत आहे. देशाचे पंतप्रधान प्रत्यक्ष आघाडीवर येऊन नेतृत्व करीत आहेत, गेली तीन वर्षे धडाडीने ते काम करीत आहेत. सरकारने ज्या नवीन कल्पना मांडल्या त्यात लोकांचा मनोपट बदलला, व्यवहारिक वर्तणूक बदलली. आता भारताचे पारंपरिक जुनेच चित्र जगासमोर ठेवण्याचे दिवस सरले आहेत. नव भारताची एक प्रफुल्लित प्रतिमा आकारास येते आहे. अगदी अलिकडे पाचशे व हजाराच्या नोटा चलनातून बाद करण्यात आल्या. त्यामागे काळापैसा, बनावट चलन व भ्रष्टाचार यांना आळा घालण्याचा हेतू होता. यात काळा पैसा बाहेर काढण्यासाठी सरकारने पहिल्या अडीच वर्षात सरकारने स्वीस बँक अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. काळा पैसा बाहेर काढण्यासाठी विशेष चौकशी पथक नेमण्यात आले त्यात करचुकवेगिरीची प्रकरणे, खोटी प्राप्ती प्रकटने ही प्रकरणे हाताळली गेली. त्यातून ६५००० कोटींचा महसूल हाती आला. नोटाबंदीने त्यावर कळसाध्याय गाठला. काळा पैसा बाहेर काढण्यासाठी सरकारने अधिक कार्यक्षमतेने काम केले. शिवाय भ्रष्टाचाराला आळा घातला. त्यामुळे रिझर्व बँकेला व सरकारला कर दर व व्याज दर कमी करण्याची संधी मिळाली. गुंतवणुकीचे प्रमाण वाढले. आर्थिक तूटही कमी होत असून आर्थिक वाढीची उद्‌दिष्टे साध्य होत आहेत. भारताच्या पुनरूत्थानाची ही कहाणी आहे. भारताचे डिजिटल पातळीवरील नेतृत्व नोटाबंदीनंतर दिसून आले आहे. त्या काळात डिजिटल पेमेंटला उत्तेजन देण्यात आले त्याला आणखी पाठबळाची गरज आहे. डिजिटल व्यवहार करण्यासाठी त्या सवयी वर्तनात आणाव्या लागतील. कॅशलेस व्यवहार करून रोकड कमी वापरणारा समाज निर्माण करावा लागेल. त्यातून पारदर्शकता व उत्तरदायित्व

वाढीस लागेल. किमान दीड कोटी लोकांनी भीम अँपचा वापर सुरू केला असून हे अॅप सुरू करून केवळ दोन महिने झाले आहेत. डिजिटल व्यवहार सुरळित होण्यासाठी ३० कोटी रूपे कार्ड जारी करण्यात आले. जनधन योजनेतील खातेदारांना ते विशेषत्वाने देण्यात आले. साडेबारालाख लोकांनी नशीबवान ग्राहक योजनेत बक्षीसे जिंकली त्यात ७० हजार व्यापारी डिजीधन व्यापार ग़ोजनेत बक्षीसपात्र ठरले. प्रधान मंत्री गरीबकल्याण योजनेत करचुकवेगिरी करणाऱ्यांना उत्पन्न जाहीर करण्याची शेवटची संधी देण्यात आली. यातील निधी गरिबांच्या कल्याणासाठी वापरण्यात आला. निश्चलनीकरणाने डिजिटल क्रांतीला चालना मिळाली, भ्रष्टाचार व काळ्या पैशाला लगाम बसला. ऑनलाइन पेमेंटने रोखीची गरज कमी होऊन आर्थिक व्यवहारात पारदर्शकता आली. डिजिटल माध्यमे वापरणाऱ्यांनी इतरांना त्याचा वापर शिकवणे गरजेचे आहे. लोकांचे राहणीमान सुधारण्यासाठी व भ्रष्टाचार, काळा पैसा बाहेर काढण्यासाठी त्याचा उपयोग होत आहे. यात सामाजिक प्रयत्नांना महत्व आहे. ही डिजिटल इंडियाची कहाणी आहे. प्रधानमंत्री जनधन योजनेमुळे गॅसचे अनुदान लोकांच्या खात्यात जमा होऊ लागले. त्याला थेट हस्तांतर योजना असे म्हणतात. पहल योजनेत ही खाती महत्वाची ठरली. जागतिक पातळीवर थेट हस्तांतर योजना वापरली जाते तीच आपल्याकडे वापरल्याने गरिबांचा फायदा झाला. १६० दशलक्ष लोक पहल योजनेत लाभार्थी असून त्यातील वित्त हस्तातंरण योजना जगातील मोठी आहे. त्याच प्रमुख हेतूने हा अनुदान सुधारणा कार्यक्रम हा आहे. त्यात अनुदाने रद्द केली नाहीत तर ती योग्य लाभार्थींना पैसे मिळावेत हा हेतू आहे. आर्थिक व्यवहारात पारदर्शकता आणून भ्रष्टाचार रोखणे हा महत्वाचा मुद्दा त्यात आहे. सरकारने यात २२००० कोटींचे एलपीजी अनुदान वाचवले आहे. निश्चलनीकरण व इतर निर्णय हे सुसंसगततेने घेतले गेले. यात आर्थिक सर्वसमावेशकता आली व प्रत्येक नागरिक औपाचारिक बँकिंग व्यवस्थेत आला. एकूण २८.१३ कोटी खाती प्रधानमंत्री जनधन योजनेत उघडली गेली. त्यातून कॅशलेस व्यवस्थेला उत्तेजन मिळाले. खाती उघडण्याची मोहीम स्वतंत्र भारतातील सर्वात मोठी मोहीम होती व ती सर्वसमावेशक भारताची कहाणी आहे.

**पहल योजनेत एलपीजी अनुदान सोडण्याचे आवाहन श्रीमंतांना करण्यात आले होते. वार्षिक दहा लाख उत्पन्न असणाऱ्यांना यात अनुदान सोडण्यास उत्तेजन दिले गेले . यातून वाचलेले पैसे वापरून गरिबांना ६५ लाख नवी एलपीजी कनेक्शन देण्यात आली. १ कोटी लोकांनी अनुदान स्वेच्छेने सोडले व त्यामुळे केरोसिन वापरणाऱ्या महिलांना गॅस कनेक्शन मिळून फायदा झाला. सरकारचे ५ हजार कोटी रूपये यात वाचले. ही भ्रष्टाचार नसलेल्या भारताची कहाणी आहे.**

पहल योजनेत एलपीजी अनुदान सोडण्याचे आवाहन श्रीमंतांना करण्यात आले होते. वार्षिक दहा लाख उत्पन्न असणाऱ्यांना यात अनुदान सोडण्यास उत्तेजन दिले गेले . यातून वाचलेले पैसे वापरून गरिबांना ६५ लाख नवी एलपीजी कनेक्शन देण्यात आली. १ कोटी लोकांनी अनुदान स्वेच्छेने सोडले व त्यामुळे केरोसिन वापरणाऱ्या महिलांना गॅस कनेक्शन मिळून फायदा झाला. सरकारचे ५ हजार कोटी रूपये यात वाचले. ही भ्रष्टाचार नसलेल्या भारताची कहाणी आहे. मेक इन इंडिया मोहीम ही सरकारची प्रमुख योजना आहे. त्यात भारताला उत्पादनाचे केंद्र बनवण्याचा विचार आहे. त्यातून आर्थिक चालना मिळणार असून चांगल्या पायाभूत सुविधा,. चांगले रोजगार व संधी, सर्व लोकांना समान आर्थिक संधी, थेट परदेशी गुंतवणूक ही उद्दिष्टे साध्य होत आहेत. २०१७ मध्ये परकीय गुंतवणूक वाढली आहे ती ३.३५ अब्ज डॉलर्सची आहे म्हणजे मेक इन इंडिया योजना सुरू केल्यापासून परकीय गुंतवणुकीत ४६ टक्के वाढ झाली आहे. ही गुंतवणूक स्नेही भारताची कहाणी आहे.

भारतात जीएसटी कायदा संमत झाला असून आता कर प्रणाली सुरळित होणार आहे त्यात देशव्यापी बाजारपेठ वस्तू व सेवांना मिळणार आहे.कर पाया वाढून आर्थिक वाढीला हातभार लागणार आहे. सरकारी महसूल वाढणार असून रसद पुरवठाखर्च इनव्हेन्टरी खर्च,करचुकवेगिरी कमी होणार आहे. वस्तूंचे उत्पादन स्वस्त होणार असून एक देश, एक कर व एक बाजारपेठ हे स्वप्न साकार होणार आहे. यातून सरकारची निर्णयक्षमता दिसून येते. उत्पादकतेला यात स्पर्धात्मकता लाभणार आहे. जीएसटीमुळे कराचा

दुहेरीपणा व आंतरराज्य कर टळणार आहे, रसद खर्च कमी होणार असून बाजारपेठ एक होणार आहे. जीएसटीमुळे आयातीपासून थोडे संरक्षणही काउंटरव्हेलिंग शुल्कामुळे मिळणार आहे. ही स्थित्यंतरित भारताची कहाणी आहे.

कार्यक्षम अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकार करण्यासाठी डिजिटल इंडिया मोहीम सुरू करण्यात आली. त्यात डिजिटल पायाभूत सुविधा व डिजिटल साक्षरतेला महत्व आहे. इ-प्रशासनामुळे कार्यक्षमता व पारदर्शकता वाढत आहे. कामाचा वेळ वाचत आहे. सरकारला हे माहिति आहे की, यासाठी पुरेशा पायाभूत सुविधांची गरज आहे. त्यामुळे भारत ब्रॉडबँडने २.५ लाख पंचायती इंटरनेटने जोडल्या गेल्या. २९ जानेवारी २०१७ पर्यंत ७६०८९ पंचायतींपर्यंत ऑप्टिकल फायबरचे जाळे पोहोचले आहे. त्याची लांबी १७२२५७ किलोमीटर आहे. किमान १६३५५ ग्रामपंचायतींना ब्रॉडबँड सेवा दिली असून ही ड़िजिटल भारताची कहाणी आहे.

स्वच्छ भारत अभियानही महत्वाचे आहे त्यात हागणदारीमुक्त भारताचे उद्दिष्ट २०१९ पर्यंत आहे. त्यात स्थित्यंतराची ताकद आहे. प्रसाधनगृहांची संख्या वाढवण्याचे प्रयत्न यात आहे, लोक प्रसाधनगृहे वापरत नाहीत ते बदलण्यासाठी त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक समज बदलावे लागतील त्यांच्या सवयी बदलाव्या लागतील.स्वच्छ भारत योजना सुरू झाल्यानंतर ४ कोटी स्वच्छतागृहे सुरू केली गेली. ५७३ शहरे, १८८००८ खेडी व १३० जिल्हे हागणदारी मुक्त झाले आहेत ही स्वच्छ भारताची कहाणी आहे.

कौशल्य विकास आघाडीवर प्रधानमंत्री कौशल विकास योजना पीएमकेव्हीवाय ही महत्वाची आहे. त्यात जास्तीत जास्त भारतीय युवकांना कौशल्य प्रशिक्षणाचे उद्दिष्ट आहे. उद्योगानुकूल कौशल्ये यात शिकवली जात आहेत त्यातून युवकांना रोजगार मिळू शकतो.कौशल भारत, कुशल भारत या योजनेत १९.८५ लाख तरूणांना प्रशिक्षण २०१६ मध्ये देण्यात आले तर ५९६ जिल्ह्यात ८४७९ प्रशिक्षण केंद्रे सुरू केली आहेत ही कौशल्यपूर्ण भारताची कहाणी आहे. कमीत कमी सरकार, जास्तीत जास्त प्रशासन यावर सरकारचा विश्वास आहे.हे सरकारच्या

**इ-प्रशासनामुळे कार्यक्षमता व पारदर्शकता वाढत आहे. कामाचा वेळ वाचत आहे. सरकारला हे माहिति आहे की, यासाठी पुरेशा पायाभूत सुविधांची गरज आहे. त्यामुळे भारत ब्रॉडबँडने २.५ लाख पंचायती इंटरनेटने जोडल्या गेल्या. २९ जानेवारी २०१७ पर्यंत ७६०८९ पंचायतींपर्यंत ऑप्टिकल फायबरचे जाळे पोहोचले आहे. त्याची लांबी १७२२५७ किलोमीटर आहे. किमान १६३५५ ग्रामपंचायतींना ब्रॉडबँड सेवा दिली असून ही ड़िजिटल भारताची कहाणी आहे.**

कामातील नैतिक मूल्यातून दिसून येते आहे. सध्याचे देशाचे नेतृत्व व्यावसायिक कार्यशैलीवर विश्वास ठेवणारे आहे व त्यांनी प्रशासनाचे कंपनीकरण केले आहे किंबहुना ती शिस्त व व्यवस्था तशा प्रकारे राबवली आहे. त्यात नवीन कार्य संस्कृती सरकारने आणली आहे. नेहमी आढावा बैठका घेतल्या जातात. त्याला मंत्री व सनदी अधिकारी उपस्थित असतात. अधिकाऱ्यांशीही सल्लामसलत होते. त्यात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगने बैठका होतात. ही नवीन पद्धत आता सुरू केली आहे. सरकारची मोठी कामगिरी म्हणजे भ्रष्टाचाराला आळा घालण्यात आलेले यश ही आहे. कामातील विलंबही कमी झाला आहे. प्रशासकीय अडथळे कमी झाले आहेत. ते कोळसा लिलावात दिसून आले. ही पारदर्शक भारताची कहाणी आहे.

कृषी क्षेत्रातही अनेक योजना आहेत त्यात प्रधान मंत्री फसल बिमा योजना, प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजना, मृदा स्थिती पत्रिका कार्यक्रम, कडुनिंबाचा थर असलेला युरिया, किमान आधारभूत भावात वाढ. मान्सूनच्या लहरी काळातही शेतकऱ्यांना दिलासा, १५.८६ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली (२०१४-१७ दरम्यान) आणणे प्रत्येक थेंबामागे अधिक पीक योजनेत हे सिंचन अंमलात आले. ६.२० कोटी मृदा आरोग्य पत्रिका वाटण्यात आल्या. २०१६ च्या खरीपात २३ राज्यात ३९० लाख शेतकरी व ३८६.७५ लाख हेक्टर जमीन विम्याखाली आली, हा विमा १४१८८३.३०कोटींचा आहे. हे आकडेच कामगिरी सांगतात. सरकार अन्नदात्याशी वचनबद्ध आहे. इतर पायाभूत य़ोजनात स्मार्ट सिटी योजना, अमृत योजना, प्रधान मंत्री आवास योजना, पतआधारित अनुदान योजना, प्रधानमंत्री संसद आदर्श ग्राम योजना, प्रधान मंत्रीग्राम सडक योजना, अशा अनेक योजना राबवल्या गेल्या. बेटी बचाव बेटी पढाव, अटल पेन्शन योजना, जीवन ज्योती बीमा योजना, कृषी सिंचाई

योजना, मुद्रा बँक योजना, सुकन्या समृद्धी योजना, नयी मंजील योजना या इतर योजनांनी समाजाच्या सर्व घटकात विकासाचा समतोल साधला आहे. मुली, ज्येष्ठ नागरिक,शेतकरी, अल्पसंख्याक, शहरी लोक, ग्रामीण लोक यांना यात फायदा आहे. या योजना सरकारने समाजाच्या सर्व घटकात लाभदायी ठरतील अशा केल्या आहेत. त्यांचे जीवन सोपे केले आहे. ही बदलत्या भारताची कहाणी आहे. यात गरीब, शेतकरी, महिला यांच्यासाठी लाभच लाभ आहेत.

भारताच्या परराष्ट्र धोरणात अनेक बदल झाले आहेत. पंतप्रधानांनी सहा खंडातील पन्नासहून अधिक देशांना भेटी दिल्या असून त्यांनी दोन वर्षात अनेक देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले आहेत. सर्व सार्क देशांना त्यांनी शपथविधी कार्यक्रमास बोलावले होते तो निर्णय महत्वाचा व वेगळा ठरला. त्यातून राजनैतिक वर्तुळात ठोस संदेश गेला भारताला शेजारी देशांशी चांगले संबंध हवे आहेत असे त्यातून सूचित झाले. भूतानला त्यांनी द्विपक्षीय भेट दिली असून पंतप्रधानांनी शेजारी देशांना भेटी दिल्या. भारताने आपल्या भूमिका ठामपणे मांडल्या पाकिस्तानच्या दहशतवादाविरोधात कठोर पवित्रा घेतला. त्यातून भारताला द्विपक्षीय संबंध हवे आहेत पण दहशतवाद खपवून घेणार नाही असा संदेश गेला. परराष्ट्र सचिव पातळीवर पाकिस्तानशी चर्चा हुरियतने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याने रद्द करून भारताने कणखर भूमिका घेतली. सार्क बैठकीस पाकिस्तानमध्ये भारत उपस्थित राहिला नाही.फुटीरतावाद्यांशी चर्चा करणार नाही, ही भूमिका कायम ठेवली. पाकिस्तानला दहशतवादी देश घोषित करण्यासाठी ठराव करावेत यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न केले. भारताने बहुदेशीय संबंधांच्या घटनाक्रमात संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा मंडळाचे स्थायी सदस्यत्व मिळण्यासाठी अनेक देशांचा पाठिंबा मिळवला त्यात प्रगती होत आहे. सार्क, ब्रिक्स, बिमस्टेक या संघटनांमध्ये भारताने चांगले स्थान मिळवतानाच अणुसाहित्य पुरवठा गटातही प्रवेश केला. विकसनशील देशात भारताने चांगली प्रगती केली असून बहुदेशांशी वाटाघाटी पॅरिस हवामान बदल परिषदेच्या निमित्ताने केल्या. जागतिक व्यापार संघटनेतही वाटाघाटी केल्या. भारत-अमेरिका संबंधांनी एक नवा आयाम गाठला. पंतप्रधानांनी अमेरिकेतील राजकीय नेत्यांशी संपर्क वाढवला. तत्कालीन अध्यक्ष ओबामा यांना सहा वेळा भेटले ते केवळ २४ महिन्यात. अमेरिकेला पंतप्रधानांनी तीनदा भेट दिली. दोन्ही देशातील संरक्षण संबंध वाढले. त्यातून भारताला फायदाच झाला. भारताने जपान व रशिया यांच्याशी चांगले संबंध प्रस्थापित केले. दक्षिण आशियात चीनची वाढीची महत्वाकांक्षा मोठी आहे. तापी व छाबहार बंदर करार यातून चीनच्या या भागातील वर्चस्वाला शह दिला. पारंपरिक मित्र देशांशी संबंध ठेवताना सरकारने उदयोन्मुख देशांनाही महत्व दिले. ते देश मुख्यत्वे मध्य आशिया व आफ्रिकेतील आहेत. या देशांचे नैसर्गिक नेतृत्व करण्याचा प्रयत्न भारताने केला ही नव्याने उदयाला आलेल्या नवभारताची कहाणी आहे. नेपाळचा भूकंप, येमेनमधील अडकलेल्या भारतीयांना मदत, काश्मीरमधील पूर, केरळ मंदिरातील आग या सर्व घटनात सरकार सक्रिय राहिले, लोकांपर्यंत पोहोचले, त्यांना मदत केली. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने भारताची एक सॉफ्टपॉवर म्हणून क्षमता दिसली. ही सर्वांची काळजी वाहणाऱ्या भारताची कहाणी आहे. गेल्या तीन वर्षात आगामी काळातील मोठ्या प्रगतीची मूहुर्तमेढ झाली आहे. संदेशवहनाच्या माध्यमातून आक्रमक संदेशवहन पत्रकार परिषदा, टीव्ही, रेडिओ, वर्तमानपत्रे व सोशल मीडियातून सुरू आहे. सरकार, विरोधी पक्ष, प्रशासन, कंपन्या, नागरिक एकमेकांना नव्या भारताच्या स्वप्नासाठी मदत करीत आहे. भारत एक विकसित देश म्हणून जागतिक महासत्ता म्हणून पुढे येण्याची शक्यता आहे. ही उत्तम संज्ञापन असलेल्या संपर्क परिपूर्ण भारताची कहाणी आहे.

आपल्या भारताची कहाणी पुन्हा नव्याने सांगण्याची गरज आहे. आता पाश्चिमात्य देश भारताकडे वेगळ्या चष्म्यातून पाहत नाहीत.समाजवाद व इतर वादांच्या काळातील चौकटींना जगात तिलांजली मिळाली आहे. वरील काही गोष्टी या नवीन भारताची नवीन उर्जेसह झेप घेणारी कहाणी डोळ्यासमोर साकार करतात. पंतप्रधान मोदी यांनी या नवभारताच्या संकल्पनेसाठी त्यांची दूरदृष्टी पणाला लावली आहे, हीच मिशन मोदीची (मेकिंग ऑफ डेव्हलपिंग इंडिया) खरी कहाणी आहे.

■ ■ ■

*लेखक केंद्रीय गृहनिर्माण, द्रारिद्रय निर्मूलन, नगरविकास आणि माहिती व प्रसारण खात्याचे मंत्री आहेत.*

# उत्तम अर्थ नियोजनाचे सात उपाय

शिशिर सिन्हा



**परिपूर्ण आर्थिक व्यवस्थापन धोरणांना केवळ गणित व कठोर उपायोजना यांचे पाठबळ पुरेसे नसते तर त्यात व्यवहार्य दृष्टिकोन ठेवावा लागतो. यंत्रणेमागे, योजनांमागे मानवी चेहरा असावा लागतो. हे सर्व लक्षात घेतले तर सरकारच्या आर्थिक व्यवस्थापन धोरणामागे सात महत्वाचे मुद्दे आहेत, त्याची चर्चा या लेखात करण्यात आली आहे.**

कुठल्याही नियुक्त सरकारला समाजातील अनेक गटांच्या गरजा पूर्ण करायच्या असतात. त्यात एक म्हणजे मतदार त्यात सत्ताधारी पक्ष किंवा आघाडीला मत दिलेले लोक असतात व ज्यांनी मते दिली नाहीत असेही लोक असतात. यात दुसरा एक गट असतो त्यात अर्थतज्ञ मानांकन संस्था, विश्लेषक यांचाही समावेश असतो. मतदारांना सरकारकडून जास्तीत जास्त कल्याणकारी योजनांची अपेक्षा असते तर अर्थतज्ञ, पतमानांकन करणाऱ्यांना भांडवली खर्चावर भर अपेक्षित असतो. यात तिसरा गटही अस्तित्वात असतो. तो म्हणजे कंपन्या. त्यांना जास्तीत जास्त कर फायदे व दिलासा अपेक्षित असतो, कल्याणकारी योजनांवर खर्च करणे म्हणजे लोकप्रियता मिळवण्यासाठी केलेल्या उपाययोजना असतात असे कंपनी क्षेत्राचे म्हणणे असते. या सर्व गटांना खुश ठेवणे हे अर्थमंत्र्यांना शक्य असते असे नाही. त्यांना लोकांना खुश ठेवणे महत्वाचे असते, कारण तेच मते देत असतात, सरकारची पाच वर्षे संपल्यानंतर लोकांकडेच मतांचा जोगवा मागावा लागत असतो. विश्लेषक, पतमानांकन संस्था यांनाही समाधानी ठेवावी लागते कारण लोकांपुढे आर्थिक चित्र तेच निर्माण करीत असतात व देशाच्या पत व अर्थमानांकनावर परदेशी गुंतवणूक अवलंबून असते. परदेशी गुंतवणुकीवर सगळे चालत नाही. देशातील उद्योजकही महत्वाचे असतात कारण ते भांडवली गुंतवणूक करून उद्योग उभे करतात त्यामुळे कंपन्यांनाही खुश ठेवणे महत्वाचेच ठरते. पण मग या तीनही घटकांना खुश ठेवण्यासाठी अशी कुठली व्यवस्था असू शकते. तर त्यासाठी अर्थ व्यवस्थापन हा एक मार्ग आहे. त्यात आर्थिक मजबुतीकरणाकडे वाटचाल होते.

परिपूर्ण आर्थिक व्यवस्थापन धोरणांना केवळ गणित व कठोर उपायोजना यांचे पाठबळ पुरेसे नसते तर त्यात व्यवहार्य दृष्टिकोन ठेवावा लागतो. यंत्रणेमागे, योजनांमागे मानवी चेहरा असावा लागतो. हे सर्व लक्षात घेतले तर सरकारच्या आर्थिक व्यवस्थापन धोरणामागे सात महत्वाचे मुद्दे आहेत ते खालीलप्रमाणे.

### अ. कोळसा,स्पेक्ट्रम व खनिजांचा लिलाव

आधी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य असे धोरण नैसर्गिक स्त्रोत वितरणात वापरले जात होते पण त्यामुळे

भ्रष्टाचार झाला. २५ ऑगस्ट २०१४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने एका निकालात २०४ कोळसा क्षेत्रांचे वाटप रद्द केले होते. त्यानंतर खाणींचे वाटप हे लिलावाने करण्याचे ठरले किंवा या खाणी सरकार कंपन्याना द्याव्यात असा एक पर्याय मांडला गेला. त्यानंतर त्याबाबत एक वटहुकूम काढण्यात आला व नंतर तो कायदा बनला. त्यामुळे लिलाव किंवा सरकारी कंपन्यांना खाणवाटपाची प्रक्रिया सुलभ झाली. आतापर्यंत ८२ कोळसा खाणींचे लिलाव करण्यात आले असून त्यात ६ खाणी राज्य सरकारांना मिळाल्या आहेत. ३१ खाणींचा इ लिलाव झाला तर इतर ५१ खाणींचीही लिलाव प्रक्रिया झाली. नवीन प्रक्रियेने सरकारी तिजोरीला काय फायदा झाला तर २००१ ते २०१४ या काळात कोळसा खाणी सरसकट वाटल्याने सरकारला झालेल्या तोट्याचा विचार केला नव्हता पण महालेखा परीक्षक व नियंत्रकांच्या कोळसा खाण वाटप व उत्पादन अहवालात असे म्हटले होते की खासगी कंपन्यांना कोळसा खाणीतून १.८६ लाख कोटींचा नफा मिळाला. हा आकडा कोल इंडिया लिमिटेडच्या २०१०-११ मधील सरासरी कोळसा विक्री किंमतीवरून काढण्यात आला आहे. आता यात लिलाव किंवा वाटप पद्धत वापरल्याने ४ लाख कोटी रूपयांचा सरकारला फायदा मिळू शकतो व तो पश्चिम बंगाल, झारखंड, मध्यप्रदेश व छत्तीसगड या राज्यांना वाटला जाऊ शकतो. इतर खनिजांच्या बाबतीत सांगायचे तर त्यांना खनिजे व खाणींचा लिलाव खाणी व खनिजे विकास व नियमन सुधारणा कायदा २०१५ अनुसार करण्याचा अधिकार आहे. आंध्र प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, कर्नाटक, ओडिशा, राजस्थान व मध्यप्रदेश या राज्यात अशा २१ खाणक्षेत्रांचा लिलाव यशस्वीपणे करण्यात आला आहे. या राज्यांना लिलावातून ५० हजार कोटी रूपये. मिळणार आहेत व दहा राज्यात आणखी ७१ खाणी व खनिज क्षेत्रांचे लिलाव होणार आहेत.

स्पेक्ट्रमचा लिलाव हे त्याचे दुसरे उदाहरण. त्यांच्या लिलावातूनही सरकारला पैसा मिळत आहे.

---

**केंद्र व राज्य सरकार अनेक वस्तूंच्या किंमतीत अनुदान देत असते त्यात तांदूळ, गहू, डाळी, साखर, केरोसिन, एलपीजी, नॅफ्था, पाणी, वीज, डिझेल, खते, लोहखनिज, रेल्वे भाडे यांचा समावेश आहे. या अनुदानावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.२४ टक्के म्हणजे ३७८००० कोटी रूपये खर्च होत असतात. आता यात मोठा प्रश्न असा की, यात फायदा नेमका कुणाला होतो व दुसरा प्रश्न म्हणजे गरिबांना खरोखर फायदा होतो का?**

---

लिलावाची प्रक्रिया २०१२ मध्ये सुरू झाली असली तरी त्याला सध्याचे सरकार आल्यानंतर खरा वेग आला आहे. सरकारचा असा दावा आहे की, या लिलावांमध्ये पहिल्या तीन वर्षात तरी सरकारला १०७९१.०८ कोटी रूपये २०१४-१५ मध्ये शून्य लक्ष्य असताना मिळाले. २०१५-१६ मध्ये २१५८७ कोटींचे लक्ष्य असताना २१५८७ कोटी मिळाले तर २०१६-१७ मध्ये ३३१९४ कोटी रूपये लक्ष्य असताना ३३१९६.८७ कोटी रूपये मिळाले. लिलावाने नैसर्गिक स्त्रोतांच्या पारंपरिक वाटप पद्धतीपेक्षा सरकारला जास्त पैसा मिळाला. इ लिलावामुळे पद्धत अधिक पारदर्शी झाली. फोर्बस मासिकाने लिलाव पद्धतीचे कौतुक करताना म्हटले आहे की, नैसर्गिक स्त्रोतांचे हक्क वितरित करण्याची ही योग्य पद्धत असून त्यामुळे भारत हा अर्थसंपन्न देश होऊ शकतो, हे प्रश्न हाताळण्याची हीच एक योग्य पद्धत आहे.

जॅम त्रिसूत्री (जनधन, आधार, मोबाईल)- जॅम म्हणजे जनधन, आधार व मोबाईल या तीन साधने व पद्धतींनी आर्थिक व्यवस्थापन धोरण अधिक मजबूत झाले आहे. जॅमची सविस्तर माहिती घेण्याआधी ते आवश्यक का आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. सरकार समाजातील वंचित लोकांसाठी कल्याण योजना राबवित असते त्यावर कोट्यवधी रूपये खर्च होतात. त्यात अनुदान हे प्रमुख साधन असते. आर्थिक आढावा सर्वेक्षण २०१५-१६ अनुसार गरिबी निर्मूलनात अनुदान हे महत्वाचे धोरण मानले जाते. केंद्र व राज्य सरकार अनेक वस्तूंच्या किंमतीत अनुदान देत असते त्यात तांदूळ, गहू, डाळी, साखर, केरोसिन, एलपीजी, नॅफ्था, पाणी, वीज, डिझेल, खते, लोहखनिज, रेल्वे भाडे यांचा समावेश आहे. या अनुदानावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.२४ टक्के म्हणजे ३७८००० कोटी रूपये खर्च होत असतात. आता यात मोठा प्रश्न असा की, यात फायदा नेमका कुणाला होतो व दुसरा प्रश्न म्हणजे गरिबांना खरोखर फायदा होतो का? आर्थिक सर्वेक्षण २०१५-१६ अन्वये अनुदाने देणे हे कधीच विकासाचे लक्षण

नसते, कारण यात अनुदानातून गरिबांपेक्षा श्रीमंतांना अधिक फायदा होत असतो. एलपीजीचे उदाहरण घेतले तर यात गरिबात गरीब ५० टक्के कुटुंबे केवळ २५ टक्के एलपीजी गॅस वापरतात. कमी उत्पन्न गटातील लोकांना यातून दरडोई महिन्याला १० रूपये मिळतात तर श्रीमंतांना दरडोई ८० रूपये मिळतात. केरोसिनच्या बाबतीतही दारिद्र्य रेषेखालील केवळ ४६ टक्के कुटुंबे हे केरोसिन वापरतात. अंत्योदय योजनेतही हे प्रमाण तेवढेच आहे याचा अर्थ ५१ टक्के अनुदानित केरोसिन हे श्रीमंत लोक वापरतात व १५ टक्के केरोसिन हे सुस्थितीतील श्रीमंत वापरतात. उत्तम आर्थिक व्यवस्थापन धोरणाच्या हे विरोधात असून यात अनुदानित केरोसिन गरिबांना कमी व श्रीमंतानाच अधिक फायदा देत आहे. याचे उत्तर म्हणजे सरकार देत असलेले अनुदान हे वाढतच असताना ते कुठे जाते याचा शोध घेणे हा आहे. मुख्य आर्थिक सल्लादार अरविंद सुब्रह्मण्यम यांनी येथे जॅम हा शब्द वापरला आहे त्यात प्रत्येकाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याची ताकद आहे.

जनधन- सध्याच्या सरकारने आर्थिक सर्वसमावेशकतेसाठी जनधन खाती प्रधानमंत्री जनधन योजनेत उघडली त्यात प्रत्येक घरात एक बँक खाते हा हेतू होता एकूण २८ कोटी खाती यात उघडली गेली. योग्य लाभार्थींनाच अनुदान मिळावे हा त्यामागील हेतू आहे.

आधार- आधारक्रमांक हा बारा अंकी व्यक्तीगत ओळख क्रमांक आहे आता बहुदा प्रत्येक प्रोढाला आधार क्रमांक दिलेला आहे. यातून केवळ लाभार्थींची ओळख पटणार आहे असे नाही तर लाभ थेट पोहोचणार आहेत. आधारक्रमांक हा बँक खात्याशी निगडित केल्याने लाभार्थींचा अनुदानाचा पैसा थेट त्यांच्या खात्यात टाकणे सोपे झाले आहे.

मोबाईल- देशात १ अब्ज मोबाईल कनेक्शन आहेत. आर्थिक प्रणाली डिजिटल मार्गाने उपलब्ध करून देणे हा त्यामागचा हेतू आहे. मोबाईलच्या मदतीने संबंधितांना अनुदानाचे पैसे खात्यात जमा झाल्याचे समजते तसेच आर्थिक व्यवहारही त्यात करता येतात. त्यासाठी स्मार्टफोन आवश्यक आहे व त्यातून पैसे एका खात्यातून दुसऱ्या खात्यात पाठवता येतात. सरकार जॅमच्या त्रिसूत्रीचा वापर २०१४-१५ पासून करीत आहे, त्यातून चांगले परिणाम झाले आहेत. सरकारने अनेकदा असे म्हटले आहे की, थेट आर्थिक हस्तांतरामुळे ५० हजार कोटी रूपये वाचले आहेत. सार्वजनिक वितरण प्रणालीत १४००० कोटी रूपये वाचले तर मनरेगात ७६०० कोटी तर एलपीडी पहलमध्ये २६४०० कोटी रूपये वाचले आहेत. पैशाचे योग्य लाभार्थीला वाटप करण्याची थेट हस्तांतर पद्धत वापरल्याने हे शक्य झाले.

### क) वस्तू व सेवा कर

जॅम व लिलाव पद्धतीने आर्थिक व्यवस्थापनाला मानवी चेहरा दिला तर उद्योग करण्यास अनुकूलता निर्माण करण्यासाठी वस्तू व सेवा कर पद्धती गरजेची आहे. सरकार येत्या १ जुलै २०१७ पासून ही प्रणाली लागू करीत आहे, ही अप्रत्यक्ष कर पद्धती असून त्यात भारत ही एकसंध बाजारपेठ होईल व नवीन अप्रत्यक्ष कर अस्तित्वात येईल. यात करचुकवेगिरी, अनेक पातळ्यांवर तपासण्या या बाबी दूर होतील. सरकारचा महसूल वाढेल. कर व देशांतर्गत उत्पन्न यांचे परस्पर प्रमाण सुधारेल. सध्या २०१५-१६ मधील आकडेवारीनुसार हे प्रमाण ५.२ टक्के आहे . ते कमी असण्याला अनेक कारणे आहेत. अनेक क्षेत्रे सेवाकराच्या बाहेर आहेत. कृषीवर कर नाही, लघु उद्योगांना करासाठी उत्पन्नाची अट जास्त आहे. सामाजिक व आर्थिक कारणास्तव काहींना सूट देण्यात आली आहे यामुळे हे कराचे उत्पन्न वाढत नाही. अन्नधान्ये व शेतमाल यांना जीएसटीतून सूट दिली असली तरी इतर सवलती चालू राहतील का, याबाबत शंका आहे. निदान काही सवलती तरी जीएसटी (वस्तू व सेवा कर) प्रणालीत काढून टाकणे अपेक्षित आहे. त्यामुळे देशांतर्गत उत्पन्नाच्या तुलनेत अप्रत्यक्ष कर महसूल वाढेल. जीएसटीमुळे देशात एकसमान कर पद्धती येईल व त्यामुळे कंपन्यांना उद्योग करणे सुलभ होईल व कराचा पायाही वाढेल परिणामी जास्त महसूल सरकारला मिळेल.

### फलश्रुती अर्थसंकल्प

अर्थसंकल्प मांडला जातो पण प्रत्यक्षात त्याचा परिणाम काय झाला हे या 'आउटकम बजेट' म्हणजे फलश्रुती अर्थसंकल्पातून सांगितले जाईल, ते संसदेत मोजमापाच्या पातळीवर सांगावे लागेल. त्यामुळे विविध संस्थांचे उत्तरदायित्व वाढणार आहे. कुठल्याही प्रकल्पाची प्रगती काय झाली, किती खर्च झाला, काम किती झाले हे सांगावे लागणार आहे. सेवा देताना त्यातील गुणात्मक व संख्यात्मक परिणाम स्पष्ट केला जाईल. विविध घटकांच्या आधारे हे

मूल्यमापन केले जाईल. एकूण ६८ मंत्रालये व विभाग यांना योजनाखर्च दिलेला असतो. त्याचा नेमका काय उपयोग केला हे सांगावे लागणार आहे. योजनांची उद्‌दिष्टे कितपत साध्य झाली हे त्यातून कळेल . सरकारी यंत्रणेत त्यामुळ उत्तरदायित्व येईल. काही उद्‌दिष्टे का पूर्ण झाली नाहीत, त्याला कोण जबाबदार आहे, हे ठरवता येईल.

खर्चाचे फेरवर्गीकरण- २०१७-१८ च्या अर्थसंकल्पापासून खर्च हा योजनांतर्गत व योजनाबाह्य असा विचारात घेतला जाणार नाही. हा भेद काढून टाकला आहे. सर्व खर्च हा भांडवल व महसूल असा गणला जाईल. सरकारला असे वाटते की, योजना व योजनाबाह्य असे वर्गीकरण योजनांसाठी अर्थतरतूद करताना संपूर्ण चित्र पुढे आणत नाही. सेवा देण्याचा खर्च समजत नाही. मालमत्तांच्या निगराणीवर योग्य खर्च होत नाही व सामाजिक सेवांवरचा नेमका खर्च कळत नाही व तो योग्य प्रकारे होतो की नाही हे वर्गीकरणामुळे समजत नाही. योजनांतर्गत व योजनाबाह्य खर्च एकत्र दाखवल्याने अर्थसंकल्पीय रचना महसूल व भांडवली खर्च यावर लक्ष केंद्रित करू शकते.

**रेल्वे व सामान्य अर्थसंकल्पाचे विलीनीकरण**

आता वार्षिक अर्थसंकल्प व रेल्वे अर्थसंकल्प एक करण्यात आले आहेत. रेल्वे अर्थसंकल्प वेगळा मांडण्याची पद्‌धत बंद करण्यात आली. एकात्मिक अर्थसंकल्पामुळे रेल्वे केंद्रस्थानी येऊन सरकारच्या आर्थिक स्थितीचे सर्वसमावेशक चित्र पुढे आले आहे. प्रक्रियात्मक खर्च कमी झाला असून सुशासनाला त्यामुळे उत्तेजन मिळणार आहे. त्यामुळे सरकारचे वर्षाला ९७०० कोटी रूपये वाचणार आहेत.

**अर्थसंकल्प अलिकडे आणण्याचा फायदा**

अर्थसंकल्प पूर्वी २८ फेब्रुवारीला मांडला जात असे. आता तो १ फेब्रुवारीला मांडला जाऊ लागला आहे. त्यामुळे अर्थविधेयकाची अंमलबजावणी ३१ मार्चपासून सुरू होईल. आधी ती मे-जून दरम्यान होत असे परिणामी विविध मंत्रालये व विभाग यांना पैसा खर्च करण्यासाठी १२ महिन्यांएवजी नऊ महिने उरत असत. अर्थसंकल्प अलिकडे घेतल्याने अर्थसंकल्प अंमलबजावणी वेगाने होईल. यात लेखानुदानाची आता गरज राहिलेली नाही. नवीन कर रचनेतील बदलांची अंमलबजावणी शक्य होईल. आर्थिक वर्षाच्या सुरूवातीलाच हे सगळे शक्य होईल. १९९९-२००४ मध्ये तेव्हाच्या सरकारने आर्थिक उत्तरदायित्व व अर्थसंकल्प व्यवस्थापन म्हणजे एफआरबीएम कायदा २००३ मध्ये आणला होता. त्याचा हेतू चांगले मजबूत आर्थिक व्यवस्थापन हा होता. आता तोच कायदा सध्याच्या सरकारने पुन्हा वेगळ्या पद्‌धतीने मांडला आहे. एफआरबीएम समितीने अहवाल मांडून प्रक्रिया सुरू केली आहे. समितीने कर्ज व राष्ट्रीय उत्पन्न यांचे परस्पर प्रमाण ६० टक्के मान्य केले असून ते २०२३ पर्यंतच्या काळासाठी आहे. केंद्र सरकार ४० टक्के तर राज्य सरकार २० टक्के अशी त्याची विभागणी राहील त्यात पुढील तीन वर्षांसाठी ३ टक्के वित्तीय तुटीची मान्यता आहे. यात देशांतर्गत राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत ही तूट ३ टक्क्यांच्या ०.५ टक्के अलिकडे पलिकडे असू शकेल. समितीने यात अनेक आर्थिक सुधारणा सुचवल्या असून त्यात अनेक घटकांचा समावेश आहे. अर्थमंत्र्यानी मात्र एस्क्पे क्लॉजचा आग्रह अर्थसंकल्प मांडताना धरला नाही पण खासगी क्षेत्राची कमी गुंतवणूक, जागतिक अर्थव्यवस्थेची मंदगती लक्षात घेता थोडी सूट घेऊन केंद्र सरकारने आर्थिक तूट २०१७-१८ मध्ये ३.२ टक्के अपेक्षित धरली आहे. नंतर ती तीन टक्के अपेक्षित आहे. सरकारने आर्थिक शिस्त पाळल्याने अजून अनेक विश्लेषकांनी डोळे वटारलेले नाहीत. या सरकारने मे २०१४ मध्ये हाती सूत्रे घेतली त्यानंतर आर्थिक व्यवस्थापन व शिस्त यांचे पालन केले आहे हे वित्तीय तूट कमी असल्यावरून दिसून येते २०१३-१४ मध्ये वित्तीय तूट ही एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.५ टक्के होती तर २०१४-१५ मध्ये ती ३.९ टक्के तर २०१६-१७ मध्ये ३.५ टक्के झाली. २०१८-१९ मध्ये सरकार ही तूट ३ टक्क्यांपर्यंत खाली आणेल अशी अपेक्षा आहे.

■ ■ ■

*लेखक एबीपी न्यूज नेटवर्कमध्ये बिझिनेस एडिटर असून आर्थिक आणि व्यापार विषयक पत्रकारितेचा त्यांना २१ वर्षांचा अनुभव आहे.*

*email: hblshishir@gmail.com*

# स्वच्छ भारत मोहीम - जबाबदारी प्रत्येकाची

परमेश्वरन अय्यर



**मोहिमेला सुरुवात झाल्यापासून देशातील ग्रामीण भागात स्वच्छतेच्या सोयी-सुविधा पोहोचविण्याच्या प्रमाणात ४२ टक्क्यांवरून ६३ टक्के इतकी वाढ झाली आहे. उघडयावर शौचाला बसणाऱ्या लोकांच्या संख्येत ५५० दशलक्ष वरून ३५० दशलक्ष इतकी घट झाली आहे.तीन राज्यातल्या १३० जिल्हयांमधील एक लाख ९०,००० गावे हागणदारीमुक्त झाली आहेत.**

स्वच्छ भारत मोहीम सुरु झाल्यानंतरच्या या टप्प्यावर या मोहिमेला आता चांगलीच चालना मिळाली असून उल्लेखनीय प्रगती झाली आहे.लाल किल्ल्यावरून ऑक्टोबर, २०१४ मध्ये ही मोहीम सुरु करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या भावना व्यक्त केल्या होत्या त्याप्रमाणे या मोहिमेला आता हळूहळू लोक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या मोहिमेला सुरुवात झाल्यापासून देशातील ग्रामीण भागात स्वच्छतेच्या सोयी-सुविधा पोहोचविण्याच्या प्रमाणात ४२ टक्क्यांवरून ६३ टक्के इतकी वाढ झाली आहे. उघडयावर शौचाला बसणाऱ्या लोकांच्या संख्येत ५५० दशलक्ष वरून ३५० दशलक्ष इतकी घट झाली आहे.तीन राज्यातल्या १३० जिल्हयांमधील एक लाख ९०,००० गावे हागणदारीमुक्त झाली आहेत. दोन ऑक्टोबर,२०१९पर्यंत संपूर्ण देश हागणदारीमुक्त करण्याच्या दिशेने हा कार्यक्रम यशस्वी वाटचाल करीत आहे.

स्वच्छतेला प्राधान्य देणे हे अनेक कारणांसाठी महत्त्वाचे आहे. स्वच्छतेचा अभाव हे पाच वर्षांखालील मुलांमध्ये जुलाब/ अतिसार होण्याचे महत्त्वाचे कारण आहे.त्यामुळे त्यांची वाढ खुरटण्याचा किंवा बालमृत्यू होण्याचा धोकाही संभवतो.महिलांची सुरक्षितता आणि प्रतिष्ठा यांच्या दृष्टीनेही स्वच्छता हा एक महत्वाचा घटक ठरतो.एकीकडे भारत आर्थिक महासत्ता होण्याच्या दिशेने वेगाने प्रगती करीत आहे, तर दुसरीकडे उघडयावर शौचाला बसण्याची पद्धत देशात सुरु आहे. ही पद्धत संपूर्णपणे बंद होणे अत्यावश्यक आहे.

स्वच्छ भारत मोहीम ही आधीच्या स्वच्छताविषयक कार्यक्रमांप्रमाणे केवळ शौचालय बांधणे एवढयाचपुरती मर्यादित नाही.तर लोकांच्या वर्तनात बदल घडवणारी ती एक सामूहिक चळवळ आहे.रस्ते,पूल किंवा विमानतळ बांधणे एकवेळ सोपे आहे पण मानवी वर्तनात बदल घडवणे ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. आपल्या देशात सुमारे अर्धा अब्ज लोकसंख्या उघडयावर शौचाला बसते. वर्षानुवर्षांची त्यांची ही सवय बदलायला लावून त्यांना शौचालयांचा वापर करायला शिकवणे म्हणजेच त्यांच्या वर्तनात बदल घडवणे हे प्रचंड असे काम आहे.प्रसारमाध्यमांमधून याविषयी जनजागृती मोहिमा राबवणे हे तर उपयुक्त आहेच.पण खरी गरज आहे ते तळागाळापर्यंत जाऊन तेथील लोकांना याचे महत्त्व पटवून देणाऱ्या प्रशिक्षित कार्यकर्त्यांची! त्यांनी विशेषतः ग्रामीण भागात जाऊन,तेथील लोकांशी संवाद साधून त्यांना प्रोत्साहन आणि प्रेरणा देण्याचे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. लोकांना एकदा का महत्त्व पटले

की तेच शौचालयांची, स्वच्छतेची मागणी करू लागतात. देशातील राज्याराज्यांमध्ये, जिल्ह्यांमध्ये सध्या असे प्रशिक्षित प्रोत्साहक/प्रेरक मोठया प्रमाणावर काम करीत आहेत. मात्र,त्यांची संख्या आणखी वाढवून सुमारे पाच लाख करण्याची म्हणजे सरासरी प्रत्येक गावाला एक प्रोत्साहक नेमण्याची सरकारची योजना आहे.

स्वच्छ भारत मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारचे पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय विविध उपक्रमांसाठी राज्यांना मदत करत आहे.यामध्ये क्षमता बांधणी,मानवी साधनसंपत्ती,वर्तन बदल संवाद,इतरांबरोबर ज्ञानाची देवाणघेवाण,देखरेख आणि मूल्यमापन आदिंचा समावेश आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत तंत्रज्ञानाचा पद्धतशीरपणे वापर करण्यात आला आहे.स्वच्छ संग्रह,स्वच्छ भारत मोहिमेसाठी पोर्टल,त्याद्वारे जिल्हे आणि राज्यांना सर्वोत्कृष्ट पद्धतींविषयी दिली जाणारी माहिती,आभासी वर्गांच्या माध्यमातून शेकडो प्रोत्साहकांना दिले जाणारे प्रशिक्षण ही त्याची काही उदाहरणे आहेत.याशिवाय,या मोहिमेत काम करणाऱ्यांसाठी राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर नियमितपणे अनेक कार्यशाळांचे आयोजन केले जाते.यानिमित्ताने त्यांना नवीन गोष्टी शिकता येतात.तसेच प्रेरणा देणाऱ्या अनुभवांची परस्परांच्यात देवाणघेवाण करता येते.सरपंच,विशेषतः महिला सरपंच यांच्यासारखे तळागाळातील सामान्य माणसांसाठी काम करणारे नेते या मोहिमेच्या प्रगतीला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

यावर्षी गुजरात मधील गांधीनगर इथे ८ मार्चला,जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने स्वच्छ शक्ती संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये देशभरातील सुमारे ६००० महिला सरपंच स्वच्छ भारत मोहिमेत त्यांना मिळालेले यश साजरे करण्यासाठी सहभागी झाल्या होत्या. यावेळी उपस्थित महिला सरपंचांना उद्देशून बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत मोहीम आणि 'बेटी बचाओ,बेटी पढाओ' यांसारख्या सरकारच्या प्रमुख कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी त्या करत असलेल्या योगदानाबद्दल त्यांची प्रशंसा केली.यावेळी स्वच्छतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या आणि त्यांच्या गावात प्रेरणादायी ठरलेल्या महिलांना पंतप्रधानांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

**वर्तनातील बदल आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर याच बरोबर स्वच्छता ही 'प्रत्येकाची जबाबदारी'आहे, हे ही लक्षात घेणे जरुरीचे आहे.स्वच्छतेच्या मुख्य प्रवाहातील या कामामध्ये खाजगी क्षेत्रासहित सर्व क्षेत्रे मोठया प्रमाणात सहभागी होत आहेत. याबाबत टाटा ट्रस्टचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे.त्यांनी स्वेच्छेने स्वच्छ भारत मोहिमेत पुढाकार घेतला. या कामाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी ६०० व्यावसायिक तरुणांची भरती केली.देशातील प्रत्येक जिल्ह्यासाठी एक याप्रमाणे हे तरुण संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना या मोहिमेसाठी मदत करतात.**

स्वच्छ भारत मोहीम ही लोकांची चळवळ तर करायचीच आहे पण त्याचबरोबर शौचालय बांधण्याचे तंत्रज्ञान सहज, सोपे असून ते कोणालाही शिकता येईल,तसेच त्याचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग करणे आवश्यक आहे,हे ही जनमानसात रुजवणे गरजेचे आहे. ग्रामीण भागाच्या दृष्टीने सर्वात "योग्य", खर्चाच्या बाबतीत सर्वांना परवडेल असा, टिकाऊ, आणि पुनर्वापर करता येईल असा शौचालयाचा प्रकार म्हणजे दोन खड्ड्यांचे शौचालय!ग्रामीण भागात मोठया प्रमाणात वापरता येईल,अनेक संदर्भात परिणामकारक ठरेल,असा हा प्रकार आहे.पण ग्रामीण भागातील घराघरांत तो पोचवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील.लोकांनी त्याचा स्वीकार करावा यासाठी कौशल्य पणाला लावावे लागेल. दोन्हीपैकी एक खड्डा भरला की (तो बंद असताना) घरमालक तो स्वतः सहजपणे,सुरक्षितपणेआणि पर्यावरणाला हानी न पोचवता तो खड्डा रिकामा करू शकतो.या प्रक्रियेतून शेतीला उपयुक्त ठरेल असे सेंद्रिय खत तयार होते. लोकांना याचे महत्त्व पटवण्यासाठी,काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी,प्रसिद्ध व्यक्तींनी शौचालयाचे ते खड्डे कसे रिकामे करावेत याची वारंवार प्रात्यक्षिके करून दाखवावीत म्हणजे लोकांचे याबाबतचे शंका निरसन होईल आणि ते ही अशा प्रकारची शौचालये स्वतःच्या घरी बांधून त्याचा वापर सुरु करतील. ग्रामीण भागात याचा मोठया प्रमाणावर प्रचार झाला आणि प्रत्येक घराच्या मैला व्यवस्थापनाचे काम तो तो घरमालक स्वतःच करायला शिकला तर शौचालयांसाठी जुळे खड्डे तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि वापरात मोठया प्रमाणात आणि वेगाने वाढ होईल.

वर्तनातील बदल आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर याच बरोबर स्वच्छता ही 'प्रत्येकाची जबाबदारी'आहे,हे ही लक्षात घेणे जरुरीचे आहे. स्वच्छतेच्या मुख्य प्रवाहातील या कामामध्ये खाजगी क्षेत्रासहित सर्व क्षेत्रे मोठया प्रमाणात सहभागी होत

आहेत.याबाबत टाटा ट्रस्टचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांनी स्वेच्छेने स्वच्छ भारत मोहिमेत पुढाकार घेतला. या कामाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी ६०० व्यावसायिक तरुणांची भरती केली. देशातील प्रत्येक जिल्ह्यासाठी एक याप्रमाणे हे तरुण संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना या मोहिमेसाठी मदत करतात. त्यांना आर्थिक पाठबळही टाटा ट्रस्टकडूनच दिले जाते. पंतप्रधानांनी घेतलेल्या पुढाकारामुळे सार्वजनिक क्षेत्रात प्रत्येक पंधरवडा "स्वच्छता पंधरवडा"म्हणून साजरा केला जातो.याशिवाय, प्रत्येक मंत्रालयाने स्वच्छता कृती योजना तयार केली आहे.यासाठी त्यांच्या अर्थसंकल्पात तरतूदही करण्यात आली आहे. यामुळे त्यांच्या मुख्य कामकाजातच स्वच्छता या विषयाचा समावेश करण्यात आला आहे.

स्वच्छताविषयक कार्यक्रमांसाठी, सर्व मंत्रालयांनी २०१७-१८ या वर्षासाठी अंदाजे ५,००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याशिवाय सुवर्ण मंदिर, तिरुपती मंदिर यांसारख्या पवित्र स्थळांची स्वच्छता आंतरराष्ट्रीय मानकानुसार केली जाते. तसेच,गंगेच्या स्वच्छतेबरोबरच तिच्याशी संबंधित असलेल्या ग्रामपंचायतींचीदेखील स्वच्छता केली जाते.याचाच अर्थ स्वच्छता केवळ घरापुरती,ग्रामीण भागापुरती,शौचालयांपुरती मर्यादित न राहता मुख्य प्रवाहाचा विषय होऊ लागली आहे. सर्व क्षेत्रे, सर्व जागांबाबत ती महत्त्वाची ठरू लागली आहे.

स्वच्छ भारत मोहिमेचा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे परिणामांची पडताळणी करणे आणि त्यांचे सातत्य टिकवून ठेवणे. कार्यक्रमाच्या विश्वासार्हतेसाठी ते आवश्यक आहे. सध्या, या कार्यक्रमाबाबत बहुस्तरीय पद्धत राबवली जात असून जिल्हा-पातळी,राज्य-पातळी आणि राष्ट्रीय पातळीवर तिसऱ्या तटस्थ पक्षाकडून कार्यक्रमाची पडताळणी केली जात आहे.मूल्यमापन केले जात आहे. येत्या काही दिवसांत या प्रयत्नांना आणखी बळकटी आणणे आवश्यक आहे.हा कार्यक्रम मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे.

सरकारच्या आधीच्या कार्यक्रमापेक्षा ही हागणदारीमुक्त गाव योजना वेगळी आहे.या योजनेत एकदा यश मिळाले की झाले असे नाही. त्यामुळे या कार्यक्रमात सातत्य राखणे महत्त्वाचे आहे.हागणदारीमुक्त गावाचा दर्जा मिळवणे ही बाब एकवेळ ठीक आहे.पण स्थानिक यंत्रणा निर्माण करून आणि लोकांना प्रोत्साहन देऊन या कार्यक्रमात सातत्य टिकवणे ही वेगळी गोष्ट आहे.या कार्यक्रमात सातत्य राहावे यासाठीचे काही नियम पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाने,राज्यांच्या सहकार्याने विकसित केले आहेत. त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.याशिवाय मंत्रालयाकडे मजबूत अशी व्यवस्थापन माहिती यंत्रणा आहे.ग्रामीण भागातील प्रत्येक घराने किती प्रगती केली आहे याचा मागोवा ही यंत्रणा घेते.स्वच्छ ॲप बरोबरच ही व्यवस्थापन माहिती यंत्रणादेखील सार्वजनिक अखत्यारित आहे.सर्वांसाठी ती खुली आहे.

सुका आणि ओल्या कचऱ्याचे परिणामकारक व्यवस्थापन करणे हा देखील स्वच्छ भारत मोहिमेचा एक महत्त्वाचा भाग आहे.देशातील बऱ्याच गावांमध्ये सुका आणि ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यास सुरुवात झाली आहे. ज्या गावांनी हागणदारीमुक्त गावाचा दर्जा अगोदरच मिळवला आहे, त्यांच्यावर तर कचरा व्यवस्थापनाबाबत विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाने खेडेगावाचा स्वच्छता निर्देशांक विकसित केला आहे. यानुसार एकंदर स्वच्छतेबाबत गावे स्वतःच स्वतःला गुण देऊ शकतात आणि आपण किती प्रगती केली आहे,याचे मोजमाप करू शकतात. या निर्देशांकात, हागणदारीमुक्त गावाचा दर्जा, सुका आणि ओला कचऱ्याचे परिणामकारक व्यवस्थापन,गावात सर्वसाधारणपणे दिसणारी स्वच्छता इत्यादी बाबींचा विचार केला जातो.त्यानुसार + ही श्रेणी दिली जाते. मात्र, त्यासाठी गावाने आधी हागणदारीमुक्त गावाचा दर्जा मिळवणे आवश्यक असते. त्यानंतर आधी उल्लेख केलेल्या बाबींचा विचार करून, त्यामध्ये गावाने केलेली कामगिरी लक्षात घेऊन त्या गावाला वरचा म्हणजे + हा दर्जा दिला जातो.

या टप्प्यावर जरा थांबून विचार केला तर स्वच्छ भारत मोहीम चांगली प्रगती करीत आहे असे दिसते. मात्र, केंद्र आणि राज्य दोन्ही पातळीवर काम करणाऱ्या संघांना याची पूर्ण जाणीव आहे की अजून त्यांना मोठा रस्ता पार करायचा आहे,अनेक आव्हानांना सामोरे जायचे आहे. पंतप्रधानांचे नेतृत्व, राज्याराज्यातील राजकीय नेत्यांचा पाठिंबा,प्रशासकीय कर्मचारी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तळागाळातील सामान्य माणसांपर्यंत पोहोचणारे सरपंचांसारखे विशेषतः महिला सरपंचांसारखे नेते या सगळ्यांच्या सहकार्याने देशात स्वच्छ भारत मोहीम नावाची लोक चळवळ यशस्वी होणार असा विश्वास प्रत्येकाला वाटत आहे.

■ ■ ■

*लेखक भारत सरकारच्या पेयजल आणि स्वच्छता खात्याचे सचिव आहेत.*

*email: param.iyer@gov.in*

# उपजिविकेच्या साधनाद्वारे जीवनमानात सुधारणा

अमरजीत सिन्हा



**भारताचा महासत्ता म्हणून जागतिक पातळीवर उदय केवळ ग्रामीण दारिद्र्य आणि ग्रामविकासावर प्रभावी तोडगा काढल्यानंतरच होऊ शकतो. म्हणूनच सरकारने ग्रामीण भागातील जीवनमान सुधारण्याला प्राधान्य दिले आहे. समावेशी ग्रामीण विकासाच्या माध्यमातून शाश्वत मनुष्य विकास शक्य आहे. ग्रामीण दारिद्र्याचे अनेक पैलू आहेत. म्हणूनच दारिद्र्यनिर्मूलनासाठी सर्व पैलूंवर प्रकाश टाकण्याची आवश्यकता आहे**

शाश्वत आर्थिक विकास आणि मानवी विकासासाठी ग्रामविकास हा कळीचा मुद्दा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था तीव्र गतीने विकास करत असेल तर दारिद्र्य निर्मूलन अतिशय जलद होते, कृषी आणि गैर-कृषी क्षेत्रात उपजिविकेच्या अनेक संधी उपलब्ध होतात. भारताचा महासत्ता म्हणून जागतिक पातळीवर उदय केवळ ग्रामीण दारिद्र्य आणि ग्रामविकासावर प्रभावी तोडगा काढल्यानंतरच होऊ शकतो. म्हणूनच सरकारने ग्रामीण भागातील जीवनमान सुधारण्याला प्राधान्य दिले आहे. समावेशी ग्रामीण विकासाच्या माध्यमातून शाश्वत मनुष्य विकास शक्य आहे.

ग्रामीण दारिद्र्याचे अनेक पैलू आहेत. म्हणूनच दारिद्र्य निर्मूलनासाठी सर्व पैलूंवर प्रकाश टाकण्याची आवश्यकता आहे. गरीबीच्या व्याख्येत निवारा नसणे, शिक्षणाचा अभाव, कौशल्याचा अभाव, साधनांचा अभाव, आरोग्याचा अभाव या सर्वांचा समावेश होतो. यास अनेक बाबी कारणीभूत असू शकतात. म्हणून ग्रामविकासासाठी मुख्य आव्हान आहे ते प्रत्येक ग्रामीण कुटुंबांना संधी उपलब्ध करून देणे आणि पूर्ण क्षमतेने त्यांना या संधीचा लाभ घेण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.

ग्रामविकास खाते दरवर्षी एक लाख कोटी रुपयांपेक्षाही जास्त खर्च विविध विभागांच्या माध्यमातून ग्रामविकासावर करते. दरवर्षी तीन ते चार लाख कोटी केवळ ग्रामीण भागासाठी खर्च केले जातात.

दुष्काळाचा सामना करण्यासाठी जलसंवर्धनावर भर दिला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पीक, पशूधन आणि गैर-कृषी कार्यामध्ये भरभराट करता येईल. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही ग्रामीण भागात उपजीविकेचा एक स्रोत म्हणून पाहिली जाते. या योजनेअंतर्गत जलसिंचनासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

दीन दयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मोहीम या अंतर्गत सुक्ष्म पतपुरवठा केला जातो. महिला बचत गटाच्या माध्यमातून आतापर्यंत ३१ लाख महिलांना ३.६ कोटी रुपयांचा पतपुरवठा केला आहे. महिला बचत गट, ग्राम संस्था, समुदाय संसाधन व्यक्ती, अशा

प्रकारे गटांच्या माध्यमातून योग्य बँक जोडणीसाठी प्रयत्न केले जात आहेत. गेल्या तीन वर्षात महिला बचत गटांना ८५ हजार कोटी रुपये दिले आहेत. या माध्यमातून ग्रामीण भागातील जीवनमान सुधारण्यास मदत होत आहे. तसेच मनरेगाच्या माध्यमातून शेळीपालन, पोल्ट्रीसाठी साहित्य, डेअरीसाठी साहित्य, शेततळी, विहीरी खोदणे या कामांवर भर देण्यात येत आहे.

**२०१६-१७ मध्ये ग्राम विकास कार्यक्रमांची कामगिरी**

२०१६-१७ मध्ये ग्रामविकास खात्याने बरेच ध्येय साध्य केले आहे. २०१०-११ मध्ये प्रधान मंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत रस्तेनिर्मितीचे काम प्रतिदिन ७३.५ किमी होते. २०१४-१६ कालावधीत ते प्रतिदिन १३० किलोमीटर रस्तेनिर्मितीपर्यंत आले. तर, २०१६-१७ मध्ये त्यात आणखी प्रगती होत आहे. तसेच, ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत इंदिरा आवास योजनेअंतर्गत अपूर्ण राहिलेली घरे प्रधान मंत्री आवास योजनेअंतर्गत पूर्ण केली जात आहेत. पंतप्रधानांच्या हस्ते २० नोव्हेंबर २०१६ रोजी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. आतापर्यंत ३२.१४ लाख घरांचे काम पूर्ण झाल्याचे राज्यांनी कळवले आहे. २०११-१४ मध्ये असलेल्या कामापेक्षा या कामाची गती दोन ते तीन पटीने अधिक आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत २०१६-१७ मध्ये ५२ लाख कामं पूर्ण झाली आहेत. आतापर्यंत हे प्रमाण २५ ते ३० लाख असे होते.

**प्रधानंत्री ग्राम सडक योजना**

- २०१६-१७ मध्ये विक्रमी ४७,३५० किलोमीटर रस्ते निर्मिती. एका वर्षात एवढ्या मोठ्या प्रमाणात रस्तेनिर्मितीचे कार्य होण्याची ही गेल्या सात वर्षातील पहिलीच वेळ आहे.
- ११,६१४ वसाहत निर्मिती. प्रधानमंत्री सडक योजनेच्या कामाबरोबरच वसाहतनिर्मितीचे आतापर्यंतचे ऐतिहासिक काम.
- ग्रामीण भागामध्ये रस्त्यांवरील कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करणे, पर्यावरणाची हानी कमी होईल याची काळजी घेणे, कमी खर्चात चांगले काम यावर भर देण्यात आला आहे. हरित तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अपारंपरिक साधने जसे प्लॅस्टीक, कोल्ड मिक्स, जिओ-टेक्सटाईल्स, राख, लोह आणि तांब्याच्या लाव्हाचा उपयोग रस्तेनिर्मितीसाठी करण्यात आला आहे.

**महिला बचत गट, ग्राम संस्था, समुदाय संसाधन व्यक्ती, अशा प्रकारे गटांच्या माध्यमातून योग्य बँक जोडणीसाठी प्रयत्न केले जात आहेत. गेल्या तीन वर्षात महिला बचत गटांना ८५ हजार कोटी रुपये दिले आहेत. या माध्यमातून ग्रामीण भागातील जीवनमान सुधारण्यास मदत होत आहे. तसेच मनरेगाच्या माध्यमातून शेळीपालन, पोल्ट्रीसाठी साहित्य, डेअरीसाठी साहित्य, शेततळी, विहीरी खोदणे या कामांवर भर देण्यात येत आहे.**

हरित तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रधानमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत २०१६-१७ मध्ये ४,११३.१३ किलोमीटर रस्ते निर्मिती करण्याता आली आहे.

**मनरेगा - २०१६-१७ मध्ये सुशासन आणि जलसंवर्धनावर भर**

२०१६-१७ या आर्थिक वर्षात मनरेगामध्ये सुशासन आणि जल संवर्धनावर भर देण्यात आला. ८२% पेक्षाही जास्त कार्यरत कामगारांना (९.१ कोटी) आधार कवच मिळाले. तर, ४.६ कोटी कामगारांना ९६% वेतन इलेक्ट्रॉनिक पेमेंटच्या माध्यमातून बँक, टपाल कार्यालयात मिळते. ८९ लाख मालमत्ता ही जिओ टॅग्ड आहे, तर योग्य मुल्यांकन करून ९३ लाख बनावट जॉबकार्डस वगळण्यात आली आहेत. मनरेगा अंतर्गत २३० कोटी मनुष्य दिन एवढे काम झाले. ही आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. तसेच मनरेगाअंतर्गत ५६ टक्के महिलांना रोजगार मिळाला आहे.

दुष्काळी भागातील मुख्यमंत्र्यांसमवेत पंतप्रधानांनी बैठका घेऊन जल संवर्धनाची मोहीम हाती घेतली. मुख्यमंत्री जल स्वावलंबन योजना ही ३२०० गावांमध्ये राबवली जाते. या माध्यमातून राजस्थानमध्ये ९२००० जलक्षेत्र निर्माण झाले आहेत. तर, झारखंडमध्ये शेततळी मोठ्या प्रमाणात आहेत. आंध्र प्रदेशमध्ये निरु चेतू, तेलंगणात मिशन काकतीय, मध्य प्रदेशात कपिलधार विहीरी, महाराष्ट्रामध्ये जलयुक्त शिवार या सर्व प्रकल्पांची कामे मनरेगाअंतर्गत केली जात

आहेत. २०१६-१७ आर्थिक वर्षात १५.४७ लाख जल संवर्धनाशी निगडीत कामं झाली आहेत.

मनरेगाअंतर्गत वैयक्तिक लाभधारकांना चांगला रोजगार मिळाला आहे (१४.६१ लाख लाभार्थी). पोल्ट्री, शेळीपालन, दुग्धव्यवसाय, शेततळी, विहीरी, घरांमध्ये शौचालय या माध्यमातून ग्रामीण जीवनमान सुधारले आहे. तामिळनाडूमधील ११००० गावांनी अभिनव असा घन कचरा व्यवस्थापनाचा उपक्रम हाती घेतला आहे. तेलंगणा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि इतर राज्यांमध्ये ओला कचरा व्यवस्थापनासाठी चार लाख जादुई खड्डे (मॅजिक पीटस) तयार करण्यात आली आहेत. २९७०४ अकुशल मजूरांना ग्रामीण स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षण केंद्रा अंतर्गत प्रशिक्षण पुरवण्यात आले आहे.

**प्रधानमंत्री आवास योजना- भाड्याच्या घरांकडून स्वतःच्या घराकडे**

पंतप्रधानांच्या हस्ते २० नोव्हेंबर २०१६ रोजी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. स्थानिक साधनं आणि स्थानिक गृहनिर्माण पद्धती समोर ठेवू घरांचे बांधकाम करण्यात आले. स्वयंपाकघर, शौचालय, एलपीजी जोडणी, वीज जोडणी, पाणीपुरवठा याकडे विशेष लक्ष देण्यात आले. लाभार्थी आपल्याला पाहिजे तसे घराचे डिजाईन देऊ शकत असल्यामुळे लाभार्थ्यांना मनासारखी घरे मिळाली.

२०१६-१७ मध्ये लाभार्थ्यांची निवड तंत्रज्ञानाचा वापर करुन करण्यात आली. तसेच इंदिरा आवास योजने अंतर्गत अपूर्ण असलेली ३६ लाख घरे पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रत्येक राज्यांमध्ये ग्रामीण गृहनिर्माणासाठी दोन ते २० बँक खाती होती. ते आता एकच प्रमुख बँक खाते करण्यात आले आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक पेमेंटच्या माध्यमातून व्यवहार होत असल्यामुळे आवास सॉफ्ट-पीएफएमएस च्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट रक्कम जमा होते.

२०२२ पर्यंत प्राथमिकता देऊन अतिशय पारदर्शकपणे लाभार्थींची निवड करण्यात आली आहे. गरजू आणि योग्य लाभार्थ्यांची निवड तीन स्तरावरील चाचणीतून करण्यात आली. अतिशय असुरक्षित समाजगट आणि महिला लाभार्थी यांना प्राधान्य देण्यात आले आहे. नैसर्गिक आपत्तीपासून घराचे रक्षण व्हावे, अशी बांधकाम रचना करण्यात आली आहे.

**२०१६-१७ या आर्थिक वर्षात मनरेगामध्ये सुशासन आणि जल संवर्धनावर भर देण्यात आला. ८२% पेक्षाही जास्त कार्यरत कामगारांना (९.१ कोटी) आधार कवच मिळाले. तर, ४.६ कोटी कामगारांना ९६% वेतन इलेक्ट्रॉनिक पेमेंटच्या माध्यमातून बँक, टपाल कार्यालयात मिळते. ८९ लाख मालमत्ता ही जिओ टॅग्ड आहे, तर योग्य मुल्यांकन करुन ९३ लाख बनावट जॉबकार्डस वगळण्यात आली आहेत. मनरेगा अंतर्गत २३० कोटी मनुष्य दिन एवढे काम झाले.**

मध्य प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, छत्तीसगड, कर्नाटक, आसाम या राज्यांनी पंतप्रधान आवास योजनेच्या कामात आघाडी घेतली आहे. बिहार, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम, झारखंड, राजस्थान, महाराष्ट्र या राज्यांनी इंदिरा आवास योजनेअंतर्गत अपूर्ण असलेली कामे पूर्ण केली आहेत.

२०१७-१८ मध्ये ग्राम विकास खात्याला आशा आहे की, ५१ लाख घरांचे काम पूर्ण होईल. तर, २०१७-१८ मध्ये ३३ लाख घरं पूर्ण होतील. तर, २०१६-१९ या काळात १.३५ कोटी घरांचे काम पूर्ण होईल. यामुळे २०२२ पर्यंत सर्वांना घर हे ध्येय पूर्ण होईल.

**दीन दयाल अंत्योदय योजना-**

दीन दयाल अंत्योदय योजनेमुळे ३.६ कोटी कुटुंबांच्या जीवनमानात अतिशय सकारात्मक बदल घडून आला आहे. महिला बचत गट मोठ्या प्रमाणात या योजनेशी जोडले गेले आहेत. ग्राम सभा आणि पंचायत राज प्रणालीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडून येत आहे. महिलांना आपले कौशल्य विकसित करण्यासाठी बँकेकडून कर्ज मिळवून दिले जात आहे. १.५० लाख महिलांना या योजनेमुळे दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदता आले आहे. शाश्वत कृषी, बँकिंग सुविधा, पशुपालन, ग्रंथपाल, या सर्वांच्या माध्यमातून ग्रामीण जीवनाला नवा आयाम प्राप्त झाला आहे.

२०११ मध्ये या योजनेचा आरंभ झाला तेंव्हापासून महिला बचत गटांना १.०६ लाख कोटी

रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. तसेच २०,००० कोटी बँक जोडणीच्या माध्यमातून २०१५-१६ मध्ये ३०,००० कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. फेब्रुवारी २०१७ पर्यंत २९,००० कोटी रुपयांचे कर्जवाटप झाले आहे, तर २०१६-१७ या आर्थिक वर्षात ३५,००० कोटी ते ३८,००० कोटी रुपये कर्जवाटप होईल अशी शक्यता आहे. आसाम, बिहार, ओडिशा, राजस्थान, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये बँक जोडणीचे काम अतिशय प्रभावी झाले आहे.

महिला किसान सशक्तीकरण परियोजना या कार्यक्रमा अंतर्गत ३० लाख महिला शेतकऱ्यांना कृषी कामासाठी मदत मिळाली आहे. महिला बचत गटांनी कृषी कामासाठी, पॉवर टिलर्ससाठी कस्टम हायरिंग सेंटर्स स्थापन केली आहेत. सेंद्रीय खतांच्या माध्यमातून महिला शेतकरी बहु-श्रेणी पीक घेत आहेत. तसेच चारा, अन्नधान्य, फळे, फायबर यासह वनसंवर्धनाकडे लक्ष देत आहेत.

आजतागायत देशातील सुमारे एक तृतीयांश ग्रामपंचायतींपर्यंत हा कार्यक्रम पोहचला आहे. २०१७-१८ मध्ये ५२ लाख कुटुंब आणि शेकडो बचत गट अंत्योदय योजनेशी जोडले गेले. ग्रामीण भागासाठी स्टार्ट अप कार्यक्रमाअंतर्गत १७ राज्यांमध्ये ८४,००० सुक्ष्म उद्योग उभारले आहेत. तामिळनाडू राज्यात महिला बचत गटांच्या माध्यमातून ११,००० खेड्यांमध्ये (सुमारे ९० टक्के) घन कचरा व्यवस्थापनाचे कार्य पूर्ण झाले आहे.

दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना आणि ग्रामीण स्वयं रोजगार योजना आणि प्रशिक्षण संस्था हे उपक्रम अंत्योदय योजनेअंतर्गत राबवले जातात. आतापर्यंत १.६० लाख युवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे, तर, ७९,४०० युवकांना रोजगार मिळाला आहे. शिवाय चार लाख युवकांना ५८५ प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षित करण्यात आले आहे. कॅफे कॉफी डे, अपोलो मेडिस्कील्स, टीम लिज, या सारख्या कंपन्यांनी यात सहभाग घेतला आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ रुरल मॅनेजमेंट, आनंद या संस्थेने या योजनेचे पहिले राष्ट्रीय मूल्यमापन केले आहे. गाव पातळीवर महिलांच्या सहभागामुळे सामाजिक परिवर्तन घडून आल्याचा अहवाल या संस्थेने दिला आहे. दारिद्र्यमुक्त ग्राम पंचायती हे अंत्योदय योजनेचे लक्ष्य आहे.

**दीन दयाल अंत्योदय योजनेमुळे ३.६ कोटी कुटुंबांच्या जीवनमानात अतिशय सकारात्मक बदल घडून आला आहे. महिला बचत गट मोठ्या प्रमाणात या योजनेशी जोडले गेले आहेत. ग्राम सभा आणि पंचायत राज प्रणालीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडून येत आहे. महिलांना आपले कौशल्य विकसित करण्यासाठी बँकेकडून कर्ज मिळवून दिले जात आहे. १.५० लाख महिलांना या योजनेमुळे दारिद्र्याचे दुष्टचक्र भेदता आले आहे.**

दारिद्र्य निर्मुलनासाठी सुशासनाची मात्रा कामी येत आहे. सामाजिक-आर्थिक जात निहाय गणनेच्या माध्यमातून अशाप्रकारच्या कुटुंबाची निवड करणे सोपे जाते. तसेच पंचायत दर्पण कार्यक्रमा अंतर्गत ३५ निकषांचा वापर करुन अशा कुटुंबाची निवड केली जाते. अतिशय प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्राम विकास खाते आधारवर लक्ष केंद्रीत करित आहे.

ग्राम विकास मंत्रालयाने ५०,००० दारिद्रयमुक्त ग्राम पंचायतेचे उद्दिष्ट ठेवले आहे. संसद आदर्श ग्राम योजनेअंतर्गत ३६ निकष तयार करण्यात आले आहेत. यात पायाभूत सुविधा, दळणवळण, सामाजिक विकास, बँकिंग सुविधा, घन आणि तरल कचरा व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण, दुष्काळाची पाहणी, सकस आहार या बाबींचा समावेश आहे. मंत्रालयाने दारिद्र्यमुक्त ग्राम पंचायतींसाठी समावेशक निर्देशांक तयार केला आहे. जिल्हा पातळीवरील दिशा समितीच्या माध्यमातून या कार्यावर देखरेख ठेवली जाते.

■ ■ ■

*लेखक भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९८३ च्या तुकडीतील अधिकारी असून भारत सरकारच्या ग्रामविकास खात्यामध्ये सचिव आहेत.*

*Email: secyrd@nic.in*

# कौशल्य विकास, नवसंशोधन आणि युवकांचे सबलीकरण

डॉ जतींदर सिंग



**२०२० मध्ये देशातील सरासरी वय २९ होईल. ही भारतासाठी ऐतिहासिक अशी घटना आहे. यामुळे जास्तीत जास्त रोजगारनिर्मिती कशी करता येईल, हे पाहणे महत्त्वाचे आहे. जागतिक बँकेच्या अहवालानूसार, २०४० पर्यंत कार्यक्षम वयोगट असाच वाढत जाणार आहे. त्यामुळे, भारत 'विकसनशील देश' हा शिक्का मोडीत काढून 'विकसित देश' ठरु शकतो.**

परिवर्तन घडवून आणण्याची धमक युवावर्गात असते. सातत्याने नवनवीन प्रयोग करणे, नवीन कल्पनांना मूर्त रुप देणे या गुणांतून विकास साधता येऊ शकतो. भारतीय युवकाला वाटते की आपण केवळ देशाचे भविष्य नाही तर विकासातील एक भागीदार घटक आहोत. म्हणून युवावर्गाला प्रभावी पद्धतीने कौशल्य विकास आणि ज्ञान देऊन देशाच्या विकासात योगदान देता येऊ शकते. सध्या इतिहासात प्रथमच अशी २५ वर्षे वयोगटाखालील लोकसंख्या ५० टक्क्यांपेक्षाही जास्त आहे. २०२० मध्ये देशातील सरासरी वय २९ होईल. ही भारतासाठी ऐतिहासिक अशी घटना आहे. यामुळे जास्तीत जास्त रोजगारनिर्मिती कशी करता येईल, हे पाहणे महत्त्वाचे आहे. जागतिक बँकेच्या अहवालानूसार, २०४० पर्यंत कार्यक्षम वयोगट असाच वाढत जाणार आहे. त्यामुळे, भारत 'विकसनशील देश' हा शिक्का मोडीत काढून 'विकसित देश' ठरु शकतो.

विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी युवकांच्या आकांक्षांना निश्चित आकार दिला पाहिजे. त्यासाठी विविध पैलूंवर विचार करण्याची क्षमता वाढवली पाहिजे, नवीनीकरणाला प्राधान्य दिले पाहिजे, आणि युवकांचा औपचारिक निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढवला पाहिजे. नोकरीची गरज आणि पुरवठा यात असलेली विसंगती दूर करण्यासाठी युवकांना रोजगाराधिष्ठित कौशल्य शिक्षण देणे हे आव्हानात्मक आहे. भारत सरकारने मेक इन इंडिया, कौशल्य विकास अभियान, स्टार्ट अप, स्टँड अप इंडिया आणि डिजीटल इंडिया योजना सुरू केल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून युवकांमध्ये रोजगारनिर्मिती आणि उद्योजकता वाढीस लावली जाऊ शकते.

**मेक इन इंडिया**

मेक इन इंडिया ही एक प्रमुख योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून २०२२ पर्यंत १० कोटी रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट आहे. मेक इन इंडियाच्या माध्यमातून

युवकांमध्ये रोजगारनिर्मितीच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. भारताला जागतिक उत्पादननिर्मितीचे केंद्रस्थान करून २०२२ पर्यंत जीडीपीमध्ये २५ टक्क्यांनी वाढ करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. यासाठी विविध २५ क्षेत्रं निवडली आहेत. वस्त्रोद्योग, बांधकाम, अन्न प्रक्रिया, हवाई वाहतूक, संरक्षण दलासाठी शस्त्रास्त्र निर्मिती आणि इलेक्ट्रॉनिक्स ही प्रमुख क्षेत्रं आहेत. भारतात उत्पादन करण्यासाठी सरकारने परकीय कंपन्यांना थेट परकीय गुंतवणूक नियम निश्चित केले आहेत.

**कौशल्य भारत**

भारतामध्ये लोकसंख्येची विविधता असली तरी, कौशल्याधारीत बाजारपेठेची वाणवा आहे. दरवर्षी कामगार क्षेत्रात बारा लाख लोक प्रवेश करतात. त्यापैकी केवळ दोन टक्के कर्मचारी प्रशिक्षित असतात. कौशल्य विकास आणि उद्योजकता या नवीन मंत्रालयामुळे यात बदल दिसून येत आहे. मेक इन इंडिया योजना आणि १०० स्मार्ट सिटी मोहीम यामुळे प्रचंड परिवर्तन घडून आले आहे. देशात प्रथमच कौशल्य विकास आणि उद्योजकता यासाठी राष्ट्रीय धोरण २०१५ निर्माण करण्यात आले आहे. यामुळे युवकांना उच्च तंत्रज्ञानावर आधारीत नोकरीसाठी प्रशिक्षित केले जाऊ शकते.

तंत्रज्ञान आणि रोजगार यामध्ये एक दरी आहे. त्याचा परिणाम रोजगारनिर्मितीवर दिसून येतो. अशा परिस्थितीत शाश्वत रोजगारनिर्मिती म्हणजे केवळ 'ब्ल्यू कॉलर', 'व्हाईट कॉलर' नोकरी नाही तर 'न्यू कॉलर' नोकरीची निर्मिती करता येईल. नव्या पद्धती जसे स्वयंचलन, इंटरनेट, माहितीचे पृथ्थकरण हे हायटेक जॉब म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत. त्यामुळे युवकांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण देऊन रोजगारनिर्मिती करता येऊ शकते.

**दरवर्षी कामगार क्षेत्रात बारा लाख लोक प्रवेश करतात त्यापैकी केवळ दोन टक्के कर्मचारी प्रशिक्षित असतात. कौशल्य विकास आणि उद्योजकता या नवीन मंत्रालयामुळे यात बदल दिसून येत आहे. मेक इन इंडिया योजना आणि १०० स्मार्ट सिटी मोहीम यामुळे प्रचंड परिवर्तन घडून आले आहे. देशात प्रथमच कौशल्य विकास आणि उद्योकता यासाठी राष्ट्रीय धोरण २०१५ निर्माण करण्यात आले आहे.**

राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाने उद्योगप्रणीत कौशल्य परिषदांची निर्मिती केली आहे. याच्या माध्यमातून कार्यस्थळावरील कार्याची गुणवत्ता निर्धारीत केली जाते. प्रत्येक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेला आता 'नॅशनल ऑक्युपेशन स्टॅंडर्स' हे प्रमाणपत्र घ्यावे लागणार आहे.

**इनोवेशन, इनक्युबेटर्स, स्टार्टअप आणि स्टॅंड अप जैवसंस्था**

भारत हा नेहमीच नवनवीन आविष्कारांची जननी राहिला आहे. स्वदेशी तंत्रज्ञानाने साध्य केलेले मंगळयान हेच दाखवून देते. मंगळापर्यंतच्या ६५० दशलक्ष किलोमीटर अंतरासाठी प्रतिकिमी सात रुपये खर्च एवढ्या कमी खर्चात हे साध्य केले. यातून भारताचे तंत्रज्ञानक्षेत्रातील आघाडीचे स्थान दिसून येते. शालेय शिक्षणामधूनच विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची गोडी रुजवली पाहिजे. डीएसआयआर, सीएसआयआर, डीएसटी, एनएसटीईडीबी, तंत्रज्ञान आणि नवसंशोधन या संस्थांच्या माध्यमातून संशोधन आणि विकासाला चालना दिली पाहिजे. त्यासाठी युवकांना आर्थिक सहकार्य केले पाहिजे.

इनक्युबेटर्स हे स्टार्ट अपला पुरक आहेत. स्टार्ट अपला यामुळे मोठी आर्थिक मदत होते. तसेच ग्राहक निर्मितीसाठीही हे पूरक आहे. भारतात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाकडे स्टार्ट अप योजनेअंतर्गत ११८ इनक्युबेटर्सची नोंदणी झाली आहे. आपल्या देशात १०,००० स्टार्ट अप आहेत त्यांची संख्या २०२० साली पर्यंत ११,५०० पर्यंत जाईल, असा अंदाज आहे. भारत हा स्टार्ट अप असलेला जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश आहे.

व्यावसायिक-सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधीतून औद्योगिक आणि तंत्रज्ञानावर आधारीत उद्योग वाढवण्यासाठीचा सेतू साधला जाऊ शकतो. भारतीय कंपनी कायदा २०१३ च्या सातव्या परिशिष्टातील १३५ व्या विभागानूसार भारतीय कंपन्यांना इनक्युबेटर्ससाठी दोन टक्क्यांपर्यंत निधी देता येऊ शकतो.

'स्टँड अप इंडिया योजना' ही महिला आणि अनुसूचिती जाती आणि जमातीसाठी आहे. या योजनेच्या माध्यमातून उद्योग सुरु करण्यासाठी रुपये १० लाख ते रुपये १ कोटी पर्यंतचे कर्ज दिले जाते. कर्जाची परतफेड करण्यासाठी सात वर्षाचा अवधी देण्यात आला आहे.

**युवा प्रतिभेला दिशा दाखवणे**

युवा लोकसंख्येच्या आकांक्षांची पूर्ती करण्याची भारताला गरज आहे. आगामी वीस वर्षात औद्योगिक अर्थव्यवस्थेतून मनुष्यबळात चार टक्क्यांनी कपात होणार आहे. तर, भारतात यात ३२ टक्क्यांनी वाढ होणार आहे. युवकांचे सबलीकरण आणि क्षमतानिर्माण यासाठी भारत सरकारने घेतलेल्या निर्णयांचे कौतूक करायला पाहिजे. कौशल्य भारत आणि स्टार्ट अप इंडिया यामुळे शिक्षण ते रोजगार याबाबतचा तरुणांवरील बोजा हलका होणार आहे. समावेशक विकासासाठी युवकांमध्ये उद्योजकता रुजवणे महत्त्वाचे आहे. केवळ सरकारच नाही तर खासगी क्षेत्रानेही पुढाकार घेऊन नवभारताची निर्मिती करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

■ ■ ■

*डॉ जतिंदर सिंग यांची व्यवस्थापन विषयात पी एचडी असून गेली वीस वर्षे ते शिक्षण आणि कौशल्य विकासाशी संबंधित क्षेत्रात कार्यरत आहेत. पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, नवी दिल्ली येथे वरिष्ठ सचिव म्हणून कार्यत आहेत तसेच शिक्षण विभाग, कौशल्य विकास, सीएसआर विभागाचे प्रमुख आहेत. हरियाणा राज्य मंडळाच्या तंत्र शिक्षण विभागाच्या गव्हर्निंग कौन्सिलचे ते सदस्य आहेत.*

*email:jatinder@phdcci.in*



# बिकट जागतिक अर्थस्थितीत भारताची आगेकूच

डी. एस मलिक




मंदावलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये प्रमुख देशांमध्ये भारत तेजस्वी किरणांपैकी एक आहे. भारताने २०१५-१६ या आर्थिक वर्षात ७.९ टक्के विकासदराची नोंद केली आहे. त्यापूर्वी २०१४-१५ मध्ये हा दर ७.२ तर २०१३-१४ मध्ये ६.५ टक्के होता. २०१४-१५ आणि २०१५-१६ या वर्षांत कमकुवत मान्सूननंतरही विकासाला प्राप्त झालेली गती उल्लेखनीय होती. लक्षणीय मध्यम ते दीर्घकालीन आर्थिक फायदे मिळवण्याच्या उद्देशाने उच्च मूल्याच्या चलनाचे विमुद्रीकरण केल्यानंतरही २०१६-१७ मध्ये भारत ७.१ टक्के इतक्या भक्कम विकासदराची नोंद करण्याचा अंदाज आहे. तज्ज्ञ संस्थांच्या भाकितांनुसार २०१७-१८ मध्ये भारताच्या विकासदरात आणखी सुधारणा होणार आहे. १३८ देशांच्या जागतिक आर्थिक मंचाने तयार केलेल्या जागतिक स्पर्धात्मकता निर्देशांकानुसार(जीसीआय) २०१६-१७ या वर्षात भारताचे स्थान ३९वे होते. २०१३-१४ मध्ये १४८ देशांच्या जीसीआयमध्ये भारताचे स्थान ६०वे होते.


**उच्च मूल्याच्या चलनाचे विमुद्रीकरण केल्यानंतरही २०१६-१७ मध्ये भारत ७.१ टक्के इतक्या भक्कम विकासदराची नोंद करण्याचा अंदाज आहे. तज्ज्ञ संस्थांच्या भाकितांनुसार २०१७-१८ मध्ये भारताच्या विकासदरात आणखी सुधारणा होणार आहे. १३८ देशांच्या जागतिक आर्थिक मंचाने तयार केलेल्या जागतिक स्पर्धात्मकता निर्देशांकानुसार(जीसीआय) २०१६-१७ या वर्षात भारताचे स्थान ३९वे होते. २०१३-१४ मध्ये १४८ देशांच्या जीसीआयमध्ये भारताचे स्थान ६०वे होते.**

| | २०११-१२ ते २०१३-१४ (३ वर्षांची सरासरी) | २०१४-१५ ते २०१५-१६ (२ वर्षांची सरासरी) | २०१६-१७ * |
|---|---|---|---|
| चलनवाढ(सीपीआय) (एनएस) | ९.८ | ५.४ | ४.६ |
| चलनवाढ (डब्लूपीआय) | ७.४ | -०.२ | ३.५ |
| सीएडी (जीडीपीच्या % ) | -३.६ | -१.२ | -०.७ |
| जीडीपी वाढ (%) | ६ | ७.६ | ७.१ |
| जागतिक जीडीपी वाढ (%) | ३.७ | ३.३ | ३.१ |
| परकीय चलन साठा (अब्ज डॉलर) | २९६.९ | ३५०.९ | ३६२.८ |
| एकूण एफडीआय($ अब्ज डॉलर) | २१.१ | ३३.६ | २१.३ |
| आर्थिक तूट (जीडीपीच्या %) | ५.१ | ४ | ३.५ |

भारतातील सकल देशांतर्गत उत्पादनाशी राजकोषीय तुटीचे प्रमाण २०१३-१४ मधील ४.५ टक्क्यांपासून सातत्याने कमी होत गेल्याने आर्थिक स्थिती सुदृढ बनली आहे. सकल देशांतर्गत उत्पादनाशी भारत सरकारच्या राजकोषीय तुटीचे प्रमाण २०१४-१५ मध्ये ४.१ टक्के, २०१५-१६ मध्ये ३.९ टक्के आणि २०१६-१७ मध्ये (सुधारित अंदाज) ते ३.५ टक्के होते. २०१७-१८ मध्ये हे प्रमाण ३.२ टक्के ठेवण्याचे उद्दिष्ट अर्थसंकल्पात निर्धारित करण्यात आले आहे.




**चलनफुगवटा**




सध्याच्या सरकारने सातत्याने वाढणाऱ्या महागाईच्या विशेषतः खाद्यपदार्थांच्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मे २०१४मध्ये कार्यभार स्वीकारला. गेल्या तीन वर्षात या सरकारने चतुराईने केलेले अन्न व्यवस्थापन आणि दरांवर बारीक नजर ठेवल्यामुळे सातत्याने वाढलेल्या महागाईवर गेल्या तीन वर्षात नियंत्रण ठेवण्यास मदत मिळाली आहे.

ग्राहक दर निर्देशांकावर आधारित महागाईचा दर सलग तिसऱ्या आर्थिक वर्षात नियंत्रणात राहिला. ग्राहक दर निर्देशांकावर आधारित महागाईचा सरासरी दर २०१३-१४ मध्ये ९.५ टक्क्यांवरून २०१४-१५ मध्ये ५.९ टक्क्यांपर्यंत खाली आला आणि २०१५-१६मध्ये तो आणखी कमी होऊन ४.९ टक्के झाला. सध्या सुरू असलेल्या आर्थिक वर्षात त्यात आणखी घट होऊन तो फेब्रुवारी २०१७ पर्यंत ४.६ टक्के झाला तर फेब्रुवारी २०१७ मध्ये अन्नधान्याच्या महागाई दरात झालेल्या मोठ्या घसरणीमुळे ३.७ टक्क्यांपर्यंत खाली आला. ग्राहक दर निर्देशांकावर आधारित अन्नधान्याच्या महागाईचा दर २०१२-२०१४ या काळात दोन आकडी झाला होता. २०१४-१५ मध्ये तो ६.४ टक्के आणि २०१५-१६ मध्ये ४.९ टक्के इतका झाला. चालू आर्थिक वर्षात तो आणखी खाली आला असून त्याचे प्रमाण फेब्रुवारी २०१७ पर्यंत ४.४ टक्के झाले आणि फेब्रुवारी २०१७ मध्ये ते २ टक्क्यांवर आले. सरकारने आरबीआयशी विचारविनिमय करून ५ ऑगस्ट २०१६ ते ३१ मार्च २०२१ या काळासाठी महागाईच्या दराचे उद्दिष्ट २ टक्के +/- सुसह्य पातळीसह ४ टक्के इतके निर्धारित केले आहे.

**व्यापार**

मंदावलेला जागतिक विकास आणि व्यापार यांच्या परिणामांमुळे भारताच्या निर्यातीत २०१४-१५


आणि २०१५-१६ या वर्षात अनुक्रमे १.३ आणि १५.५ टक्के घसरण झाली. २०१६-१७ मध्ये( एप्रिल ते फेब्रुवारी) या नकारात्मक कलामध्ये बदल होऊन त्याची वाटचाल काही प्रमाणात वाढीच्या दिशेने सुरू झाली. निर्यातीत २.५ टक्के वाढ होऊन २०१५-१६ मधील(एप्रिल ते फेब्रुवारी) २३९.४ अब्ज डॉलरवरून २४५.४ अब्ज डॉलरवर पोहोचली. निर्यातीच्या वाढीचे मासिक दर सप्टेंबर २०१६ पासून धन क्षेत्रामध्ये राहिले आहेत. २०१५-१६ मध्ये भारताच्या आयातीत १५ टक्के घट होऊन ही आयात ३८१ अब्ज डॉलर झाली. मुख्यत्वे आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या दरातील घसरणीमुळे ही घट झाली. २०१४-१५ मध्ये आयातीचे मूल्य ४४८.० अब्ज डॉलर इतक होते.

२०१६-१७ मध्ये (एप्रिल ते फेब्रुवारी) आयातीमध्ये ३.७ टक्के घट होऊन ती ३४०.७ अब्ज डॉलरवर आली. त्या आधीच्या वर्षी याच काळात ही आयात ३५३.७ अब्ज डॉलर मूल्याची होती. भारताची व्यापारी तूट २०१२-१३ मध्ये सर्वोच्च म्हणजे १९०.३ अब्ज डॉलर होती. मात्र, त्यात २०१५-१६ मध्ये त्यात १३.८ टक्क्यांची घट होऊन ही तूट ११८.७ अब्ज डॉलर झाली. २०१४-१५ मधील १३७.७ अब्ज डॉलरच्या पातळीपेक्षाही ती कमी होती. २०१६-१७ मध्ये (एप्रिल ते फेब्रुवारी) व्यापारी तुटीत आणखी घट होऊन हे प्रमाण ९५.३ अब्ज डॉलरवर आले. त्यापूर्वीच्या वर्षात याच काळात ही तूट ११४.३ अब्ज डॉलर होती.

**शिल्लक देय रक्कम**

भारताची निर्यात सामान्य राहिल्यानंतरही, चालू खात्यातील तूट एका सातत्यपूर्ण गतीने कमी होत जाऊन २०१२-१३ मधील ८८.२ अब्ज डॉलरवरून(जीडीपीच्या ४.८ टक्के) २०१५-१६ मध्ये २२.२ अब्ज डॉलरपर्यंत(जीडीपीच्या १.१ टक्के) खाली आल्याने भारताच्या बाह्य क्षेत्रातील स्थिती समाधानकारक राहिली आहे.

क्रमसंचयी आधाराने चालू खात्यातील तूट एप्रिल ते डिसेंबर २०१६ या काळात जीडीपीच्या ०.७ टक्क्यांवर आली. त्यापूर्वी २०१५-१६ या आर्थिक वर्षात याच काळात ही तूट १.४ टक्के होती. व्यापारी तूट कमी झाल्यामुळे हा परिणाम दिसून आला.



स्रोतः आरबीआय

**परदेशी गुंतवणूक**

२०१३-१४ मध्ये ४३.६ अब्ज डॉलर इतका असलेला थेट परदेशी गुंतवणुकीचा ओघ २०१४-१५ मध्ये ५१.८ अब्ज डॉलरवर पोहोचला. २०१५-१६ मध्ये त्यात आणखी वाढ होऊन तो ५९.५ अब्ज डॉलरवर पोहोचला. २०१६-१७ या वर्षात(एप्रिल ते डिसेंबर) निव्वळ थेट परदेशी गुंतवणूक ३१.२ अब्ज डॉलर होती. त्यापूर्वी २०१५-१६ या वर्षात(एप्रिल ते डिसेंबर) ही गुंतवणूक २७.२ अब्ज डॉलर होती. २०१६-१७ च्या पूर्वार्धात एफपीआय अर्थात परदेशी पोर्टफोलियो गुंतवणूक (निव्वळ) वाढून ८.२ अब्ज डॉलरवर पोहोचली. त्यापूर्वी २०१५-१६ च्या पूर्वार्धात या गुंतवणुकीचे प्रमाण (-) ३.५ अब्ज डॉलर होते. मात्र, निव्वळ परदेशी पोर्टफोलियो बाहेर पडण्याचे प्रमाण डिसेंबर २०१६ आणि जानेवारी २०१७ मध्ये अनुक्रमे ५.८ अब्ज डॉलर आणि ०.५ अब्ज डॉलर होते. प्रामुख्याने हा परिणाम अमेरिकेच्या फेडरल रिझर्वचे धोरण आणि फेडरल रिझर्वने केलेल्या व्याजदरातील वाढीमुळे होता. मात्र, एफपीआयचा बाहेर जाणारा हा ओघ केवळ एकट्या भारतीय बाजाराशी संबंधित नव्हता कारण प्रगत अर्थव्यवस्थांमध्ये

उच्च परतावा मिळत असल्यामुळे बऱ्याच उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमधून एफपीआयनी गुंतवणूक काढून घेतली होती.

**परकीय चलन साठा**

सप्टेंबर २०१६ च्या शेवटी परदेशी चलनाच्या साठ्याने ३७१.९ अब्ज डॉलरची उच्चांकी पातळी गाठली. मात्र, परकीय चलन विनिमय बाजारात रुपयाला स्थिर करण्यासाठी रिझर्व बँकेने केलेल्या हस्तक्षेपामुळे आणि अंशतः एफसीएनआरच्या ठेवींची मुदत पूर्ण झाल्यामुळे देय रक्कम चुकती केल्यामुळे नोव्हेंबर २०१६ च्या शेवटी या साठ्याच्या पातळीत घसरण होऊन ती ३६१.१ अब्ज डॉलरपर्यंत खाली उतरली. २०१३ मध्ये अनिवासी भारतीयांसाठी सुरू केलेल्या विशेष खिडकी योजनेतून ही रक्कम जमा करण्यात आली होती.

जानेवारी २०१७ च्या शेवटी परकीय चलनाचा साठा ३६३.० अब्ज इतका झाला. त्यापूर्वी डिसेंबर २०१६ मध्ये हा साठा ३५८.९ अब्ज डॉलर होता. कोणत्याही आंतरराष्ट्रीय बृहदआर्थिक अनिश्चिततेपासून विनिमय दराच्या संवेदनशीलतेला संरक्षण पुरवण्यासाठी सध्याची पातळी समाधानकारक अवस्थेत आहे.


**रुपयाचा विनिमय दर**

२०१६-१७ साठी(एप्रिल ते फेब्रुवारी) रुपयाचा सरासरी मासिक विनिमय दर प्रति डॉलरला रु. ६७.२ इतका होता. यापूर्वीच्या वर्षातील संबंधित काळासाठी 2.8 टक्क्यांच्या कपातीकडे हा दर निर्देश करत आहे. अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणूक निकालांनंतर जागतिक पातळीवर अमेरिकी डॉलर मजबूत झाल्यामुळे आणि फेडरल रिझर्वने पतधोरण अधिक कडक केल्यामुळे हा परिणाम दिसत होता. काही झाले तरीही २०१६-१७ या वर्षात आतापर्यंत इतर बहुतेक उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या तुलनेत रुपयाची कामगिरी चांगली राहिली आहे. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत एकीकडे रुपयाचे काही प्रमाणात अवमूल्यन झाले असले तरीही अर्थव्यवस्थेवरील प्रभावाचे मूल्यमापन वास्तविक प्रभावी विनिमय दराच्या आधारे करता येऊ शकते. वास्तविक प्रभावी विनिमय दर म्हणजे परदेशी चलन आणि देशी चलन यांच्या दरातील तफावतीनुसार सुधारणा केलेले देशी चलनाच्या विनिमयाच्या दराचे वेटेड जॉमेट्रीक सरासरी अशी व्याख्या केलेली आहे.

आरईईआरच्या संदर्भात, २०१६-१७ (एप्रिल ते जानेवारी) मध्ये २०१५-१६ (एप्रिल ते जानेवारी) च्या तुलनेत १.७ टक्के सुधारणा झाली.

**परदेशी कर्ज**

सप्टेंबर २०१६ च्या शेवटी भारताच्या परदेशी कर्जाचा साठा ४८४.३ टक्के इतका राहिला. मार्च २०१६ च्या शेवटी एकंदर पातळीनुसार ०.८ अब्ज डॉलर (०.२ टक्के) घसरणीची नोंद झाली. बाह्य कर्जाचे बहुतेक निर्देशक सप्टेंबर २०१६ मध्ये सुधारणा दाखवत आहेत. एकूण बाह्य कर्जामध्ये अल्पकालीन कर्जाचा वाटा २०१६ च्या मार्च २०१६ च्या अखेरीला असलेल्या १७.२ टक्क्यांवरून मार्च अखेरीला १६.८ टक्क्यांपर्यंत कमी झाला. भारताच्या परकीय चलनसाठ्यामुळे एकूण बाह्य कर्जाला सप्टेंबर २०१६ च्या अखेरीला ७६.८ टक्क्यांचे पाठबळ उपलब्ध झाले. मार्च २०१६ च्या अखेरीला त्याचे प्रमाण ७४.३ टक्के होते. इतर कर्जदार देशांच्या तुलनेत



*स्रोतः आरबीआय*

भारताच्या प्रमुख कर्ज निर्देशांकांनुसार भारत सातत्याने सुरक्षित देशांच्या पंक्तीत राहिला आहे.

जागतिक बँकेच्या आंतरराष्ट्रीय कर्जाविषयीच्या २०१७च्या आकडेवारीमध्ये विकसनशील देशांच्या बाह्य कर्जाची आकडेवारी दिली आहे. या आकडेवारीनुसार भारताच्या बाह्य कर्जाच्या साठ्याचे देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी गुणोत्तर २३.४ टक्के आहे. सर्वात कमी असलेले हे पाचव्या क्रमांकाचे गुणोत्तर आहे. परकीय चलनसाठ्याने बाह्य कर्जाला पुरवलेल्या पाठबळामुळे भारताचे स्थान ६९.७ टक्क्यांसह सर्वोच्च होते.

**कृषी व अन्न व्यवस्थापन**

२८ फेब्रुवारी २०१७ रोजी जारी करण्यात आलेल्या दुसऱ्या आगाऊ राष्ट्रीय उत्पन्न अंदाजानुसार कृषी आणि संबंधित क्षेत्रांच्या जीव्हीएचे (एकूण मूल्यवर्धित) वृद्धीदर २०१४-१५ मध्ये (-) ०.२ टक्के, २०१५-१६ मध्ये ०.८ टक्के आणि २०१६-१७ मध्ये ४.४ टक्के होते. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने १५ फेब्रुवारी २०१७ रोजी जारी केलेल्या अन्नधान्य उत्पादनाच्या दुस-या आगाऊ अंदाजानुसार २०१६-१७ मध्ये एकूण अन्नधान्याचे उत्पादन २७१.९८ दशलक्ष टन होण्याचा अंदाज आहे. २०१५-१६ (अंतिम) मध्ये हे उत्पादन २५१.५७ दशलक्ष टन होते आणि २०१४-१५ मध्ये हे उत्पादन २५०.०२ दशलक्ष टन होते.

**औद्योगिक क्षेत्र**

सीएसओने २८ फेब्रुवारी २०१७ रोजी जारी केलेल्या दुस-या आगाऊ राष्ट्रीय उत्पन्न अंदाजानुसार जीव्हीएचे वृद्धीदर २०१६-१७ मध्ये ५.८ टक्के, २०१५-१६ मध्ये ८.२ टक्के आणि २०१४-१५ मध्ये ६.९ टक्के होते. उत्पादन क्षेत्राकडून जीव्हीएमध्ये झालेली वाढ २०१६-१७ मध्ये ७.७ टक्के होती. २०१५-१६ मध्ये १०.६ टक्के आणि २०१४-१५ मध्ये ती ७.५ टक्के होती.

**जागतिक बँकेच्या आंतरराष्ट्रीय कर्जाविषयीच्या 2017च्या आकडेवारीमध्ये विकसनशील देशांच्या बाह्य कर्जाची आकडेवारी दिली आहे. या आकडेवारीनुसार भारताच्या बाह्य कर्जाच्या साठ्याचे देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी गुणोत्तर 23.4 टक्के आहे. सर्वात कमी असलेले हे पाचव्या क्रमांकाचे गुणोत्तर आहे. परकीय चलनसाठ्याने बाह्य कर्जाला पुरवलेल्या पाठबळामुळे भारताचे स्थान 69.7 टक्क्यांसह सर्वोच्च होते.**

प्रमुख आठ उद्योगांच्या( खनिज तेल, नैसर्गिक वायू, पेट्रोलियम शुद्धिकरण उत्पादने, कोळसा, वीज, सिमेंट, पोलाद आणि खते) निर्देशांकाने २०१६-१७ मध्ये ४.८ टक्के वृद्धीची नोंद केली. २०१५-१६ मध्ये हा दर ३.४ टक्के आणि २०१४-१५ मध्ये ४.५ टक्के होता.

२०१५ मध्ये ऊर्जा क्षेत्रात उदय योजना सुरु करण्यामुळे, बऱ्याच राज्यांनी एटी अँड सी तोटे कमी करण्यासाठी लक्षणीय प्रयत्न केले. या योजनेमुळे यापूर्वीच डिसकॉमकडे -२०१४-१५च्या शेवटी बाकी असलेल्या थकबाकीपैकी ६२ टक्क्यांचे निराकरण केले.

रस्ते आणि महामार्ग मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या वर्षअखेरीचा २०१६ च्या आढाव्यानुसार नोव्हेंबर २०१६ पर्यंत तयार करण्यासाठी देण्यात आलेल्या महामार्गांची एकूण लांबी ५६८८ किमी होती आणि नोव्हेंबर २०१६ पर्यंत तयार झालेल्या रस्त्यांची लांबी ४०२१ किमी होती. २०१५-१६ मधील ६०२९ किमी आणि २०१४-१५ मध्ये ४४१० किलोमीटरचे रस्ते बांधण्यात आले होते.

वर उल्लेख केल्याप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये विविध क्षेत्रांनी दिलेले योगदान आणि ऐतिहासिक कर सुधारणांची म्हणजेच एक जुलै २०१७ पासून जीएसटी लागू करण्यासाठी होणारी प्रक्रिया यांचा विचार करता, आगामी वर्षांमध्ये भारतीय अर्थव्यवस्था अतिशय मोठी कामगिरी करण्यासाठी सज्ज असल्याचा निष्कर्ष काढता येईल.

■ ■ ■

*लेखक पत्र सूचना कार्यालय नवी दिल्ली येथे अतिरिक्त महासंचालक असून वित, कंपनी व्यवहार खाते तसेच स्पर्धा आयोगाचे काम पाहत आहेत.*

*email: dprfinance@gmail.com*

# अनुसूचित जातींच्या शैक्षणिक विकासात शासनाची भूमिका

अमोल श्रीकांत कांबळे



**अनुसूचित जातींच्या लोकांना आर्थिक विवंचनेतून बाहेर काढून त्यांच्या सर्वांगीन विकासासाठी महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे या थोर समाजसुधारकांनी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना आलेले यश दिर्घकाळ टिकवून ठेवण्याचे काम आज शासन स्तरावर केले जात आहे.**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४१ नुसार राष्ट्रपतींच्या आदेशाने अनेक मागास जातींचा समावेश "अनुसूचित जाती" या संवर्गांतर्गत करण्यात आला. "अनुसूचित जाती" या संवर्गांतर्गत महाराष्ट्रामध्ये ५९ जातीचा समावेश असून या जाती इतर कोणत्याही जातीपेक्षा शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या दिसून येतात तसेच समान संधी व रोजगारापासून वंचित राहील्याने त्यांच्या दारिद्र्यामध्ये वाढ झाली व हे लोक आर्थिक विवंचनेत अडकले गेले.

अनुसूचित जातींच्या लोकांना आर्थिक विवंचनेतून बाहेर काढून त्यांच्या सर्वांगीन विकासासाठी महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे या थोर समाजसुधारकांनी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना आलेले यश दिर्घकाळ टिकवून ठेवण्याचे काम आज शासन स्तरावर केले जात आहे.

सदर लेख तयार करण्याचा प्रमुख हेतू अनुसूचित जातींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा अभ्यास करणे हा असून सदर लेखामध्ये अनुसूचित जातींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा अभ्यास केला आहे.

**राजीव गांधी राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती :**

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती मधील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, प्रगत अभ्यास व संशोधनासाठी प्रवृत्त करणे, त्यासाठी त्यांना अर्थसहाय्य पुरविणे या उद्देशाने भारत सरकारच्या सामाजिक न्याय, सबलीकरण व आदिवासी विकास मंत्रालयाकडून राजीव गांधी राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत देण्यात येते. मानव्यविद्या, सामाजिक शास्त्र, विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या अधिशाखेच्या विषयांमध्ये एम्. फिल., पीएच्. डी पदवीकरीता प्रत्येक वर्षी अनुसूचित जातीमधील संशोधन करणाऱ्या २००० विद्यार्थ्यांना व अनुसूचित जमातीमधील संशोधन करणाऱ्या ६६७ विद्यार्थ्यांना सदर अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात येते.

अर्ज करण्याची पध्दत व निवड प्रक्रिया तसेच आवश्यक दस्तऐवज या सर्व माहितीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या www.ugc.ac.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांचेमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्त्याः**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) याची स्थापना सन् १९८७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता विचारपीठ या नावाने करण्यात आली. सन् २००८ मध्ये या संस्थेचे नाव बदलून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था असे करण्यात आले. बार्टी ही संस्था समता, सामाजिक न्याय, बंधूता, जातीव्यवस्थेचे निर्मूलन, नैतिक मूल्ये व संशोधनाचा विकास करण्यास वचनबध्द आहे. या वचनांच्या अधिन राहून अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना प्रगत अभ्यास व संशोधनाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आर्थिक पाठबळ पुरविण्याच्या उद्देशाने खालील ४ अधिछात्रवृत्त्या बार्टीकडून प्रदान करण्यात येतात.

**महात्मा ज्योतीराव फुले राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती :**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले यांनी समता, मानवी हक्क, सामाजिक न्याय, बंधूता, एकात्मता, स्वातंत्र्य, वैज्ञानिक जाणीव व जागृती, सांप्रदायिक सद्भावना व सहिष्णुता, जातीय दुर्भावनांचे व अधंश्रध्देचे निर्मूलन, बुध्दिवाद यासाठी आयुष्यभर केलेला संघर्ष व त्याग, त्याचबरोबर याविषयी त्यांचे आदर्श विचार व तत्वज्ञान याचा परिचय संपूर्ण मानव समाजास आहे. अशा थोर समाजसुधारकास आदरांजली म्हणून त्यांच्या स्मरणार्थ बार्टीने महात्मा ज्योतीराव फुले राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती सुरू केली आहे. दरवर्षी विविध विषयांमध्ये संशोधन करणाऱ्या २५ विद्यार्थ्यांना ही अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात येते. या २५ विद्यार्थ्यांमध्ये १३ (५० टक्के) महिला व १ (३ टक्के) अपंग व्यक्तींचा समावेश करण्यात आला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन् १९१३ साली न्यूयॉर्कमधील विद्यापीठामध्ये उच्चशिक्षणासाठी प्रयाण केले. न्यूयॉर्कमधील याच विद्यापीठामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एम्. ए. व पीएच्. डी. पदवी ग्रहण केली. सन् १९१६ साली “भारताचा राष्ट्रीय नफ्यातील वाटा” या विषयावर संशोधन प्रबंध सादर करून पीएच्. डी. पदवी संपादन केली. या ऐतिहासिक प्रसंगास सन् २०१३ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली. या प्रसंगाची आठवण व या महामानवास आदरांजली म्हणून सन् २०१३ साली बार्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्तीची सुरूवात केली. २०१३ साली १०० संशोधक विद्यार्थ्यांना ही अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात आली. त्याचप्रमाणे न्यूयॉर्क विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणासाठी प्रयाण या ऐतिहासिक प्रसंगास सन् २०१४ मध्ये १०१ वर्षे पूर्ण झाली व सन् २०१५ मध्ये १०२ वर्षे पूर्ण झाली म्हणून अधिछात्रवृत्तींची संख्या अनुक्रमे १०१ व १०२ अशी वाढविण्यात आली. यामध्ये ५० टक्के जागा महिलांसाठी व ३ टक्के जागा अपंग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**छत्रपती राजर्षी शाहू राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती :**

कोल्हापूर संस्थानाचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी अनुसूचित जातींच्या विकासासाठी, त्यांच्या शिक्षणासाठी जे कार्य केले याच्या स्मरणार्थ व या थोर राजास आदरांजली म्हणून बार्टीने त्यांच्या नावे छत्रपती शाहू राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्तीची सुरवात केली. दरवर्षी यांच्या नावे २५ संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात येते. यामध्ये ५० टक्के जागा महिलांसाठी व ३ टक्के जागा अपंग व्यक्तींसाठी राखीव ठेवल्या आहेत.

**सावित्रीबाई फुले राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती :**

१ जानेवारी १९४८ रोजी पुण्याच्या भिंडे वाडयात मुलींच्यासाठी महात्मा ज्योतीबा फुलेंनी सावित्रीबाईंना पहिली शाळा काढून दिली. या काळापासून स्त्रीयांच्या शिक्षणाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. त्यांच्या या स्मृतीप्रित्यर्थ बार्टीने स्त्रीयांना उच्चशिक्षण घेता यावे या उद्देशाने सन २०१५ पासून फक्त मुलींच्यासाठी सावित्रीबाई फुले राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्तीची सुरूवात केली. दरवर्षी सावित्रीबाईंच्या नावे बार्टीकडून ५० महिलांना अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात येते. यापैकी ६ टक्के जागा अपंग महिला उमेदवारांसाठी राखीव आहेत.

अर्ज करण्याची पध्दत व निवड प्रक्रिया तसेच आवश्यक दस्तऐवज यांच्या माहितीसाठी बार्टीच्या http:// barti.maharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

**पोस्ट डॉक्टरेट अधिछात्रवृत्ती :**

मानव्यशास्त्र, सामाजिक शास्त्रे, विज्ञान, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान

विषयामध्ये पीएच.डी. पदवी संपादन केल्यानंतर संशोधनातील पुढील उच्च पदवी पोस्ट डॉक्टरेटकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दरवर्षी १०० संशोधकांना अधिछात्रवृत्ती प्रदान केली जाते. वंचित समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, संशोधन व पोस्ट डॉक्टरेट पदवीसाठी अर्थसहाय्य पुरविणे हा प्रमुख उद्देश सदर योजनेचा आहे. सदर अधिछात्रवृत्तीसाठी आवश्यक पात्रता, अधिछात्रवृत्तीचा कालावधी, आर्थिक सहाय्याची तरतूद, रजा कालावधी, अर्ज करण्याची पध्दत व निवड प्रक्रिया तसेच आवश्यक दस्तऐवज या सर्व माहीतीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या www.ugc.ac.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

**अनुसूचित जातींच्या मुलां-मुलींना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती :**

अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशामधील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असूनही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. अशा विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांना परदेशामधील नामांकित विद्यापीठामध्ये पदव्युत्तर पदवी व पीएच्.डी. अभ्यासक्रमाकरीता प्रवेश मिळाला आहे अशा दरवर्षी ५० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा आदेश २००३-०४ मध्ये काढला आहे. शिष्यवृत्तीच्या अधिक माहीतीकरीता महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील शासकीय जी. आर. सांकेतांक क्र. 20030705122131001 याचा आधार घेण्यात यावा.

**मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती :**

अनुसूचित जातीच्या महाविद्यालयीन व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देणे व त्यांचे शिक्षणामधील गळतेचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने ही योजना सुरू केली आहे. या योजनेचा लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. त्याने शालांत परीक्षोत्तर व त्यापुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतलेला असावा. त्याच्या वडीलांचे/पालकांचे वार्षिक उत्पन्न रूपये २,००,०००/- पेक्षा अधिक नसावे. या योजनेतंर्गत निवड झालेल्या लाभार्थी विद्यार्थ्यांस शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर मान्य बाबींवरील शुल्कांव्यतिरिक्त दरमहा रूपये १४०/- ते रूपये ३३०/- या दराने निर्वाह भत्ता प्रदान करण्यात येतो.

खाजगी वसतीगृहामध्ये राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रूपये २३५/- ते रूपये ७४०/- या दराने निर्वाह भत्ता प्रदान करण्यात येतो. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने http://mahaeschool.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रत्येक वर्षी ऑनलाईन अर्ज करून ऑनलाईन अर्ज संपूर्णपणे भरल्यांनतर त्या अर्जाची प्रिंट आवश्यक त्या दस्तऐवजासह अर्जदार विद्यार्थी ज्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहे त्या महाविद्यालयामध्ये जमा करावा.

**मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती :**

केंद्र सरकारने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षण घेता यावे, त्यांचे शाळेमधील गळतीचे प्रमाण कमी व्हावे, त्यांच्या पालकांचा आर्थिक बोजा कमी व्हावा या हेतूने मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीची सुरूवात केली आहे. सदरची शिष्यवृत्ती इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जात असल्याने यास मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती असे म्हणतात. या शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रूपये २,००,०००/- पेक्षा अधिक असू नये. या शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यास शासनाकडून एका वर्षामधील १० महिन्यांच्या कालावधीसाठी एका वर्गास प्रतिमहिना रूपये १५०/- व पुस्तके खरेदीसाठी प्रतिवर्ष रूपये ७५०/- अर्थसहाय्य दिले जाते. त्याचप्रमाणे वसतीगृहामध्ये राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहिना रूपये २५०/- व पुस्तके खरेदीसाठी प्रतिवर्ष रूपये १०००/- अर्थसहाय्य देण्यात येते.

**सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती :**

अनुसूचित जातीच्या मुलींना शिक्षणासाठी प्रवृत्त करणे, मुलींचा शिक्षणामधील सहभाग वाढविणे या हेतूने सर्वप्रथम महाराष्ट्र सरकारने १९६६ मध्ये इ. ५ वी ते इ. ७ वी या वर्गामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींच्यासाठी ही योजना सुरू केली. सन २००३ मध्ये या योजनेची व्याप्ती वाढवून इ. ८ वी ते इ. १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींच्यासाठी या योजनेचा लाभ सुरू केला. या योजनेसाठी लाभार्थी निवड गुणवत्ता हा निकष ठेऊन करण्यात येते. कोणत्याही शासकीय, निमशासकीय व खाजगी शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या, लाभार्थी शैक्षणिक वर्षाच्या अगोदरच्या वर्षी

५० टक्के गुण प्राप्त विद्यार्थीनी, त्याचबरोबर ज्यांच्या पालकांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रूपये २,००,०००/- पेक्षा कमी आहे अशा विद्यार्थीनी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनेसाठी निवड झालेल्या विद्यार्थीनींना इ. ५ वी ते इ. ७ वी पर्यंत दरमहा रूपये ६०/- व इ. ८ वी ते १० वी पर्यंत दरमहा रूपये १००/- शिष्यवृत्ती एका शैक्षणिक वर्षामध्ये १० महिन्यांच्या कालावधीसाठी प्रदान करण्यात येते. सावित्रीबाई फुले शिष्यवृतीसाठी अर्ज करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकांची असते.

**राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती :**

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा, त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, त्याचप्रमाणे सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये ते टिकून रहावेत यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाकडून प्रत्येक वर्षी देशामधील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी १०० विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. या योजनेसाठी १० वी किंवा १२ वी मध्ये किमान ७५ टक्के पेक्षा अधिक गुण मिळविलेला विद्यार्थी, ज्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रूपये ४.५ लाखापेक्षा कमी आहे व पुढील शिक्षणासाठी पदवीच्या प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेतला आहे असे विद्यार्थी पात्र ठरू शकतात. शैक्षणिक खर्चासाठी प्रति वर्ष रूपये १०,०००/- अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेसाठी समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचेकडून वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात येतात.

**शासकीय वसतीगृह**

मागासवर्गीय मुलां-मुलींना आपले गाव सोडून शिक्षण घेता यावे, शहरामध्ये जाऊन उच्च शिक्षण घेता यावे, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांमधील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विषेश सहाय्य विभागाने महाराष्ट्रामधील निवडक जिल्हयांमध्ये नविन २८ शासकीय वसतीगृहांची स्थापना केली आहे.

शासकीय वसतीगृहांमध्ये इ. ८ वी व त्यापुढे महाविद्यालयीन शिक्षण


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :
**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**
(Circle the period of subscription)

DD / MO No. ________________ date ________

Name (in block letters) : ________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ________________

Phone No. / email : ________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**
**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

घेणारा, ज्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रूपये १,००,०००/- पेक्षा कमी आहे असा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणारा विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो. गरजू विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या www. eschool.mharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा. वसतीगृहामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळाल्यानंतर विद्यार्थ्यास भोजन, अंथरूण-पांघरूण, शालेय विद्यार्थ्यास गणवेश, क्रमिक पाठयपुस्तके, वह्या, स्टेशनरी, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमांसाठी स्टेथोस्कोप, ऍप्रन, ड्रॉईंग बोर्ड, ब्रश, कॅनव्हास इ. वस्तू मोफत दिल्या जातात. या व्यतिरिक्त वसतीगृहामधील विद्यार्थ्यांना दैनंदिन खर्चासाठी प्रतिमहिना मुलांना रूपये ५००/- व मुलींना रूपये ६००/- निर्वाह भत्ता दिला जातो. सध्या महाराष्ट्रामध्ये विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर २७१ मुलां-मुलींची शासकीय वसतीगृहे कार्यान्वित असून या वसतीगृहांचा २१,८०० विद्यार्थी - विद्यार्थीनी लाभ घेत आहेत.

**समारोप :**

अनुसूचित जातीच्या मुलां-मुलींना शिक्षण घेताना कोणत्याही प्रकारची आर्थिक अडचण येऊ नये, ते शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून केंद्र व राज्य सरकार यांच्याकडून अनेक योजना कार्यान्वीत करण्यात आल्या असून राजीव गांधी राष्ट्रीय अधिछात्रवृत्ती केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत दिली जाते. महात्मा जोतीराव फुले संशोधन अधिछात्रवृत्ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती, छत्रपती राजर्षी शाहू राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती व सावित्रीबाई फुले राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे यांचेमार्फत प्रदान करण्यात येतात. परदेशी शिक्षणासाठी राज्य सरकारच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाकडून शिष्यवृत्ती देण्यात येते. प्राथमिक व माध्यमिक शाळेमधील मुलींना दिली जाणारी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून प्रदान केली जाते.

■ ■ ■

*लेखक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर मधील अर्थशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी आहेत.*

*email: as84kamble@gmail.com*

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

# UPSC Foundation
## Batch 2017-18

**Prelim + Mains + Interview**

**Batch Starts 3 July 2017**
Time : 8:00 am to 10:00

**Introductory Lectures**
26 June 2017
@ 9 am

**Admission Starts**
2nd Week
of June

**Limited Seats**

# MPSC Foundation Batch 2017-18

**Prelim + Mains + Interview**

Batch Starts
**3 July 2017**
Time 2-6pm & 4-8pm

ADMISSION
**10th June 2017**
@ 7:00am

Bhagirath IAS Academy
UPSC • MPSC

ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
**Ph.: 020-65233450 | 7378406920**
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197**
**Web:**www.bhagirathacademy.co.in
**E-mail:** bhagirathacademypune@gmail.com
**Facebook:** Bhagirath IAS Academy

**Yojana Marathi** (Monthly) **May 2017**

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No.G/NMB/137/2016-18

Published Date: 12th **May,** 2017
Date of Posting : 16th **May,** 2017




Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr (Ms) Sadhana Rout** Director General (I/C) on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.